CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित | आसमंतसह

सोलापूर | रविवार, १८ मे २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक १८९ | पाने १२+८ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे...

### आईने स्वत:च्या मुलीस ठार मारल्याप्रकरणी मयत आईवर गुन्हा दाखल

**मंगळवेढा दि.१७ मे**

डोणज येथे जन्मदात्या आईने स्वत:च्या चार वर्षीय मुलीस जीवे ठार मारल्या प्रकरणी आई स्नेहल उर्फ स्नेहा श्रीधर तेली हिच्या विरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस सुत्रांकडून मिळालेली माहिती अशी, दि.१३ रोजी सकाळी ९ च्या पुर्वी आई स्नेहल हिने चार वर्षाची मुलगी मैथिली हिस ओढणीने गळफास लावून जीवे ठार मारले. तद्नंतर आई स्नेहाने स्वत: गळफास घेवून आत्महत्या केली होती. यातील दोघी घराच्या माळवदाच्या हुकाला ओढणीने गळफास लावून लटकत असल्याचे यातील फिर्यादी सिध्दाराम बिराजदार (रा.नंदूर) यांनी दिलेल्या फिर्यादीत




म्हटले आहे. फिर्यादी हे घटनास्थळी येवून दरवाज्याच्या सांधीतून आत पाहिले असता दोघी लटकत असल्याचे निदर्शनास आले. दरवाज्याला आतून कडी घातल्याने उपस्थितांनी कुर्हाडीच्या सहाय्याने दरवाजाच्या कडीचे हुक काढून घरात प्रवेश केला व नातेवाईकाच्या मदतीने मेव्हुणी स्नेहा व तिची मुलगी मैथिली यांच्या गळ्यातील गळफास सोडवून जमिनीवर झोपवले. तद्नंतर डॉ. गौरीशंकर बुगडे यांना बोलावून दोघांची तपासणी केली असता डॉक्टरांनी मयत घोषीत केले. कोणत्यातरी अज्ञात कारणावरुन मेव्हुणी स्नेहा हिने तिची मुलगी मैथिली हिस ओढणीने गळफास लावून तिला जीवे ठार मारुन त्यानंतर स्नेहाने स्वत: गळफास घेवून आत्महत्या केली असल्याचे दिलेल्या फिर्यादीत नमूद केले आहे. दरम्यान या घटनेचा तपास पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांनी केल्यानंतर मयत स्नेहा हिच्या पतीला दारुचे व्यसन होते. त्यामुळे दारुच्या व्यसनाला त्रस्त होवून ती माहेरी गेल्या दोन वर्षापासून डोणज येथे आई वडीलाकडे रहावयास आली होती. आई व वडील अपंग असून ते मजूरी करुन जीवन जगत आहेत. नवराही सतत दारु पित असल्याने त्रस्त होवून या नैराश्येतून स्नेहाने स्वत:च्या चार वर्षीय मुलीस ठार मारुन स्वत: आत्महत्या करुन जीवन संपविल्याचे पोलीसात उघड झाल्याचे तपासाधिकार्यांनी प्रसार माध्यमांना सांगितले.

### आरती सिंह मुंबई गुप्तवार्ता विभागाच्या सहआयुक्त; राकेश कलासागर रेल्वेचे आयुक्त

**मुंबई, दि. १६ मे-**

मुंबई पोलीस दलातर्गत नव्याने स्थापन करण्यात आलेल्या सहआयुक्त गुप्तवार्ता या पदावर आयपीएस आरती सिह यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर मुंबई रेल्वेचे आयुक्तपदावर राकेश कलासागर यांची नियुक्ती करण्यात आली. त्याचबरोबर बारा अप्पर अधीक्षक/उपमहानिरीक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या तर तितक्याच उपायुक्त/अधीक्षकांना अप्पर आयुक्त, महानिरीक्षक पदावर पदोन्नती करण्यात आली. गृह विभागकडून संबंधित अधिकाऱ्यांच्या बढती, बदलीचे आदेश शुक्रवारी जारी करण्यात आले. आता अप्पर महासंचालक, आयजी दर्जाच्या अधिकाऱ्याच्या बदल्या येत्या काही दिवसात केल्या जातील. अधीक्षक पदावरून पदोन्नती झालेल्यामध्ये कलासागर यांच्यासह राजेश बनसोडे, सुरेश मेंगडे, रत्नागिरीचे अधीक्षक धनंजय कुलकर्णी आदींचा समावेश आहे. तर बदल्यामध्ये पुण्यातील डीआयजी शैलेश बलकवडे, प्रवीण पवार आदींचा समावेश आहे.



### जय भारत शाळेत स्व. करण म्हेत्रे यांना अभिवादन

**सोलापूर, दि. १७ मे-**

जय भारत प्राथमिक शाळेत स्व. करण म्हेत्रे यांच्या पुण्यस्मरणानिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थेचे संस्थापक सिद्राम फुले, मारुती माळगे, सचिव दिपक फुले, गोटे, गवळी, गोंड, हुल्लेनवरु, अंदेली, आंबेकर, म्हेत्रे, फुले उपस्थित होते.

### रिक्षांची धडक, प्रवासी जखमी

**सोलापूर, दि. १७ मे-**

समोरून येणाऱ्या रिक्षाने धडक दिल्याने घडलेल्या अपघातात रिक्षामधील प्रवासी जखमी झाला. शुक्रवारी (ता. १६) रात्री साडेसातच्या सुमारास विजापूर रस्त्यावर पत्रकार भवनजवळ हा अपघात घडला. साईप्रसाद रविकुमार तनल (वय २८, रा. हुडको, मोदी, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. साईप्रसाद हा बापुजी नगर येथून रिक्षात बसून सोनी नगरकडे निघाला होता. पत्रकार भवन चौकात समोरून येणाऱ्या रिक्षाने धडक दिल्याने हा अपघात घडला. यात जखमी झाल्याने त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे. याची सिव्हिल पोलिस चौकीत नोंद झाली आहे.


### हिंदुत्व सोडताच त्यांचा नरकात प्रवेश; एकनाथ शिंदे यांची उबाठावर टीका

**ठाणे, दि. १७ मे -**

सत्तेसाठी जेव्हा त्यांनी हिंदुत्वाचा त्याग केला त्याच दिवशी त्यांचे पाऊल नरकात पडले, अशी खरमरीत टीका उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उबाठावर केली आहे. खासदार संजय राऊत यांच्या नरकातला स्वर्ग या पुस्तकाबाबत बोलताना शिंदे यांनी टीका केली. त्यांनी जर वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाचा त्याग केला नसता तर आज त्यांची जी परिस्थिती झाली आहे ती झाली नसती आणि ते नरकातही गेले नसते. नरक पाहिल्यानंतर ते आता स्वर्ग शोधत आहेत. बाळासाहेब ठाकरे यांनी कधीही हिंदुत्वाशी तडजोड केली नाही आणि त्यांनी गृहमंत्री अमित शहा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासारख्या नेत्यांचा आदर केला. आणि हे दोघे हिंदुत्वाचे रक्षणकर्ते आहेत, हेही शिवसेनाप्रमुखांनी ओळखले होते, असे शिंदे म्हणाले.

## निधन वृत्त...

### मनोहर वाघचवरे



**सोलापूर, दि. ६ डिसेंबर-**

मोहोळ तालुक्यातील भांबेवाडी येथे शिवसेनेची जिल्ह्यातील पहिली शाखा स्थापन करून पहिला शाखाप्रमुख होण्याचा मान मिळवणारे, हिंदुरुदयसम्राट कै.बाळासाहेब ठाकरे यांची निष्ठावंत शिवसैनिक मनोहर (आबा) नारायण वाघचवरे यांचे वयाच्या ७४ व्या वर्षी वर्धापकाळाने भांबेवाडी येथील राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे

# वन नेशन वन इलेक्शनबाबत संयुक्त समितीची राज्यातील नेत्यांसह बँकिंग क्षेत्राशी सखोल चर्चा

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.१७ मे -**




देशात वन नेशन वन इलेक्शन(समांतर निवडणूक) घेण्याबाबत भारतीय संविधान (१२९वा सुधारणा) विधेयक, २०२४ आणि केंद्रशासित प्रदेश कायदे (दुरुस्ती) विधेयक, २०२४ संदर्भात गठीत करण्यात आलेल्या संयुक्त समितीने शनिवारी राज्य सरकारच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह विविध राष्ट्रीय व प्रादेशिक राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, रिझर्व बँक ऑफ इंडिया, विविध बँका व विमा कंपन्यांशी विस्तृत चर्चा केली.

मुंबईच्या ताज हॉटेल येथे आज समांतर निवडणूक संदर्भात लोकसभा सदस्य पी.पी.चौधरी, लोकसभा सदस्य धर्मेंद्र यादव, राज्यसभा सदस्य घनश्याम तिवारी यांची आज संयुक्त पत्रकार परिषद झाली.समितीने राज्य प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी समांतर निवडणुकांमुळे निर्माण होणाऱ्या आर्थिक व प्रशासकीय परिणामांवर चर्चा केली. अधिकाऱ्यांनी समितीला आश्वासन दिले की, एक सखोल अभ्यास केला जाईल आणि विशेषतः शिक्षण क्षेत्रावर एकत्रिक निवडणुकांमुळे होणाऱ्या सकारात्मक परिणामांची माहिती समितीला दिली जाईल. यानंतर, समितीने महाराष्ट्रातील विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, ज्यामध्ये माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचा समावेश होता, यांच्याशी एकत्रिक निवडणुकांच्या घटनात्मक, तार्किक आणि इतर बाबींवर चर्चा केली.

समितीने नंतर रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या प्रतिनिधींशी निवडणुकांच्या असमकालीनतेमुळे होणाऱ्या आर्थिक धोरणांवरील परिणामांविषयी संवाद साधला. आरबीआयच्या प्रतिनिधींनी सांगितले की, ते या विषयावर सखोल आणि सर्वसमावेशक अभ्यास करतील आणि वारंवार निवडणुकांमुळे निर्माण होणाऱ्या राजकीय व धोरणात्मक अनिश्चिततेचा प्रभाव समजून घेतील. शेवटी, समितीने स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया, सेंट्रल बँक, युनियन बँक, एलआयसी, जीआयसी आणि नाबार्डसह बँकिंग व विमा क्षेत्रातील प्रमुख संस्थांच्या प्रतिनिधींशी चर्चा केली. त्यांनी सांगितले की, एकत्रिक निवडणुकांचा बँकिंग व क्रेडिट संस्कृतीवर होणारा परिणाम समजून घेण्यासाठी ते 'इंडियन बँक्स असोसिएशन'च्या माध्यमातून सर्वसमावेशक अभ्यास करतील आणि त्याचे निष्कर्ष समितीला सादर करतील.

## उसंतवाणी

१५१३

नरकात स्वर्ग । की स्वर्गात नर्क ।
संजय हा गर्क । पुस्तकात ॥१॥

बडबड किती । करून थकला ।
नाहीच शिकला । काहीच जो ॥२॥


पक्ष आता सारा । बुडवून झाला ।
उपाय न आला । कामी काही ॥३॥

राष्ट्रवादीमध्ये । तडजोड वारे ।
काँग्रेसी ते सारे । गुंगलेले ॥४॥

उद्धवाची दूर । लंडनची वारी ।
संजयाची सारी । घालमेल ॥५॥

निवडणूक ती । आली पालिकेची ।
बाजी अस्तित्वाची । लागलेली ॥६॥

कांत म्हणे व्यर्थ । लिहितो पुस्तक ।
सत्तेचा हस्तक । बोलभांड ॥७॥



श्रीकांत उमरीकर
९४२२८७८५७५
१७ मे २०२५

# स्वच्छ, हरित व सुरक्षित वारीसाठी सूक्ष्म नियोजन करा

## विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि.१७ मे-**



पालखी सोहळ्यात वारकऱ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासह मागील पालखी सोहळ्याप्रमाणे सुरक्षित, अपघात मुक्त, स्वच्छ आणि हरित वारी संपन्न करण्यासाठी विभागातील सर्व अधिकाऱ्यांनी सूक्ष्म नियोजन करावे, अशा सूचना विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिल्या.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित आषाढीवारी पूर्वतयारी आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी सोलापूर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद (दूरदृश्य प्रणालीद्वारे), पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, अपर आयुक्त तुषार ठोंबरे, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, उपायुक्त विजय मुळीक उपस्थित होते. डॉ.पुलकुंडवार म्हणाले, मानाच्या पालख्यांच्या विश्वस्तांसोबत बैठक घेऊन त्यांच्या सूचनेनुसार कार्यवाही करावी. वारी कालावधीत अन्न शुद्धतेची खात्री करण्यासाठी आवश्यकतेनुसार अन्न व औषध प्रशासनाकडील अधिकारी-कर्मचाऱ्यांची संख्या वाढवावी आणि येत्या काळात अन्न भेसळ करणाऱ्याविरोधात व्यापक मोहीम राबवावी. पालखी सोहळ्यासंदर्भातील राज्यस्तरीय बैठकीपूर्वी पालखी सोहळ्याची तयारी पूर्ण करावी. इतर जिल्ह्यात किंवा विभागात बदली झालेल्या अनुभवी अधिकाऱ्यांची सेवा घेण्याबाबत संबंधितांना विनंती करावी. सर्व अधिकाऱ्यांनी पालखी मार्गाचा संयुक्त दौरा करून व्यवस्थेबाबत परस्पर समन्वय ठेवावा, असे निर्देश त्यांनी दिले. विभागीय आयुक्त पुढे म्हणाले, पालखी मार्गावर मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करावी. पालखी सोहळ्यादरम्यान आणि नंतरही स्वच्छता रहावी यासाठी आवश्यकतेनुसार स्वच्छतागृहांची संख्या वाढवावी. चंद्रभागेचे पाणी स्वच्छ राहील यासाठी आवश्यक उपाय योजावेत. नीरा नदी परिसर स्वच्छतेकडे विशेष लक्ष द्यावे. पालखी पुढे गेल्यावर मागील गावात त्वरित स्वच्छता करावी. वारकऱ्यांना आरोग्य सुविधा उपलब्ध करून देतांना रुग्णवाहिकेत पुरेशा प्रमाणात औषधे आणि वैद्यकीय अधिकारी असतील याची दक्षता घ्यावी. पालखी मार्ग खड्डे मुक्त राहतील व उत्तम वाहतूक व्यवस्थापन राहील याची काळजी घ्यावी. पालखी मार्गावर पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवावा. घाट परिसरात दरड कोसळून होणाऱ्या दुर्घटना टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात. तिन्ही जिल्ह्यांतील पालखी मार्गावरील व्यवस्थेबाबत एकत्र पुस्तिका तयार करण्यात यावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

यावेळी पुण्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. पाटील व सातारा निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील यांनी जिल्ह्यातील तयारीची माहिती दिली. बैठकीला पुणे, सातारा व सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम व पोलीस विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

> सोलापूर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सादरणीकरणाद्वारे पालखी सोहळ्याच्या पूर्वतयारीची माहिती दिली. सोहळ्यासाठी घटना प्रतिसाद प्रणाली स्थापण्यात आली आहे २५ हजार ५०० अधिकारी-कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. सोहळ्यादरम्यान १ हजार ८६० स्वयंसेवकांची मदत घेतली जाणार आहे. पालखी मार्गावर पाणी, विद्युत, आरोग्य, गॅस सिलेंडर, स्वच्छता आदी सुविधांचे नियोजन करण्यात येत आहे. महिलांसाठी विशेष सुविधा करण्यात येत आहेत. वारीच्या अनुषंगाने आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात आला आहे. गर्दी व्यवस्थापनासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्याबाबत चाचणी घेण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

# नवीन उपकेंद्र उभारणीसाठी जागेची अडचण; चर्चा करण्यासाठी तत्काळ झाली बैठक




## जिल्हाधिकारी आशीर्वाद यांचे बैठकीत निर्देश

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, १७ मे -**

महावितरण कंपनीने अंतर्गत उपसमिती गठीत करून त्याचा अहवाल मुख्य समितीच्या बैठकीत ठेवण्याची सूचना करून नवीन उपकेंद्र उभारणीसाठी जागेच्या अडचणींवर चर्चा करण्यासाठी तत्काळ बैठक घेण्याचे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

विद्युत वितरण प्रणाली सुधारण्याचा आणि शेतकऱ्यांना लागणाऱ्या योजनांचा लाभ अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी जिल्हा विद्युत समितीचे अध्यक्ष ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली, जिल्हा नियोजन भवन येथे केंद्र शासनाच्या सुधारित वितरण व्यवस्थेची व इतर योजनांची आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये सोलापूर जिल्ह्यातील विविध योजनांचा आढावा घेण्यात आला, ज्यामध्ये -फीडर सेपरेशन, लॉस रिडक्शन, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी, पीएम सूर्यमित्र - हर घर मुफ्त बिजली योजना, पीएम कुसुम योजना आणि मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेचा समावेश होता. तालुका निहाय सर्व योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली. या बैठकीस खासदार धैर्यशील मोहिते पाटील, खासदार प्रणिती शिंदे, आमदार अभिजित पाटील, आमदार नारायण पाटील, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, अधीक्षक अभियंता महावितरण सुनील माने, तसेच महावितरण कंपनीत कार्यरत कार्यकारी अभियंते, महाउर्जा अधिकारी व कंत्राटदार उपस्थित होते.

### बैठकीतील मुख्य मुद्दे

- स्मार्ट मीटर: समिती अध्यक्ष ओम प्रकाश राजेनिंबाळकर यांनी महावितरणच्या सेवेबाबत ग्राहकांना स्मार्ट मीटरची उपयोगिता
- सिंगल फेजिंग फीडर:गावठाणमध्ये रूपांतर करण्याबाबत महावितरण कंपनीने पाठपुरावा करण्याची सूचना.
- विद्युत वितरण हानी कमी:प्रस्तावित कामांचा आढावा घेतला.
- सौर कृषी पंप योजना: शेतकऱ्यांना अधिक लाभ मिळवून देण्यासाठी महावितरण अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची सूचना.

# सोलापुरातून पळवलेली चिमुरडी सापडली मोडनिंबच्या लग्नात

## चोरट्याने दागिने व पैंजण पळवले

**मोडनिंब, दि.१७ मे-**

सोलापूर बसस्थानकावर मामाच्या गावी जाण्यासाठी आलेल्या चिमुरडीला अनोळखी महिलेने पळवले. तिच्या कानातील सोन्याच्या रिंग आणि पायातील पैंजण काढून घेत तिला मोडनिंब (ता.माढा) येथे एका लग्न समारंभात सोडले. वऱ्हाडींनी सोशल मीडियावर तिची पोस्ट व्हायरल करताच सहा तासात तिचे आई-वडील पोलिसांसह दाखल झाले. मुलीला सुरक्षित पाहून त्यांचे डोळे पाणावले अन त्यांनी तिला ताब्यात घेतले.

बावी येथील राजाभाऊ माळी यांच्या मुलीचे लग्नकार्य शुक्रवारी मोडनिंब येथील एका मंगल कार्यालयामध्ये सुरू होते. अक्षताच्या वेळी चिमुरडी वऱ्हाडींना रडताना दिसली. तिची विचारपूस केली असता ती फक्त मी सोलापूरची आहे, एवढेच सांगत होती. या अडीच वर्षाच्या चिमुरडीबाबत राजाभाऊ माळी यांनी सोशल मीडियावर पोस्ट टाकली. दरम्यान संशयित महिलेने चिमुरडीला मोडनिंब येथे माळी यांच्या लग्नकार्यात सोडून दिले. तेव्हा तिच्या कानातील सोन्याची रिंग व पैंजण पायात नव्हते. पोलिसांनी तत्काळ सोलापूर बसस्थानकातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता त्यामध्ये एक अनोळखी महिला मुलीला घेऊन जाताना दिसली. तपासात हे स्पष्ट झाले की ती महिला लातूर-कल्याण एसटीमध्ये चिमुरडीसोबत प्रवास करत होती. एसटी वाहक संतोष वाघमारे यांच्याशी संपर्क साधल्यावर त्यांनी सांगितले की बस टेंभुर्णीपर्यंत पोहोचली होती पण संशयित महिला मोहोळ स्थानकावरच उतरली. पोलिस पथकाकडून अधिक तपास सुरू आहे.

# नाही तर; अटॅकने मरेन किंवा आत्महत्या करावी लागेल, असे सांगत वायकर मातोश्रीत रडले

## राऊतांच्या पुस्तकात दावा

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. १७ मे-**

ठाकरे गटाचे नेते खा.संजय राऊत यांच्या नरकातला स्वर्ग या पुस्तकातील दाव्यांनी राज्यातील राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. सत्ताधाऱ्यावर केलेल्या आरोपामुळे त्यांच्यावर टिकेची झोड उडवली आहे.

ईडीच्या कारवायांमुळे भयभीत झालेल्या तत्कालिन आमदार रवींद्र वायकर हे हैराण झाले होते. त्यांनी मातोश्रीवर येऊन मी अटॅकने मरेन किंवा मला आत्महत्या करावी लागेल, मी तुरुंगात मरणार नाही असे रडत सांगितले होते, असा दावाही पुस्तकात केला आहे. त्यांच्यासह ठाकरे गटातील नेत्यांवर झालेल्या दबावाचे आणि पक्षांतर करणाऱ्या नेत्यांच्या अनुभव ईडीच्या कारवाया, सरकारचा धाकदपटशा, ईडी, सीबीआयच्या नोटिसांमुळे विरोधी पक्षातील आमदार आणि खासदारांचे गळालेले आवसान, त्यानंतर झालेले पक्षांतर व कोठडीतील अनुभवावर भाष्य केले आहे.

ईडीची प्रतिमा तपास यंत्रणेपेक्षा भाजपच चालवत असलेली दहशतवादी संघटना अशीच झाली होती. त्यामुळे अनेकांनी घाबरून भाजपमध्ये उड्या मारल्या होत्या. रवींद्र वायकर हे शिवसेनेच्या निष्ठावान समजल्या जाणाऱ्या आमदारांपैकी एक होते. उद्धव ठाकरे यांच्या किचन कॅबिनेटचे ते एक सदस्य होते. त्यांचा मातोश्रीवर राबता असे. एकनाथ शिंदे यांनी चाळीस आमदारांसह पक्ष सोडला तेव्हा ते शिंदेंसोबत गेले नाहीत. पण किरीट सोमय्यांनी अचानक वायकरांना टार्गेट करण्यास सुरुवात केली. रायगडमधील जमिनीवर नऊ बंगले बांधल्याचा फेक नरेटिव्ह त्यांनी पसरवला. हे बंगले ठाकरे कुटुंबाचे आहेत असे भासवले. खोटे गुन्हे नोंदवले. पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेत वायकरांचा तपास सुरू केला. याच गुन्ह्यांचा आधार घेत त्यात ईडीला घुसवण्यात आले, असे राऊत यांनी या पुस्तकात लिहिले आहे. वायकर यांना ईडी अटक करणार असा धुरळा सोमय्यांनी उडवताच वायकर आणि त्यांच्या कुटुंबीयांची गाळण उडाली. वायकर आणि त्यांचे कुटुंब मातोश्रीवर येऊन रडले. माझ्यात तुरुंगात जायचे बळ नाही आणि ईडीच्या दहशतवादाशी लढण्याचे धैर्यदेखील नाही, असे वायकर यांनी मातोश्रीत सांगितले. मला अटॅक येऊन मी मरून जाईल, नाहीतर आत्महत्या करावी लागेल. तुरुंगात मरण्यापेक्षा बाहेर मरेन, अशी निराशा आणि निर्वाणीची भाषा वायकरांनी सुरू केली. तेव्हा उद्धव ठाकरेही हतबल झाले होते. कालपर्यंत ज्यांना वाघ समजत होतो, ते प्रत्यक्षात शेळ्याच आहेत हे त्यांना पटले, अखेर वायकर हे शिवसेना सोडून शिंदे गटात गेले. त्या क्षणीच त्यांच्यावरील सर्व गुन्हे मागे घेतले गेले. याचा अर्थ वायकरांवरील गुन्हे खोटे होते. त्यांनी पक्ष सोडावा म्हणू त्यांच्यावरील दबाव होता, असे सांगतानाच प्रताप सरनाईक, गुलाबराव पाटील अशा अनेकांनी अटकेच्या भीतीने उड्या मारल्या. सरनाईक यांच्यावर ईडीने धाडसत्र सुरू केलेच होते, असा दावाही या पुस्तकात केला आहे.

### गृहमंत्रीपदासाठी मुश्रीफाचा धर्म आडवा आला

संजय राऊत यांनी महाविकास आघाडी सरकारची स्थापना व त्यातील काही घडामोडीचा पुस्तकात उल्लेख केला आहे.महाविकास आघाडी सरकारचे बाळंतपण साधे नव्हते. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाल्यावर गृहखाते कोणाकडे जाणार यावर पैजा लागल्या. अजित पवार पहाटेचा शपथविधी आटोपून रिक्त हस्ते पुन्हा स्वगृही परतले होते. त्याचा विचार होईल, असे मला वाटले नव्हते. छगन भुजबळ हे तुरुंगातून सुटून आले तरी त्यांच्यावर खटले चालू होते. भुजबळ यांची गृहमंत्री होण्याची इच्छा प्रबळ होती. त्यांच्यात क्षमताही होती पण त्यांच्या तुरुंग प्रवासाची अडचण ठरली असावी. जयंत पाटील यांना गृहमंत्रीपदाची जबाबदारी नकोच होती. तो एक थँकलेस जॉब आहे, असे त्यांचे म्हणणे होते. वळसे-पाटील यांच्या प्रकृतीच्या कुरबुरी होत्या. कोल्हापूरचा हसन मुश्रीफ हा एक रांगडा व तगडा गडी. मुश्रीफ हे एक उत्तम चॉईस ठरले असते. परंतु मुसलमान असल्याने प्रत्येक गोष्टीत त्यांना टार्गेट केलं जाईल, अशी भीती पवारांना वाटली. खरं तर मुश्रीफ हे कमालीचे पुरोगामी. पक्के निधर्मी आणि दिलखुलास व्यक्तिमत्त्व. शाहू महाराजांवर अपार श्रद्धा असलेलेल कार्यकर्ते, पण शेवटी धर्म आडवा आला, असे नमूद करून गृहमंत्री अनिल देशमुखांच्या निवडीबाबत म्हटले आहे की, गृहमंत्री कोण? या प्रश्नावर एकदा शरद पवार म्हणाले, विदर्भातला नवा प्रयोग करून पाहू या. तो प्रयोग म्हणजे अनिल देशमुख. देशमुखांनी गृहखाते उत्तम सांभाळले. मुख्यमंत्री ठाकरे यांच्याशी त्यांचे उत्तम नाते होते. पण तीन प्रमुख पक्षात बदल्या, बढत्या आणि नेमणुकांच्या कटकटी असतात. त्या देशमुखांच्या वाट्याला आल्या. देशमुख हे नागपूरचे. त्या आधी फडणवीस हेच नागपूरचे सत्ताकेंद्र होते. देशमुख गृहमंत्री होताच सर्व काही बदलले. देशमुखांचा नागपूर-विदर्भातील वाढता प्रभाव, गृहखात्याचे वलय, त्यांना मिळणारे सॅल्यूट हे जुन्या सत्ताकेंद्रास सहन झाले नाहीत आणि तेथूनच देशमुखांच्या रस्त्याचे काटे निर्माण होऊ लागेल.असा दावाही त्यांनी त्यात केला आहे.

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
■ रविवार, १८ मे २०२५
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com




**आजचे सामने**

राजस्थान रॉयल्स वि. पंजाब किंग्ज्
वेळ : दु. ३.३० वाजता
ठिकाण : सवाई मानसिंग स्टेडियम, जयपूर

दिल्ली कॅपिटल्स् वि. गुजरात टायटन्स
वेळ : रात्री ७.३० वाजता
ठिकाण : अरुण जेटली स्टेडियम, दिल्ली

## विचारपुष्प



संघ म्हणजे व्यायामशाळा किंवा मिलिटरी स्कूल नव्हे, हे पक्के लक्षात ठेवा. संघ ही हिंदूंची राष्ट्रव्यापी व अभेद्य संघटना आहे. ती पोलादापेक्षाही कणखर असावयास पाहिजे.

**डॉ. केशव बळीराम हेडगेवार**
रा. स्व. संघाचे आद्य सरसंघचालक

# सामर्थ्य असेल तरच जग ऐकते प्रेमाची भाषा

## ● सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे प्रतिपादन

**जयपूर, १७ मे**

जर तुमच्याकडे सामर्थ्य असेल तरच जगही तुमची प्रेम, कल्याण व मांगल्याची भाषा ऐकते. हे जगाचे स्वरूप आहे. ते बदलता येत नाही. म्हणूनच विश्वाच्या कल्याणासाठी आपण शक्तिशाली असण्याची आवश्यकता आहे. भारत हा जगातील सर्वांत प्राचीन देश आहे. त्याची भूमिका मोठ्या भावाची आहे. भारत जगात शांतता आणि सौहार्दासाठी काम करीत आहे, असे स्पष्ट प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले.



जयपूरमधील हरमाडा येथील रविनाथ आश्रमात रविनाथ महाराजांच्या पुण्यतिथी निमित्त शनिवारी आयोजित कार्यक्रमात सरसंघचालक बोलत होते. सरसंघचालक म्हणाले, या आश्रमाच्या व्यासपीठावर मला कोणत्याही सन्मानाचा अधिकार नाही आणि भाषण देण्याचाही अधिकार नाही आणि जर आदर द्यायचाच असेल तरी मी एकटा काहीही करत नाही. कार्याची ही परंपरा गेल्या १०० वर्षांपासून सुरू आहे. त्या परंपरेत लाखो कार्यकर्ते आहेत. प्रचारकांप्रमाणेच गृहस्थाश्रमी कार्यकर्ते देखील आहेत. इतक्या सगळ्या कार्यकर्त्यांच्या कठोर परिश्रमाचे फळ म्हणून जर काही स्वागतार्ह आणि आदरास पात्र असेल तर ते म्हणजे या कार्यकर्त्यांचा सन्मान. संतांच्या आज्ञेनेच मी हा सन्मान स्वीकारत आहे. सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत म्हणाले, भारतात त्यागाची परंपरा राहिली आहे.

भगवान श्रीरामांपासून भामाशाहपर्यंत सर्वच आम्हाला पूजनीय आणि वंदनीय आहेत. विश्वाला धर्म शिकवणे हे भारताचे कर्तव्य आहे, परंतु त्यासाठी देखील सामर्थ्याची आवश्यकता असते. भारत कोणाचाही द्वेष करीत नाही. परंतु जर तुमच्याकडे सामर्थ्य असेल तरच जग प्रेम, कल्याण व मांगल्याची भाषा ऐकते. म्हणून जगाच्या कल्याणासाठी आपण शक्तिशाली असले पाहिजे आणि जगाने आमचे सामर्थ्य पाहिले आहे. विश्वकल्याण हा आमचा धर्म आहे. विशेषतः हिंदू धर्माचे ते एक कठोर कर्तव्य आहे. ही आमची ऋषी परंपरा राहिली आहे, जी संत समुदाय पुढे नेत आहे. रविनाथ महाराजांसोबतचे आपले अनुभव सांगताना सरसंघचालक म्हणाले की, त्यांची करुणा आम्हाला जीवनात चांगले काम करण्याची प्रेरणा देते. कार्यक्रमात भावनाथ महाराज यांनी सरसंघचालकांचा सत्कार केला. यावेळी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

## महत्त्वाचे

### स्लीपर सेल, इसिसच्या दोन दहशतवाद्यांना मुंबईत अटक

**नवी दिल्ली :** मे इराक आणि सिरियासह देशभरात धुमाकूळ घालत हजारो निष्पाप नागरिकांचा बळी घेणाऱ्या इस्लामिक स्टेट ऑफ इराक अॅण्ड सिरिया या दहशतवादी संघटनेसाठी काम करणाऱ्या दोन सदस्यांना मुंबई विमानतळावरून राष्ट्रीय तपास संस्थेने शुक्रवारी अटक केली आहे. अब्दुल्ला फैयाज शेख ऊर्फ डायपरवाला आणि तल्हा खान, अशी अटक केलेल्या दहशतवाद्यांची नावे आहेत. २०२३ मध्ये पुणे येथे आयईडी स्फोटकाची चाचणी करण्यात आली होती. याप्रकरणातील अब्दुल्ला फैयाज शेख ऊर्फ डायपरवाला आणि तल्हा खान हे फरार होते. एनआय त्यांच्या हालचालीवर लक्ष ठेवून होती. दोघेही इंडोनेशियातील जकार्ता येथे लपले होते.

### ट्रम्प यांची पुन्हा कोलांटउडी
### म्हणे, मी रोखला भारत-पाक संघर्ष

**न्यूयॉर्क :** भारत व पाकिस्तान संघर्षाबाबत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा यू-टर्न घेतला आहे. भारत आणि पाकिस्तानमधील युद्ध रोखण्यात आपण मोठी भूमिका बजावली, असा दावा त्यांनी पुन्हा एकदा केला आहे. दोन्ही देशांमधील तणाव इतका वाढला होता की ते अणुयुद्धाच्या अगदी जवळ पोहोचले होते, असेही ते म्हणाले. शुक्रवारी फॉक्स न्यूजला दिलेल्या मुलाखतीत ट्रम्प यांनी यासंदर्भात सांगितले. ते पुढे म्हणाले, परिस्थिती खूप गंभीर बनली होती. पुढचे पाऊल कोणते असते हे तुम्हाला माहिती आहे... 'एन वर्ड' म्हणजे अणुयुद्ध. परराष्ट्र धोरणातील यशाबद्दल बोलताना ट्रम्प म्हणाले की, भारत-पाकिस्तान युद्ध रोखणे हे त्यांच्या सर्वांत मोठ्या यशांपैकी एक आहे. तथापि, त्यांना त्याचे श्रेय मात्र मिळाले नाही.

# आम्ही आता आण्विक धमक्यांना घाबरत नाही

## 'ऑपरेशन सिंदूर'मुळे जग आश्चर्यचकीत : अमित शाह

◆ **गांधीनगर, १७ मे**

पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानात १०० किलोमीटर घुसून दहशतवादी आणि पाक लष्कराला चांगलाच धडा शिकविला. स्वातंत्र्यानंतर हे प्रथमच घडले आहे. आम्ही आता आण्विक धमक्यांना मुळीच घाबरत नाही, असे स्पष्ट प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले आहे.

पंतप्रधान मोदी देशाला विकासाच्या दिशेने नेत आहेत. सोबत त्यांनी देशाला सुरक्षित ठेवण्याचे काम केले आहे. २०१४ पूर्वी, दररोज दहशतवादी हल्ले होत होते. अनेक कट रचले जात होते, पण त्यांना प्रत्युत्तर दिले जात नव्हते. आता परिस्थिती बदलली आहेत. विटेला उत्तर दगडाने दिले जात आहे. सशक्त नेतृत्वामुळे लष्कराला ठोस निर्णय घेणे शक्य झाले आहे, असे शाह म्हणाले. गांधीनगर येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.



पुढे ते म्हणाले, आपण आता आण्विक धोक्याला घाबरत नाही. पूर्वी पाकिस्तान प्रत्येकवेळी अणुबॉम्बची धमकी देऊन भारताला वेठीस धरत असे. आताही तसेच होईल, असा त्याचा होरा होता. पण, अशा धमक्यांना आता मोजत नाही. एवढेच नव्हे तर आम्ही पाकिस्तानमध्ये १०० किलोमीटर आत शिरून प्रत्युत्तर दिले. पाकिस्तानचे हवाई तळ उद्ध्वस्त केले. आपली हवाई संरक्षण प्रणाली खूप मजबूत आहे.

**दहशतवाद्यांना पळताभूई थोडी केली**

भारताने भारतीय संस्कृतीनुसार प्रतिसाद दिला. आम्ही जैश-ए-मोहम्मद आणि लष्कर-ए-तोयबाचे मुख्यालय उडवले. त्यांचे दहशतवाद्यांना तयार करणारे आणि प्रशिक्षण देणारे नऊ अड्डे उद्ध्वस्त केले. सोबत शस्त्रेही नष्ट केली. हे काम भारताच्या शूर जवानांनी पूर्ण केले आहे. भारताच्या हल्ल्यानंतर दहशतवाद्यांना पळताभूई थोडी केली, असे शाह म्हणाले. (वृत्तसंस्था)

### दहशतवादी कारवाया कमी झाल्या

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शपथ घेतल्यापासून दहशतवादी कारवाया कमी झाल्या आहेत. नाहीतर देशात कुठे ना कुठे दहशतवादी हल्ले होत असे. पंतप्रधान मोदींनी प्रत्येक हल्ल्याला प्रत्युत्तर दिले. उरीमध्ये हल्ला झाला तेव्हा सर्जिकल स्ट्राईक केले तर पुलवामाचा बदला बालाकोटवर हवाई हल्ला करून घेतला. परंतु दहशतवादी त्यांचे मार्ग बदलले नाहीत आणि पहलगामवर हल्ला केला. यावेळी ऑपरेशन सिंदूरने त्यांचे मुख्यालय उद्ध्वस्त केले, असे शाह यांनी सांगितले. ■



### रश्मिरथी प्रयोग

**सोलापूर : हुतात्मा स्मृती मंदिरात शनिवारी सांयकाळी प्रभाव व जैन हसन प्रस्तुत दानशूर कर्ण आधारित रश्मिरथी प्रयोग सादर करण्यात आला.**
(छायाचित्र : केवल तिवारी)



## प्रासंगिक

# ‘वर्मा’वर बोट!

**राहुल गोखले**

दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या शासकीय निवासस्थानी १४ मार्चच्या रात्री आग लागली. ती विझविण्यासाठी दाखल झालेल्या अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांना तेथे एका खोलीत मोठ्या प्रमाणावर जळालेल्या नोटा तसेच पोती भरून रोख रक्कम आढळली. त्या कर्मचाऱ्यांनी त्याचे चित्रमुद्रण (रेकॉर्डिंग) केले. दिल्ली उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश डी. के. उपाध्याय यांना याची माहिती देण्यात आली; तेव्हा त्यांनी त्वरित दिल्ली पोलिस महासंचालकांना त्याची सूचना दिली. त्यानंतर तपास अधिकारी न्या. वर्मा यांच्या निवासस्थानी गेले असता तेथून जळालेल्या नोटा आणि रोख रक्कम गायब झालेली आढळली. न्या. वर्मा यांनी तपास अधिकाऱ्यांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे दिली नाहीतच; पण त्यांची दिशाभूल होईल अशी माहिती दिली. या प्रकरणावरून देशभर काहूर उठणे स्वाभाविक होते. देशातील लहान-मोठ्या गुन्हेगारी प्रकरणांत न्यायाधीश निकाल देत असतात; पण न्यायाधीशांचा न्याय कोण करणार, असा सवाल उपस्थित झाला. न्या. वर्मा यांची दिल्ली उच्च न्यायालयातून अलाहाबाद उच्च न्यायालयात तडकाफडकी बदली करण्यात आली असली, तरी त्याने मूळ प्रश्न अनुत्तरितच राहतो, अशी खंत देशभरात व्यक्त होत होती. अखेरीस सर्वोच्च न्यायालयाने या सर्वच प्रकरणाची चौकशी करण्यासाठी अंतर्गत समिती नेमली. त्या समितीने दिलेल्या अहवालानंतर सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी न्या. वर्मा यांना राजीनामा देण्याची किंवा निवृत्ती स्वीकारण्याची सूचना केली. न्या. वर्मा यांनी त्या दोन्हीस नकार दिला. तेव्हा न्या. खन्ना यांनी राष्ट्रपती आणि पंतप्रधानांना पत्र लिहून न्या. वर्मा यांना बडतर्फ करण्याची शिफारस केली आहे. त्याकरिता महाभियोग चालवावा लागेल. संसदच ती प्रक्रिया करू शकते.

न्यायाधीशांनी निष्पक्ष निकाल द्यावा अशी अपेक्षा असेल तर न्यायाधीश संशयाच्या भोवऱ्यात सापडलेले असता कामा नये, ही किमान अपेक्षा झाली. परंतु राजीनामा न देऊन न्या. वर्मा यांनी अपेक्षाभंग केला आहे. महाभियोग चालविणे ही अतिशय प्रदीर्घ अशी प्रक्रिया आहे. कदाचित त्याचाच फायदा घेऊन न्या. वर्मा यांनी पदाला चिकटून राहणे पसंत केले असावे. यापूर्वीही काही न्यायाधीशांवर महाभियोग चालले आहेत; पण महाभियोगामुळे पदावरून पायउतार होण्याची वेळ आलेली नाही. न्या. वर्मा हे काही असे आरोप झालेले पहिलेच न्यायाधीश नव्हेत. ज्यांच्यावर महाभियोग प्रक्रिया सुरू करण्यात आली होती त्या सर्वांवरच काही आर्थिक भ्रष्टाचाराचे आरोप नव्हते. उदाहरणार्थ; २०१५ साली हार्दिक पटेलवरील देशद्रोह खटल्यात सुनावणीदरम्यान गुजरात उच्च न्यायालयाचे तत्कालीन न्यायाधीश पारडीवाल यांनी देशाच्या प्रगतीत अडथळे निर्माण करणाऱ्या दोन बाबी म्हणजे आरक्षण आणि भ्रष्टाचार असे विधान केले होते. त्यावरून राज्यसभेच्या ५८ सदस्यांनी तत्कालीन राज्यसभा अध्यक्ष हमीद अन्सारी यांच्याकडे न्या. पारडीवाल यांच्याविरोधात महाभियोग चालविण्याचा प्रस्ताव सादर केला. अर्थात पारडीवाल यांनी काही तासांतच आपल्या निकालपत्रातून ते विधान काढून टाकल्यानंतर ते प्रकरण शमले आणि महाभियोग प्रक्रिया थांबविण्यात आली. तीच बाब मध्य प्रदेश उच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्या. एस. के. गंगेले यांची. ग्वाल्हेर येथील एका कर्मचाऱ्याचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप त्यांच्यावर झाला. २०१५ साली राज्यसभेच्या अध्यक्षांकडे ५८ खासदारांनी न्या. गंगेले यांच्याविरोधात महाभियोग प्रस्ताव दिला. अध्यक्ष अन्सारी यांनी चौकशी समिती नेमली; पण त्या समितीला कोणताही ठोस पुरावा मिळाला नाही आणि न्या. गंगेले यांच्या विरोधातील महाभियोग प्रस्ताव बारगळला. २०१८ साली सरन्यायाधीश दीपक मिश्रा यांच्या कार्यशैली विरोधात सर्वोच्च न्यायालयाच्या चार न्यायमूर्तींनी पत्रकार परिषद घेऊन जाहीर भूमिका मांडली आणि सर्वत्र खळबळ उडाली. देशात असा प्रसंग पहिल्यांदाच उद्‌भवला असावा, हेही त्याचे एक कारण होतेच. सात विरोधी पक्षांच्या खासदारांनी राज्यसभा अध्यक्ष व्यंकय्या नायडू यांना न्या. मिश्रा यांच्याविरोधात महाभियोग चालविण्याचा प्रस्ताव दिला होता. तथापि, न्या. मिश्रा यांच्यावरील आरोप हे सर्वोच्च न्यायालयाच्या अंतर्गत व्यवस्थापनाशी निगडित आहेत; गैरव्यवहार किंवा गैरकारभाराशी नाहीत, असा निर्वाळा देत नायडू यांनी महाभियोग प्रस्ताव अमान्य केला.

मात्र, ज्यांच्यावर आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप झाले ते न्या. रामस्वामी हेही महाभियोगातून निसटले. ते पंजाब-हरयाणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश असताना त्यांनी आपल्या सरकारी निवासस्थानाचे नूतनीकरण करण्यासाठी अव्वाच्या सव्वा खर्च केला असल्याची वृत्ते १९९० साली प्रकाशित होऊ लागली. घरातील फर्निचरपासून वातानुकूलित यंत्रे, गालिचे, सोफा यांवर त्यांनी वारेमाप खर्च केला होता. सरकारी वाहन खाजगी कामांसाठी वापरत असल्याचा आरोप झाला होता. अर्थात हे आरोप झाले त्यावेळी न्या. रामस्वामी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून कार्यरत होते. तेव्हा तत्कालीन सरन्यायाधीश सव्यसाची मुखर्जी यांनी न्या. रामस्वामी यांना न्यायदानाच्या कामापासून दूर राहण्याचे निर्देश दिले. १९९१ साली नवव्या लोकसभेच्या विसर्जनापूर्वी १०८ खासदारांनी न्या. रामस्वामी यांच्याविरोधात महाभियोग चालविण्याचा प्रस्ताव लोकसभा सभापतींना दिला. त्यानुसार चौकशी समिती नेमण्यात आली. मात्र तोवर निवडणुका झाल्या होत्या आणि पी. व्ही. नरसिंह राव यांच्या नेतृत्वाखाली नवीन सरकार सत्तेत आले होते. तेव्हा तोच महाभियोग प्रस्ताव चर्चेला आला. सुरुवातीस काँग्रेसने आपल्या खासदारांना प्रस्तावावर आपल्या सदसद्‌विवेकबुद्धीनुसार मतदान करण्याची मुभा दिला होती; पण नंतर काँग्रेस खासदारांनी मतदानात भाग घेऊ नये, अशा सूचना दिल्या. परिणामी प्रस्तावाच्या बाजूने १९६ तर मतदानात भाग न घेतल्याची संख्या २०५ अशी होती. महाभियोग प्रस्ताव बारगळला. आता काँग्रेस न्यायव्यवस्थेच्या स्वायत्ततेच्या कितीही आणाभाका घेत असली, तरी १९९३ साली काँग्रेसने भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या एका न्यायाधीशाला वाचवले होते, हे विसरून चालणार नाही. याच रामस्वामी यांनी नंतर सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून आपला कार्यकाळ पूर्ण केला; पुढे ते राजकारणात उतरले आणि अण्णाद्रमुकचे उमेदवार म्हणून वायको यांच्याविरोधात १९९९ साली लोकसभा निवडणूक लढविली. ते पराभूत झाले हे खरे; पण भ्रष्टाचाराचे एवढे आरोप होऊनही त्यांच्या केसालाही धक्का लागला नाही, हे मात्र निश्चित. सिक्कीम उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश असलेले न्या. दिनकरन यांच्यावरही २०११ साली भ्रष्टाचार आणि जमीन हडपण्याचे आरोप झाले होते. राज्यसभेच्या ७५ खासदारांनी महाभियोग प्रस्ताव दिला होता. त्यानंतर चौकशी समिती नेमण्यात आली होती. महाभियोग प्रस्ताव राज्यसभेत २०१२ साली चर्चेला येणार होता; त्यापूर्वीच न्या. दिनकरन यांनी राजीनामा दिला.

ज्यांच्यावर महाभियोग चालला असे न्यायाधीश म्हणजे कोलकाता उच्च न्यायालयाचे न्या. सौमित्र सेन. १९९३ साली दोन उद्योगांमधील वादावर सुनावणी न्या. सेन यांच्या न्यायालयात झाली. त्यानंतर तोडगा निघाला तरी न्या. सेन यांच्या बँक खात्यांत अचानक पैसे जमा झाल्याचे आणि ती रक्कम ३२ लाखांची असल्याचे उघडकीस आले. सरन्यायाधीश बालकृष्णन् यांनी स्थापन केलेल्या चौकशी समितीने आपला अहवाल दिल्यानंतर न्या. बालकृष्णन् यांनी २००९ साली न्या. सेन यांच्याविरोधात महाभियोग चालविण्यात यावा, अशी शिफारस केली. राज्यसभा अध्यक्षांनी नियमानुसार समिती स्थापन केली. अखेरीस हा महाभियोग प्रस्ताव २०११ साली चर्चेला आला आणि १८९ विरुद्ध १७ मतांनी संमत झाला. त्यानंतर महाभियोग प्रस्ताव लोकसभेत चर्चेला जाणे अपेक्षित होते. पण बहुधा पुरेशी नामुष्की झाल्याची जाणीव झाल्याने न्या. सेन यांनी राजीनामा दिला. मात्र, त्याचा परिणाम त्यांच्या निवृत्तिवेतन व संबंधित लाभांवर झाला नाही. २०१२ साली माहिती अधिकाराखाली मिळालेल्या माहितीवरून हे स्पष्ट झाले. न्या. वर्मा यांनी पदावरून पायउतार होण्यास नकार देणे हे आश्चर्यकारक. बहुधा तसे केले तर आरोप मान्य केल्यासारखे होईल, असे भय त्यांना असावे. पण हे भय महत्त्वाचे की न्यायाधीश पदाची इभ्रत आणि नैतिकता जास्त महत्त्वाची हा कळीचा मुद्दा आहे. आपल्या देशाला रामशास्त्री प्रभुणेंसारख्या निर्भय आणि नि:स्पृह न्यायाधीशांचा वारसा लाभला आहे. ‘न्यायाधीशाचे मूल्यांकन केवळ त्याच्या निर्णयांच्या गुणवत्तेवरूनच होत नाही तर त्याच्या चारित्र्याच्या गुणवत्तेवरून केले जाते. न्यायाधीशाच्या सार्वजनिक आणि वैयक्तिक जीवनातही नि:स्पृहता दिसून आली पाहिजे’, असे २०१९ साली एका सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने म्हटले होते. एका अर्थाने न्यायालयाने वर्मावरच बोट ठेवले होते. त्यामुळेच न्या. वर्मा यांच्यावर कोणती कारवाई होणार, याची प्रतीक्षा आहे. ▮

९८२२८२८८१९

## गुंतवणूक

# भावनेने नव्हे, विचाराने निर्णय घ्यावा


**अजय वाळिंबे**

जागतिक तसेच देश पातळीवर वेगवान घडामोडी घडताना शेअर बाजारात तरंग उठणे स्वाभाविक आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तानदरम्यान उद्‌भवलेली युद्धजन्य स्थिती, त्यानंतरची शस्त्रसंधी बाजारावर परिणाम करून गेलीच, पण दरम्यानच्या काळातील चीन आणि अमेरिकेदरम्यान निर्माण झालेले आर्थिक मैत्र आणि दुसरीकडे भारत आणि इंग्लंडमधील मुक्त व्यापाराचे धोरण या सर्वांचा भारतीय अर्थव्यवस्थेवर तसेच भांडवली बाजारावर झालेला परिणाम अनुभवास आला.

लक्षात घेण्याजोगा पहिला आणि अत्यंत महत्त्वपूर्ण मुद्दा म्हणजे परिस्थिती कोणतीही असली, तरी भारताचा विकास दर सातत्याने चांगला राहिला आहे. तो कधीही सहाच्या खाली आलेला नाही. म्हणजेच अमेरिकेचे बदललेले परराष्ट्र धोरण, त्यांनी लादलेले निर्बंध, मोठ्या कंपन्यांची बरी-वाईट कामगिरी, राजकारणातील अस्थिरता हे सगळे असूनही भारताचा विकास दर सहा ते सव्वा सहा टक्क्यांच्या आसपासच राहिला आहे. अनेक अर्थतज्ज्ञांनी विकास दर कायम राहण्याचे भाकीत वर्तविले आहे. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे या सरकारने आधीपासून उत्पादन आणि पायाभूत सुविधा या क्षेत्रांना महत्त्व दिले आहे. या वर्षीच्या केंद्रीय अर्थसंकल्पातही यासाठी मोठा निधी राखीव ठेवण्यात आला आहे. गेल्या पाच वर्षांचा विचार केला तर सरकारच्या या धोरणात सातत्य दिसून येते. त्यामुळेच वित्तीय तूट असूनदेखील भारत प्रगती करताना दिसतो. विकास कामांवर होणारा खर्च वाढवण्याचा तो दृश्य परिणाम म्हणता येईल. खेरीज पब्लिक-प्रायव्हेट पार्टनरशिप वाढवण्याचेही हे फलित आहे. म्हणूनच एखाद्या घटनेमुळे अल्पकालीन परिस्थितीमध्ये शेअर बाजारात चढउतार दिसले तरी दीर्घकाळाचा विचार करता भारतीय बाजारातील स्थिती मजबूत राहील, यात शंका नाही.

गेल्या काही दिवसांमध्ये जागतिक बाजारपेठेवर अनेक घटनांचा ताण होता. अजूनही आंतरराष्ट्रीय युद्धसदृश वातावरणामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठ तणावाखाली आहे. मात्र आता रशिया-युक्रेनदरम्यान युद्धविराम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. ही बाब दोन्ही देशांनी मान्य केल्यामुळे कदाचित परिस्थिती निवळू शकते. अलिकडेच आपण इंग्लंडबरोबर मुक्त व्यापार धोरणाचा मार्ग स्वीकारला. ही अत्यंत मोठी आणि महत्त्वपूर्ण बाब आहे, कारण व्यापारात या दोन्ही देशांचे शुल्क समसमान राहील. हे दर दोन्ही देशांच्या परस्पर संमतीने ठरवण्यात येतील. आपल्याला याचा निश्चितच मोठा फायदा होईल, कारण ‘ब्रेक्झिट’नंतर इंग्लड हा व्यापारीदृष्ट्या स्वतंत्र देश आहे. युरो हे त्यांचे चलन नाही. याचा फायदा आपल्याला मिळेल. आगामी काळात अन्य राष्ट्रांशीही आपले संबंध सुधारण्याची शक्यता आहे. हीच स्थिती कायम राहिल्यास अमेरिकेने कितीही नखरे दाखवले तरी भारतीय अर्थकारणावर फारसा परिणाम होणार नाही.

नुकतेच अमेरिकेने चीनवर लादलेले भरमसाट आयात शुल्क कमी करण्याचे सुतोवाच केले. अर्थात त्याची अंमलबजावणी होण्यासाठी काही काळ जावा लागेल. मात्र या घटनेचाही भारतावर अनुकूल परिणाम होताना दिसेल. अमेरिकेने चीनवरील टेरिफ ८० टक्क्यांपर्यंत खाली आणल्याचा एक परिणाम म्हणजे चीनकडून भारतीय बाजारात होणारे ‘डम्पिंग’ कमी होईल. अमेरिकेने ३०० वा ३४० टक्क्यांपर्यंत आयात शुल्क वाढवल्यामुळे आत्तापर्यंत चीनला भारतीय बाजारात माल ओतत राहण्याखेरीज उपाय नव्हता. भारताची मोठी लोकसंख्या आणि मोठी बाजारपेठ



त्यांच्यासाठी महत्त्वाची होती. याचाच परिणाम म्हणून आताही ग्राहकांनी मुंबई वा अन्य मोठ्या शहरांमधील बाजारपेठेत फेरफटका मारल्यास चिनी उत्पादनांची भरताड दिसेल. सध्या त्यांच्या मालाने बाजार तुडुंब भरले आहेत. स्वाभाविकच उत्पादने अगदी नाममात्र किमतीत उपलब्ध आहेत. ग्राहकांसाठी ही समाधानाची बाब असेलही, पण त्यामुळे ‘मेक इन इंडिया’ मोहिमेवर विपरीत परिणाम होणे स्वाभाविक आहे. म्हणूनच अमेरिका-चीन व्यापार धोरणांमधील सामंजस्याचा चांगला परिणाम होईल.


अमेरिकेच्या बदलत्या धोरणांमुळे जगाने ट्रेड वॉर अनुभवले. ते वाढण्याचा मोठा धोकाही होता. खरे सांगायचे तर, तो युद्धापेक्षा भयंकर होता. मात्र ट्रम्प यांनी थोडीफार माघार घेतल्यामुळे सध्या तरी याचा चांगला परिणाम बघायला मिळेल. सध्या तो बघायला मिळतही आहे. तणाव कमी होताच निर्देशांक २८०० अंकांनी वाढणे हे त्याचेच द्योतक म्हणावे लागेल. अर्थात यात सातत्य राहील की नाही हे कोणीही सांगू शकणार नाही. पण एक गोष्ट निश्चित की, सद्य:स्थिती भारतीय बाजारासाठी सकारात्मक आहे. गुंतवणूकदारांनी सावध राहून व्यवहार केले तर नुकसान संभवत नाही. युद्धजन्य स्थिती कायम राहिली असती तर गुंतवणूकदारांनी आपली गुंतवणूक काढून घेतली असती. बँकिंग, ऊर्जा आणि पर्यटन क्षेत्राला याचा नकारात्मक परिणाम व्हायला लागलाच होता. या क्षेत्रातील कार्यरत कंपन्यांचे स्टॉक्स पडले होते. यातच सोन्याच्या किमती प्रचंड प्रमाणात वर गेल्या. जगातील अनिश्चितता सोन्याच्या किमतीतील वाढीला नेहमीच प्रोत्साहित करते. या सगळ्या पृष्ठभूमीवर गुंतवणूकदारांनी भावनेवर निर्णय न घेता संयमाने कृती करणे गरजेचे आहे, असे वाटते. सध्या लोकांनी मूल्याधारित गुंतवणुकीवर भर द्यावा. म्हणजेच आर्थिक स्थिती मजबूत असणाऱ्या कंपन्यांमधील गुंतवणूक टिकवून ठेवावी. एसआयपी बंद करणे योग्य नाही. ते सुरूच ठेवले पाहिजे. पोर्टफोलिओमध्ये वेगवेगळ्या प्रकारची गुंतवणूक हवी. म्हणजेच शेअर्स, बाँड्स, म्युच्युअल फंड आणि सोने या सगळ्यामध्ये काही ना काही रक्कम गुंतवण्याचे ध्येय ठेवायला हवे. सध्याचा काळ लक्षात घेता प्रत्येकाने आपत्कालीन निधी ठेवावा. समजा, एखाद्याकडे सगळे खर्च वजा जाता १०० रुपये उरत असतील तर ते सगळे गुंतवणे योग्य असले, तरी त्यातील १० रुपये कायम रोख स्वरूपात असायला हवेत. उरलेली रक्कम विमा, आरोग्य विमा, पीपीएफ, शेअर्स, बाँड्स, गोल्ड यात गुंतवणे योग्य ठरेल.

सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे प्रत्येक गुंतवणुकीत सातत्य राखणे गरजेचे आहे. कोणतीही स्थिती कायमस्वरूपी नसते. या न्यायाने सध्याची जागतिक तणावाची स्थितीही कायम राहणार नाही. लवकरच ती बदलेल. तेव्हा हा काळ संयम, दीर्घकालीन दृष्टिकोन आणि योग्य निर्णय घेण्याचा आहे हे ओळखायला हवे. जगात काहीही घडले तरी देशात कोणती क्षेत्रे सुरक्षित राहू शकतात, याचा अभ्यास करून गुंतवणूक केली पाहिजे. यालाच आपण ‘डिफेन्सिव्ह स्टॉक्स’ असे म्हणतो. यात उपभोग्य वस्तू, फॉर्मास्युटिकल्स, आरोग्यरक्षण, तंत्रज्ञान आणि गॅस, पॉवर तसेच संरक्षण या क्षेत्रांचा समावेश होतो. तेव्हा यातील गुंतवणूक आर्थिक हित धोक्यात आणणार नाही, याची खात्री बाळगावी. सध्या मीडकॅप, स्मॉलकॅपपेक्षा लार्जकॅपवर जास्त लक्ष ठेवले पाहिजे. यात मल्टी असेट म्युच्युअल फंडला प्राधान्य देता येईल. कारण ते बाँड, स्टॉक आणि सोने या तिन्हीतही गुंतवणूक करतात. गुंतवणूकदारांना याचा खात्रीने फायदा होऊ शकतो. सगळ्यात महत्त्वाची बाब म्हणजे कोणतीही गुंतवणूक एकदम करू नये. ती टप्प्याटप्प्यात करायला हवी. म्हणजेच एखाद्याने एक लाख रुपये गुंतवणुकीसाठी बाजूला काढले असतील तर ते कोणत्याही योजनेत एकदम टाकू नयेत. त्याचे तीन वा चार भाग करून त्यानुसार गुंतवत जावे. एखादा शेअर शोधल्यास एकदम सगळे पैसे न घालवता टप्प्याने गुंतवल्यास फायदा होईल, हे लक्षात घ्यायला हवे. ▮

(लेखक प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ आहेत.)

## रविवारची पत्रे

### कृत्रिम बुद्धिमत्ता आणि शिक्षक



कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) जगभरातील अनेक क्षेत्रांमध्ये क्रांती घडवत आहे. शिक्षण क्षेत्रही त्याला अपवाद नाही. वैयक्तिककृत अभ्यासक्रम, त्वरित मूल्यांकन आणि संवादात्मक शिक्षण अशा सुविधा एआय उपलब्ध करून देत आहे. त्यामुळे एक प्रश्न समोर येतो ‘एआय शिक्षकांची जागा घेऊ शकतो का?’ अनेक फायदे असूनही उत्तर स्पष्ट आहे ‘नाही. एआय एक प्रभावी सहायक ठरू शकतो, परंतु शिक्षकाची जागा घेऊ शकत नाही.’ स्वामी चिन्मयानंद म्हणतात, ‘विद्यार्थी म्हणजे भरायची भांडी नव्हेत, तर पेटवायचे दिवे आहेत. शिक्षण हे केवळ माहिती देणे नव्हे, तर विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा, आत्मविश्वास आणि करुणेची ज्योत प्रज्वलित करणे आहे. एआय अमर्याद माहिती देऊ शकतो, परंतु प्रेरणा देऊ शकत नाही, मार्गदर्शन करू शकत नाही किंवा आत्मोन्नतीकडे नेऊ शकत नाही. खरी शिक्षण प्रक्रिया ही परिवर्तनात्मक असते.’

चिन्मय व्हिजन कार्यक्रमानुसार शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि आध्यात्मिक विकासाची समग्र प्रक्रिया आहे. हे शिक्षण भारतीय संस्कृती, देशभक्ती, वसुधैव कुटुंबकम् आणि मूल्याधारित जीवनशैली यावर भर देते. ही मूल्ये केवळ संगणकीय प्रणालीद्वारे शिकवता येत नाहीत. त्यासाठी शिक्षक आवश्यक असतो; जो हे मूल्य स्वत: जगतो आणि विद्यार्थ्यांपर्यंत शब्द, कृती आणि संबंधांद्वारे पोहोचवतो. एआय ही एक यंत्रणा आहे, जी कार्यक्षम आणि सातत्यपूर्ण आहे. तिच्यात संवेदनशीलता किंवा सहानुभूती नसते. एखादा विद्यार्थी चिंतेत आहे की घाबरलेला आहे, हे एआय समजू शकत नाही. शिक्षक मात्र सहज लक्षात घेतो आणि प्रेमाने, काळजीने प्रतिसाद देतो. ही भावनिक साथ विद्यार्थ्यांच्या आत्मसन्मानासाठी आणि मानसिक ताकदीसाठी अत्यावश्यक आहे. शिक्षण हे केवळ अभ्यासापुरते मर्यादित नाही. संवादकौशल्य, सहकार्य, सर्जनशीलता आणि समस्यांचे समाधान या जीवनकौशल्यांचे शिक्षण आवश्यक झाले आहे. ही कौशल्ये एआय शिकवू शकत नाही. त्यासाठी लागते मानवी संवाद, प्रत्यक्ष अनुभव आणि वैयक्तिक मार्गदर्शन; जे शिक्षक सहजपणे देऊ शकतो.

शिक्षक हे विद्यार्थ्यांसाठी जिवंत आदर्श असतात. शिक्षकाची भूमिका केवळ वर्गात शिकवण्यापुरती मर्यादित नसते. विद्यार्थ्यांची कौटुंबिक पृष्ठभूमी, भावनिक स्थिती आणि सामाजिक पर्यावरण समजून घेणे हे शिक्षकाचे कर्तव्य असते. शिक्षणात खेळ आणि सहशालेय उपक्रमांचे महत्त्वाचे स्थान आहे. संघभावना, शिस्त, समायोजन आणि मानसिक मजबुती या कौशल्यांचा विकास त्यातून होतो. एआय गुणांकन करू शकतो, पण संकटात साथ, पराभवानंतर प्रेरणा आणि सकारात्मक वृत्ती शिकवू शकत नाही. हे शिक्षकच प्रभावीपणे शिकवतो.

एआय हे सहायक साधन म्हणून स्वागतार्ह आहे. ते शिक्षण अधिक परिणामकारक, सुलभ आणि वैयक्तिक बनवू शकते. पण शिक्षण ही मनाची कला आहे; सांकेतिक शब्दकोड नाही. शिक्षक हे अद्वितीय मार्गदर्शक आहेत, जे विद्यार्थ्यांना ज्ञान, विवेक आणि चारित्र्याच्या वाटेवर नेतात. स्वामी चिन्मयानंदांनी म्हटल्याप्रमाणे, शिक्षणाचा हेतू केवळ उपजीविका नव्हे, तर मूल्याधारित हेतुपूर्ण जीवन घडवणे आहे. हे महान कार्य केवळ शिक्षकच करू शकतो.

**डॉ. किशोर कुलकर्णी**/९८२६२०६५२०

### लग्न संगीताचे सूर... शिस्त व वेळेतच हवे!

लग्न हा प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यातील एक अविस्मरणीय सोहळा असतो. आनंद, उत्सव, नव्या आयुष्याच्या सुरुवातीचा क्षण यासाठी घरातील प्रत्येक जण मनापासून सज्ज असतो. हसणं, खेळणं, नाचणं, आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे ‘संगीत’ हे या क्षणांना अधिक रंगतदार बनवतं. परंतु आजकाल या ‘संगीत’ नावाच्या कार्यक्रमाने जणू काही शिस्तीच्या आणि वेळेच्या चौकटीच मोडून टाकल्या आहेत. लग्न समारंभातील रात्री उशिरापर्यंत चालणारे डीजे आणि मोठ्या आवाजातील बॅण्ड वाजवण्याची पद्धत समाजात एक अघोषित परंपरा बनू लागली आहे. ही परंपरा आता प्रश्नचिन्हासारखी वाटू लागली आहे.

संगीताचा उपयोग आनंद व्यक्त करण्यासाठी आहे, हे खरे आहे. पण या आनंदाला वेळेची आणि सभ्यतेची मर्यादा असावी लागते. अनेक वेळा आपण पाहतो की, लग्नातील संगीत रात्रभर चालू असते. लोक उशिरापर्यंत नाचतात, गातात आणि मोठ्या आवाजात आवाज वाढवत जातात. यामुळे आजूबाजूच्या नागरिकांना त्रास होतो, वृद्धांची झोपमोड होते, लहान मुलं अस्वस्थ होतात आणि रुग्ण असलेल्यांना याचा मोठा त्रास सहन करावा लागतो. या सगळ्याकडे आपण जाणूनबुजून दुर्लक्ष करत आहोत. वेळेचे भान हरवून केलेला कोणताही आनंदाचा उत्सव हा इतरांच्या वेदनेचे कारण ठरू शकतो. जर आपल्या आनंदामुळे दुसऱ्यांना त्रास होत असेल, तर तो आनंद खरा समाधान देतो का? काही वेळा रात्री ११-१२ वाजता किंवा त्याही नंतर डीजे वाजवले जातात. अशा वेळी पोलिस यंत्रणेला हस्तक्षेप करावा लागतो.

प्रश्न असा आहे की, लग्नात आनंद साजरा करताना आपण समाजासाठी असलेल्या कर्तव्यांची जाणीव ठेवतो का? आनंद साजरा करताना जर शिस्त आणि वेळेची जाणीव ठेवली, तर त्या आनंदाला खऱ्या अर्थाने अर्थ प्राप्त होतो. लग्नाच्या संगीताचा हेतू आहे आपले मनोगत आणि उत्साह इतरांशी शेअर करणे, पण यासाठी इतरांची झोप, शांतता आणि आरोग्य धोक्यात घालणं हे योग्य नाही. आधुनिक तंत्रज्ञानाने संगीताची साधनं जरी वाढवली असली, तरी त्याचा वापर विवेकाने आणि मर्यादित करणे आवश्यक आहे.

शेवटी, समाज म्हणजे एकत्र नांदणाऱ्या व्यक्तींचं चित्र असतं. आपली प्रत्येक कृती इतरांवर परिणाम करते. आपण समाजाचाच एक भाग आहोत हे लक्षात घेऊनच आपले कार्यक्रम पार पाडले पाहिजेत. कायद्याने रात्री १० नंतर ध्वनिप्रदूषणाची मर्यादा घालून दिली आहे, ती काही चुकीच्या हेतूने नाही. तिचा सन्मान करणे हे आपले कर्तव्य आहे.

आपण आपले संगीत प्रेम, नृत्य आणि आनंद या सर्व गोष्टींना योग्य वेळ आणि योग्य मर्यादेत साजरे केले, तर समाजात सौहार्द आणि सहिष्णुतेची भावना अधिक दृढ होते. आज गरज आहे ती केवळ आनंद साजरा करण्याची नाही, तर तो आनंद इतरांसोबत शेअर करतानाही सभ्यतेचा विचार करण्याची. कारण संगीताचा आवाज जरी क्षणिक असतो, पण त्याचा प्रभाव अनेकांच्या मनावर कायम राहू शकतो. आता विचार करा तुमचं संगीत इतरांच्या वेदनेचं कारण तर बनत नाही ना?

**सचिन चव्हाण**/९१५८३९३२६०

### आपणचि केली आपली फसगत

उद्या रविवार म्हणजे आमचा सुटीचा दिवस म्हणून निवांत झोपलो होतो. सकाळी उठण्याची लगबग नाही म्हणून आनंदात होतो. परंतु म्हणतात ना, सुख भोगणे हेही दैवात असावं लागतं.

सौ.ने मला झोपेतून गदागदा उठविले. मी दचकून उठलो. डोळे चोळत थोडं अंथरुणात बसलो तर पुन्हा वीज कडाडली. ‘‘अहो, उठा, किती वेळ असं बसू राहणार? चहा झालाय् किती वेळचा, बाहेर जा अन् ते डोक्यावरचं ओझं थोडं कमी करून कलप लावून, ते सगळे पांढरे झालेले ब्रशसारखे केस नीट करून या. उद्याच माझ्या बहिणीकडे जायचं आहे, तेव्हा हे असं ध्यान बरं दिसतं का?’’ ‘‘हो, हो किती ही विनाकारणची टकळी बस कर आता’’ अन् तो समोर आलेला चहा घशाखाली उतरविला (बेड टीची फॅशन म्हणून तोंड धुण्याआधीच चहा घ्यायचा असतो) तिच्या म्हणण्याप्रमाणे आता बाहेर जायचं, तिच्या म्हणण्याप्रमाणेच सर्व काही करायचे हे नेहमीचेच. थोडं विचारांची दिशा बदलली अन् ते विचार मनात घोंघावू लागले.

वाटलं हिच्या बहिणीकडे जायचं म्हणून, केस काळे करायचे, व्यवस्थित दिसायचं म्हणजे मी खरंच अव्यवस्थित दिसतो का? अन् हिलाच की इतरांनाही? नाही, नाही ही सर्व त्या दिसण्यासाठीही धडपड अन् हे पांढरे झालेले केस तिने पाहिले नसावे का? आणि खरंच आम्ही जन्माला आलो तेव्हा, डोक्यावर केस नव्हतेच मुळी, तोंडात दात नव्हते, डोळ्यात तेज नव्हतं अन् हातापायात तर ताकद नव्हतीच. आईनं तर चालायला शिकविलं. दाईबाईनं शरीर सुदृढ बनविलं अन् आता खरंच ज्याने हे सर्व दिले, त्याने ते परत घेऊच नये हा कोणता हट्ट? अन् घेतलं तर वावगं ते काय? औषध नाही का काही काळानंतर अकार्यक्षम होतं (एक्सपायरी) तसं आमचं नसेल कशावरून?

पायातली शक्ती कमजोर होणं, गुडघे दुखणं, डोळ्यांनी कमी दिसणं, केस पांढरे होणे (अजून टक्कल नाही, हे त्याचेच उपकार) भरीसभर तोंडातील दातांनीही आपली जागा सोडणं, मला वाटते ते आताशा, आपसात भांडायला लागलेत. असो. मग त्याने ‘‘आता तुला चलायचं’’ ही अशी आगाऊ सूचना तर दिली नसावी? मग तो आधी सूचना देतोय् हे गैर कसलं? पण नाही, त्याच्याही सूचनेकडे दुर्लक्ष करायचं, केस काळे करून, तोंडात नकली दाताची कवळी बसवून, डोळ्यांना चष्मा लावून आणि आता तर म्हणे अधिक तरुण दिसण्यासाठी ब्युटी पार्लर नावाचं नवीनच फॅड आलंय् बाजारात परत.

एवढे केल्यावर त्या सृष्टीच्या निर्माणकर्त्याला आम्ही फसवतोय् असं नाही का वाटत? अन् एवढा तो न समजण्याइतका भोळा असेल का? निश्चितच नाही. मग काही अकस्मात घडलं की त्याच्याच नावानं ओरडायचं, अहो हा कसा गेला? इतक्या लवकर, चांगला तरुण तर होता. (खरंच तो तरुण नव्हता, दिसत होता) ज्यानं तुम्हाला भरभरून दिलं, तो ते परत घेणारच, एवढं साधं गणित आपणाला समजू नये? विचारांची शृंखला संपतच नव्हती अन् लगेच पत्नीनं चिडून, माझ्या अंगावरची शाल ओढून मला जवळजवळ बाहेर काढलंच. तिच्या म्हणण्यासारखं जवान होऊन परत यायला उठलो. म्हटलं, चला आता वेळ करू नये. केस बारीक करून, काळे करून परत घरी आलो. आता सर्वांना मी तरुण दिसणार म्हणून तो खोटा आनंद उपभोगतानाच गुणगुणत होतो,

झाले जीर्ण मनी मनोरथ पहा, मी वंचलो यौवना
होते जे गुण सर्वही, विफलते झाले गुणज्ञा विना
युक्त युक्त विचार काल न करी निशंक सर्वात्मना
आता हे सुचते दुजी गती नसे गौरीव पायाविणा

**लक्ष्मण कुन्हेकर**/९५४५११२६४६

### गावाकडची माणसं

शहरापासून दूर निसर्गानी वेढलेला परिसर येथे वसलेली लहान लहान गावं यास आपण ग्रामीण भाग म्हणतो. या ग्रामीण भागात वास्तव्यास असलेले लोक निसर्ग सान्निध्याच्या अनुकूल प्रभावामुळे स्वभावाने साधी सरळ असतात. राहणीमानात कुठेही भपकेपणा नसतो. वागणे, बोलणे व व्यवहारात नैसर्गिकता असते, कारण निसर्गात हे ग्रामीण लोक बालपणापासून रमलेले असल्याने त्यांचे निसर्गाशी जिव्हाळ्याचे नाते जुळले असते तसेच काळ्या मातीशी नाळ जुळलेली ही माणसे जीवजंतू, पक्षी, पाखरे, प्राणी यांच्यावर जीव लावणारी असतात. कुटुंबातील सदस्यांप्रमाणेच घरात पाळले गेलेले पाळीव पशू-पक्षी, प्राणी, गुरेढोरे यांचे संरक्षण आपुलकीने व जबाबदारीने करतात. मायेने जपणूक करताना अस्सल गावशैलीत संवाद साधतात. त्यामुळे या मुक्या जनावरांशी त्यांची गट्टी जमलेली असते. संपूर्ण गावाशी सलोख्याचे संबंध जोपासत ही माणसं एकमेकांच्या सुख-दु:खात हिरिरीने भाग घेतात.



गावातील धार्मिक उत्सव असू दे की कौटुंबिक सोहळा एकमेकांना पुरेपूर सहयोग करून कार्यक्रमाचा मनसोक्त आनंद मिळूनमिसळून लुटतात. एकलकोंडेपणा या शब्दाचा अर्थ कदाचित या गावकऱ्यांना माहितीही नसेल. एखाद्या कुटुंबात दु:खाची सावली पडली की कोरडे सांत्वन नव्हे तर आपुलकीच्या ऊबदार छताखाली आसरा देऊन आधाराचे पांघरूण घालतात. गावखेड्यातील लोकांची जीवनशैली नित्यनियमाने ठरलेली असते. पहाटे तांबडे फुटायच्या आधीच दिनचर्येला सुरुवात करून आपल्या उपजीविकेच्या तयारीला लागतात. उगवता सूर्य या गावकऱ्यांना रोज नव्याने ऊर्जा देत असतो आणि मावळता सूर्य दिवसभराच्या श्रमाने थकलेल्या शरीराला निपचित करून शांत झोप देत असते. प्रामुख्याने शेतीव्यवसाय व इतर लहानसहान कार्य करून सुखासमाधानाने संपूर्ण आयुष्य घालवणारी ही गावाकडची माणसं मोठे स्वप्न बघण्याचे साधे धाडसही करीत नाही. मनोरंजन क्षेत्र काय व कसे असते हे न जाणणारे लोक निवांत क्षणी चावडीत बसून गप्पा मारताना एकमेकांचे सुख-दु:ख वाटून घेतात. बरेचदा यांचा चर्चेचा विषय असतो पीक-पाणी, निसर्ग विपदा यामुळे उत्पादनावर झालेली हानी, डोक्यावरील कर्जाचा बोझा, कुटुंबातील लहानमोठ्या समस्या याहून विषय पुढे गेलाच तर गावातील सुखसुविधांची गैरसोय जसे अशुद्ध पाणी, आरोग्य केंद्रातील गैरसोय, वीज पुरवठा खंडित होणे वगैरे. देशाच्या राजकारणाविषयी चर्चा या गावकऱ्यांमध्ये फारशी नसतेच. निवडणुकीच्या दिवसात झाली बस तेवढीच.

पारंपरिक संस्कृती जपणारी ही माणसं धर्म संस्कृती पाळणारी असतात. त्यामुळे पारंपरिक सणांना धरून असतात.

गावकऱ्यांना गावाच्या वेशीवरूनच
दिसतो निसर्ग सारा
पक्षी पाखरं प्राणी रानावनात घालतात येरझारा
निसर्गाचे ऋणी ही गावकरी
सृष्टी-सन्निध्यात
मिळतो स्वच्छ निरोगी वारा

**शीला श्रीकांत पवनीकर**/७२७६६१२५१६

### अहल्यादेवी होळकरांचे सुशासन आणि सामाजिक समरसता

अहल्यादेवी होळकर हे नाव उच्चारताच आपल्या डोळ्यासमोर जी प्रतिमा तयार होते ती म्हणजे श्वेतवस्त्र धारण केलेली, डोक्यावर पदर घेतलेली, करारी चेहरा असलेली आणि हातात शिवलिंग घेऊन उभी असलेली एक सात्त्विक मूर्ती.. ज्या मनगटात बळ, बुद्धी आणि चातुर्य आहे, तोच स्वकर्तृत्वावर लोकाभिमुख राजा बनू शकतो असा संदेश देणाऱ्या व ज्यांच्या कृतिशील कार्याचा उल्लेख भारताच्या इतिहासात सोनेरी अक्षराने केला जातो अशा लोकमाता पुण्यश्लोक अहल्यादेवी होळकर. सर्वधर्मसमभाव, अस्पृश्यता उच्चाटन, सामाजिक एकात्मता, गोरगरिबांविषयी कळवळा, हुंडा पद्धतीचे निर्मूलन, अनिष्ट चालीरीती रूढी परंपरांचा बीमोड, प्रजेविषयी तळमळ असे कितीतरी समाजसुधारक कार्य करणाऱ्या लोकमाता अहल्यादेवी होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी या छोट्याशा खेड्यात धनगर समाजातील माणकोजी व सुशीलाबाई शिंदे यांच्या पोटी झाला. माणकोजी शिंदे हे दूरदर्शी स्वभावाचे असल्याने अठराव्या शतकामध्ये आजच्या सारखी शिक्षणाची साधने उपलब्ध नसताना देखील त्यांनी अहल्येला शिक्षणाची घरीच व्यवस्था केली.

अवघ्या आठ वर्षांची असतानाच होळकर घराण्याचे संस्थापक राजर्षी मल्हारराव होळकरांचा बारा वर्षाचा एकुलता एक शूरवीर मुलगा खंडेराव यांच्याशी अहल्याचा विवाह २० मे १७३३ रोजी पुण्यातील शनिवारवाडा येथे झाला. लग्नानंतर लगेच आपल्या चतुर, क्षमाशील व शांत स्वभावाने त्यांनी कुटुंबातील सर्वांची मने जिंकून घेतली. त्यांना मालेराव व मुक्ताबाई अशी दोन अपत्ये झाली. दूरदृष्टी ठेवून मल्हाररावांनी देखील पुरुषप्रधान संस्कृतीच्या काळातही सुनेला तत्कालीन दरबाराची मोडी मराठी लिहिणे, वाचणे, गणित इत्यादी गोष्टी शिकवल्या. तसेच घोड्यावर बसणे, दांडपट्टा फिरवणे, युद्धाचे व राजकारणाचे डावपेच आखणे, लढाया करणे, पत्रव्यवहार करणे, न्यायनिवाडा करणे इत्यादी प्रशिक्षण दिले.

इ. स. १७५४ मध्ये कुंभेरीच्या लढाईत अहल्यादेवींचे शूरवीर पती खंडेराव यांना वीरमरण आले. वयाच्या अवघ्या २९ व्या वर्षी वैधव्य आले असताना जुन्या रूढी परंपरेनुसार सती जाण्याचे नाकारून त्यांनी पुरोगामित्वाचा परिचय दिला. सती न जाणे म्हणजे आयुष्यभर लोकनिंदा व चारित्र्यावर शिंतोडे हे माहिती असूनही सती जाणे तहकूब करण्यात अहल्यादेवींनी जे मनोधैर्य दाखवले ते अद्वितीय आहे. आपण सती गेलो तर स्वर्ग मिळेल किंवा नाही कोण जाणे. परंतु जगलो तर लाखो प्रजाजनांना सुख देता येईल असा विचार करून त्यांनी प्रजेच्या हितासाठी जगण्याचा निर्णय घेतला व धर्म, रूढी, परंपरा यापलीकडे कर्तव्य महत्त्वाचे समजून रयतेला कल्याणकारी राज्य दिले.

माळव्याच्या होळकर घराण्याची पुत्रवधू, कुशल सुशासक अहल्यादेवी होळकर यांचे हे त्रिशताब्दी जयंती वर्ष आहे. नुकतेच राज्यातील महायुती सरकारने १३ मार्च २०२४ रोजी अहमदनगरचे नाव अहल्यादेवी नगर करण्याचा निर्णय घेतला. अहल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्ताने अहल्यादेवी होळकर यांचे सामाजिक कार्य व त्यांचे कर्तृत्व समाजमानसात रुजवण्याची व सद्य:परिस्थितीत त्यांच्या उपकारांची दखल घेण्याची नितांत गरज आहे.

मुघलांनी भारत मातेवर केलेल्या क्रूर आक्रमणानंतरही आज भारतात जी हिंदू संस्कृती आणि मंदिरे टिकून आहेत यामध्ये अहल्यादेवींचा खूप मोलाचा वाटा आहे, हेच त्यांच्या जीवनचरित्रातून दिसून येते. अशा थोर, परोपकारी, धर्मनिष्ठ आणि खऱ्या अर्थाने समाजसेवी सुशासक पुण्यश्लोक अहल्यादेवींना मानाचा मुजरा. ▮

**वीणा रवींद्र आचार्य**/९४२३१७५७१५

## महत्वाचे...



### सिद्धेश्वर इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**सोलापूर, दि. १७ मे-**

श्री सिद्धेश्वर इंग्लिश मीडियम हायस्कूलमध्ये माजी विद्यार्थ्यांचा भव्य स्नेहमेळावा नुकताच एसएसईएमएचएस अलुमनी मिलाप २०२५' उत्साहात पार पडला. १९८७ ते २०१५ या बॅचचे माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने या कार्यक्रमात सहभागी झाले होते. त्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. मैत्रभाव आणि शाळेच्या गौरवशाली परंपरेचा उल्लेख करुन विद्यार्थ्यांनी हा उत्सव साजरा केला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली, ज्यात अंजली तिवारी, योगेश राऊत, अजिंक्यराणा पाटील, हर्षदा महाजन आणि असीम सिंदगी या मान्यवरांनी उपस्थित राहून प्रेरणादायी विचार व्यक्त केले. या स्नेहमेळाव्याचे नियोजन अलुमनी कमिटीने केले होते. यामध्ये हर्षदा महाजन, युगांत सोनवणे, वृषाली चाटला, आरती सूर्यवंशी, रणजित खेराडकर, सावनराज अरोरा, असीम सिंदगी, समीर ठाणे, सुरभी फडणीस सहभागी झाले होते. या दिवशी अनेक मजेदार खेळ, जुन्या शिक्षकांशी झालेल्या गप्पा, शाळेच्या इतिहासाचे दर्शन घडवणारी छायाचित्रांचे प्रदर्शन आणि रुचकर भोजन या गोष्टींनी वातावरण आणखी अविस्मरणीय केले. जुन्या आठवणींनी शाळेचा परिसर पुन्हा एकदा गतकाळात रमला.



### ज.रा.चंडक प्रशालेचा दहावीचा निकाल ७८ टक्के

**सोलापूर, दि. १७ मे-**

ज.रा.चंडक प्रशालेचा माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.१०) फेब्रु/मार्च २०२५ चा निकाल ७८ टक्के लागला आहे. कु सृष्टी गणेश जाधव ही ९२.४० टक्के गुण मिळवून प्रशालेत प्रथम आली. चि आशिष अविनाश गायकवाड हा ९०.८०टक्के गुण मिळवून अनुक्रमे द्वितीय व कु प्रज्ञा नंदेश्वर जगताप ही ८९.८० टक्के गुण मिळवून तृतीय आले.संस्थेच्या मार्गदर्शिका निर्मलाताई ठोकळ, अध्यक्ष सचिन ठोकळ, सचिवा शिल्पाताई ठोकळ यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन सत्कार केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच या प्रसंगी सर्व संचालक मंडळ, मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी सर्वांचे कौतुक व अभिनंदन केले.

# वसंतराव नाईक महामंडळाकडून १५ लाखांपर्यंतच्या कर्जावर व्याज परतावा

## धनगर, बंजारा, वडार समाजांना फायदा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मे**

वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाकडून राज्यातील धनगर, बंजारा, वडारसह अन्य भटक्या विमुक्त जाती-जमातीतील नवउद्योजकांना कर्ज दिले जाते. यापुढे वैयक्तिक कर्जासाठी १० लाखांऐवजी १५ लाखांपर्यंतच्या कर्जावरील व्याजाचा परतावा मिळणार आहे.

यामुळे राज्यातील भटके विमुक्त जाती-जमातीच्या नवउद्योजक तरुणांना याचा फायदा होणार आहे. राज्य शासनाच्या इतर महामंडळांपैकीच वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ आहे. याद्वारे विमुक्त जाती आणि भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील लोकांना विविध कर्ज योजनांसह अन्य सुविधा उपलब्ध करून दिले जातात. या महामंडळाने अनेक लाभार्थ्यांना अर्थबळ देत मदत केली आहे. यापूर्वी दिलेल्या मदतीतून शेतीच्या कामासाठी अनेक तरुणांनी ट्रॅक्टर घेतले आहेत. तर काही तरुणांनी वाहन घेऊन प्रवासी वाहतुकीचा व्यवसाय थाटला आहे.

शिवाय, अनेक तरुण व महिलांनी कापड, किराणा दुकान, विविध वाहनांचे सुटे भाग विक्री यासारखी दुकानेही थाटली आहेत.मात्र, चालू आर्थिक वर्षापासून या महामंडळाकडून १५ लाखांचा व्याज परतावा योजनेतून अर्थसहाय्य केले जाणार आहे. त्यामुळे पात्र तरूणांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**महामंडळाच्या योजना**

- वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना
- गट कर्ज व्याज परतावा योजना:
- एक लाख रुपयांपर्यंत थेट कर्ज योजना:
- २५ टक्के बीज भांडवल योजना

**वसंतराव नाईक महामंडळ नवउद्योजकांसाठी संधी**

वसंतराव नाईक महामंडळाकडून बंजारा समाजातील अनेक तरूणांना स्वयंरोजगारासाठी आर्थिक सहकार्य मिळाले आहे . त्यामुळे नवव्यावसायिकांना व्यवसाय करण्यासाठी संधी उपलब्ध होत आहेत. शिवाय तरूणांना रोजगार उपलब्ध झाल्याने आर्थिक उलाढालही वाढण्यास मदत होणार आहे. महामंडळाकडून अधिकाधिक तरूणांना व्यवसाय करण्यासाठी व्याज परतावा कर्ज देण्यात यावे.

**- निखिल राठोड, सरपंच, बसवनगर**

# २० मे पासून विद्यार्थ्यांसाठी विविध दाखल्यांचे शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि.१७ मे-**

शहरातील आणि उत्तर सोलापूर तालुक्यातील इयत्ता दहावी अणि बारावीचा निकाल लागल्याने पूढील शैक्षणीक प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना जातीचे प्रमाणपत्र, उत्पन्न दाखला, राहिवासी दाखला, आर्थिक दुर्बलघटकांचे प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर तसेच इतर शैक्षणीक दाखले विद्यार्थ्यांना वेळेत देण्यासाठी २० ते २२ मे दरम्यान विविध २० ठिकाणी शिबीराचे आयोजन करण्याबाबत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या सुचनेनुसार उत्तर सोलापूर तहसिलदार निलेश पाटील यांनी कळविले आहे. त्याअनुषंगाने शहरातील तसेच उत्तर सोलापूर ग्रामीण भागामध्ये छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अंतर्गत दाखल्याविषयक शिबीराचे आयोजन केले आहे.

**शिबीराचे स्थळ**

संगमेश्वर कॉलेज, वालचंद कॉलेज, दयानंद कॉलेज, बिराजदार हायस्कूल शेळगी, सोनी कॉलेज, इंडियन मॉडेल स्कूल जुळे सोलापूर, ज.रा. चंडक हायस्कूल बाळे, बी.एम. आय.टी कॉलेज हिरज रोड, बी.एफ. दमाणी स्कूल सम्राट चौक, हरिभाई देवकरण प्रशाला, नेताजी प्रशाला, एस.व्ही.सी.एस प्रशाला भवानी पेठ, एस.व्ही. सी.एस प्रशाला, अक्कलकोट रोड, सेवासदन प्रशाला, भारती विद्यापीठ, सोलापूर सोशल उर्दू हायस्कूल सिद्धेश्वर पेठ, सिद्धेश्वर हायस्कूल सिद्धेश्वर पेठ, एम. ए.पांगल हायस्कूल व कॉलेज सिद्धेश्वर पेठ, न्यू हायस्कूल वडाळा, फुले हायस्कूल मार्डी



# रेशीम शेतीमुळे शेतकऱ्यांना आर्थिक फायदा झाला

**● वस्त्रोद्योगमंत्री सावकारे; हिरज रेशीम पार्क येथे सदिच्छा भेट**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० मे**

तत्कालीन वस्रोद्योग मंत्री तथा आ. सुभाष देशमुख यांच्या प्रयत्नातून रेशीम पार्क मंजुरी करून उभे करण्यात आले आहे. या रेशीम केंद्रामुळे जिल्ह्यातील रेशीम शेतीमध्ये वाढ झाली आहे, रेशीम शेतीमुळे शेतकऱ्यांना आर्थिक फायदा होत असून जिल्ह्यात जास्त प्रमाणात रेशीम लागवड वाढत आहे, असे प्रतिपादन वस्त्रोद्योगमंत्री संजय सावकारे यांनी केले.उत्तर सोलापूर तालुक्यातील हिरज येथील रेशीम पार्कला वस्रोद्योग मंत्री संजय सावकारे भेट देऊन पाहणी केली, त्यावेळी सावकारे बोलत होते.

यावेळी आ. सुभाष देशमुख यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी जिल्ह्यातील रेशीम उत्पादक शेतकरी उपस्थिती होते. हिरज येथे रेशीम कोष खरेदी विक्री या ठिकाणी सुरु केल्यास शेतकऱ्यांच्या उत्पादनाला बाजारपेठ उपलब्ध होईल यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फायदा होईल. रेशीम उत्पादक शेतकऱ्यांसाठी विविध अभ्यासवर्ग आयोजित करण्यात यावेत. या सर्व मागण्यावर मंत्रालय स्तरावर तात्काळ बैठकीचे आयोजन करण्यात येईल व त्या बैठकीत सविस्तर चर्चा करून त्यावर मार्ग काढण्यात येईल,असे ना. सावकारे म्हणाले.

यावेळी उज्वला पळसकर प्रादेशिक उपायुक्त वस्रोद्योग, रेशीम अधिकारी विनीत पवार, तालुका अध्यक्ष राम जाधव, बालाजी पवार डॉ.थिटे यांच्यासह जिल्ह्यातील रेशीम उत्पादक शेतकरी उपस्थित होते.




**जवाब दो आंदोलन :** कर्नल सोफिया कुरेशी ही आतंकवाद्यांची बहीण आहे. बीएसएफ सब इन्स्पेक्टर इम्तियाज यांच्या अंतिम संस्काराला हिंदू-मुस्लिम भेदभाव करणाऱ्यांविरुद्ध एमआयएमतर्फे शनिवारी जवाब दो आंदोलन करण्यात आले. **(छायाचित्र : केवल तिवारी)**

# सह्याद्री पतसंस्थेच्या चेअरमनपदी ॲड. देशमुख, व्हाईस चेअरमनपदी डॉ. चंकेश्वरा बिनविरोध

**नातेपुते, दि.१७ मे-**

सह्याद्री ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी ॲड. रणवीर देशमुख तर व्हा. चेअरमनपदी डॉ. तेजस चंकेश्वरा यांची बिनविरोध निवड करण्यात आली. पतसंस्थेच्या कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकारी सम्राट पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संचालक मंडळाच्या सर्वसाधारण सभेत निवडी जाहीर करण्यात आल्या. यावेळी संस्थेचे संस्थापक धनाजी (बापू) देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली व सर्व संचालकांच्या वतीने नूतन चेअरमन



व व्हा. चेअरमन यांचा सन्मान करण्यात आला. या सर्वसाधारण सभेत संस्थेचे संस्थापक धनाजी (बापू ) देशमुख, चेअरमन ॲड. रणवीर देशमुख, व्हा. चेअरमन डॉ. तेजस चंकेश्वरा, डॉ. योगेश शेळके, सिकंदर मुलाणी, पुष्कर घुगरदरे, दीपक जठार, धवल गांधी, अनिकेत पलंगे, स्वप्नाली कुचेकर, संगीता गटकुळ तसेच सचिव मंगेश कुलकर्णी, विकास रुपनवर आदी उपस्थित होते.

# प्रा. डॉ. राहुल पालके यांची क्षण संघर्षाचे ही काव्यरचना वेधक

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१७ मे-**

जगविख्यात नाटककार विल्यम शेक्सपियर जीवनाचे तत्वज्ञान मांडत असताना म्हणतो,जीवन ही रंगभूमी आहे. इथे प्रत्येकाला आपली भूमिका वठवायची असते. तो जीवनाच्या सात अवस्था मानतो या अवस्थांतून मनुष्यजन्म जात असतो. जीवनाचे दुसरे नाव संघर्ष आहे.

संघर्ष जीवनाला आकार देत असतो. प्रत्येक टप्प्यावरची गोष्ट निराळी असते. हाच विचार येऊन त्यांनी जीवनाचा संघर्ष मांडणारी 'क्षण संघर्षाचे' या कवितेची रचना केलेली आहे. बालपणीच्या आठवणींना उजाळा देऊन निरागसतेची गोष्ट प्रत्येकाला सांगण्यासारखीच असते. ते क्षण प्रत्येकाच्या जीवनाला आनंद देतात. ते कवितात म्हणतात, अधीर होवून ते रमत असते, मोराच्या पिसारासारखे खुलत असते, सुगंध होवून दरवळत असते, मोगऱ्याच्या फुलासारखे फुलत असते, संघर्ष करुन सृजन असते. इंद्रधनुच्या सप्तरंगांनी बहरत असते, जीवन हे ऋणानुबंधानी घट्ट बांधलेले असते, ओल्या मातीच्या गंधाने, ते दरवळत असते.




पण इथेच थांबून भागत नाही. जसजसे आयुष्य समजत जाते तस तसे विचार बदल जातात.विचार कृतीत आणण्यासाठी मनुष्य झटत असतो.संघर्षाच्या पावलांनी,कित्येक मैल चालत, मैलाचा दगड असते. प्रा.पालके जीवनाच्या नव्या वाटांवरुनी नव्या ध्येयाचा मार्ग चालणार आहेत. २० मे पासून ते अमृता काळे यांच्याबरोबर लग्नबंधनात असणार आहेत. पण इथेही आनंदाबरोबर संघर्ष हा सुरु होतोच. ते म्हणतात, हा संघर्ष विविध परिस्थितीशी करावा लागतो. स्वतःशी संघर्ष करत, कुटुंबाशी संघर्ष करत समाजात तो आयाम सिद्ध करत असतो. कवितेची शेवट ते अशी करतात, मनाच्या वेगाबरोबर हृदयाच्या ठोक्याबरोबर घडयाळाच्या काटयाबरोबर जीवन जगायचे असते वाटेवरुनी चालायचे असते

## धोत्रेज ग्रुपच्या ग्रँड ट्रॅक्टर्स शोरूमचे मंगळवारी उद्घाटन

**पंढरपूर, दि.१७ मे-**

पंढरपूर शहर व तालुक्यातील शेतकरी बांधवांसाठी धोत्रेज उद्योग समूहाच्या ग्रँड ट्रॅक्टर्स शोरूमचे मंगळवारी (दि.२०) माजी गृहराज्यमंत्री, मनसे नेते बाळा नांदगावकर, धाराशिव जनता बँकेचे चेअरमन ह.भ.प. वसंतराव नागदे यांच्या हस्ते उद्घाटन होणार असल्याची माहिती मनसे नेते दिलीपबापू धोत्रे यांनी पत्रकार परिषदेत दिली.या शोरूमच्या माध्यमातून ५० तरुणांना रोजगार मिळणार असून या अगोदर धोत्रेज उद्योग समूहाच्या पंचतारांकित हॉटेल, पेट्रोल पंप या माध्यमातून ५०० तरूणांना नोकरी उपलब्ध करून देण्यात आली आहे. शोरूमच्या उद्घाटन समारंभास पंढरपूर शहर व तालुक्यातील नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन श्री. धोत्रे, प्रोप्रायटर श्रीयश धोत्रे यांनी केले आहे. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून मनसे नेते अविनाश अभ्यंकर, आमदार अभिजीत पाटील, आमदार राजू खरे, माजी आमदार शहाजी बापू पाटील, लातूरचे माजी आमदार वैजनाथ शिंदे, धाराशिवचे माजी नगराध्यक्ष विश्वास शिंदे, सहकार शिरोमणीचे चेअरमन कल्याणराव काळे, जेएसपीएमचे सेक्रेटरी गिरीराज सावंत, मानसी नेते बाबू वागसकर, राजाभाऊ उंबरकर, सोलापूर मनसे जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर, माजी उपनगराध्यक्ष नागेश भोसले, आदी उपस्थित राहणार आहेत.

# वैरागध्ये महाराजस्व अभियान शिबीर

**तभा वृत्तसेवा**
**वैराग दि १७ मे-**

महाराजस्व अभियान २०२५ जिल्हाधिकारी सोलापूर यांचे आदेशावरून उपविभागीय अधिकारी सोलापूर क्रमांक १चे सदाशिव पडदुणे यांचे सूचनेनुसार तहसीलदार शेख एफ. आर यांचे मार्गदर्शनाखाली मौजे वैराग येथील शहाजीराव पाटील सांस्कृतिक भवन येथे महाराजस्व अभियान शिबीर घेण्यात आले.



या शिबिरात वैराग मंडळातील ९ गावातील (शेळगाव (आर), राळेरास, धामणगाव (दु), सासुरे, लाडोळे, मुंगशी (आर ) रातंजन, सर्जापूर व वैराग शहर) विविध शासकीय योजनांचा लाभ घेणारे लाभार्थी उपस्थित होते यात संजय गांधी निराधार योजना, विधवा, अपंग, वयोवृद्ध, श्रावणबाळ योजना लाभार्थी उपस्थित होते, या सर्व लाभार्थी यांचे आधारक्रमांक शासनाच्या उद्दढ शी जोडून त्यांचे जागेवर आधारक्रमांक व्हेरिफाय करून त्यांच्या बंद पडणारे अनुदान पुर्ववत सुरु ठेवण्यात आले. व त्यांचा बार्शी येथे जाणारा वेळ, खर्च व मानसिक त्रास कमी करण्याच्या हेतूने शिबीर आयोजित करण्यात आले. यावेळी वैराग मंडळातील जवळपास ७०० लाभार्थी यांनी शिबिराचा लाभ घेऊन समाधान व्यक्त केले.

यावेळी तहसील कार्यालय येथील संगायो शाखेचे अव्वल कारकून राजेंद्र मुंडे, तसेच वैरागचे ग्राम महसूल अधिकारी महेश जाधव, सतीश पाटील, नामदेव रेळेकर, मनोज तवले, ताहेर तांबोळी, बाळासाहेब खेंदाड, कादर तांबोळी, मारुती सातपुते यांनी शिबिरासाठी विशेष परिश्रम घेतले, यावेळी वैराग शहर आणि परिसरातील सर्व महा ई सेवा केंद्रचालक उपस्थित होते.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-निविदा सूचना**

भारताच्या राष्ट्रपतींच्यावतीने आणि त्यांच्या वतीने, मध्य रेल्वे, सोलापूर येथील वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता, जनरल, रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवत आहेत. क्रमांक: 1. निविदा क्रमांक: SUR/L/T/2024/46R1. कामाचे नाव: सोलापूर विभागातील सर्व ॲक्सेसरीजसह विविध क्षमतेच्या पंपांच्या ऊर्जा कार्यक्षमतेच्या तरतुदीशी संबंधित इलेक्ट्रिकल जनरल सर्व्हिस भागाचे काम (पुनर्निमंत्रण). अंदाजे किंमत: रु. 1,60,74,494.89. बोली सुरक्षा रु. : 2,30,400/-. पूर्णत्वाचा कालावधी : 12 महिने. ऑफरची वैधता: 60 दिवस. अनुक्रमांक : 2. निविदा क्रमांक: SUR/L/T/2024/49R. कामाचे नाव : सोलापूर विभागातील कुर्डूवाडी कॉलनी येथे असलेल्या 25 क्रमांकाच्या RB II प्रकारच्या क्वार्टरच्या सुधारणा आणि पुनर्वायरनिंगशी संबंधित कामाचा इलेक्ट्रिकल जनरल सर्व्हिस भाग (पुनर्निमंत्रण). अंदाजे किंमत: 5,31,364.35 रुपये. बोली सुरक्षा: 10,600/- रुपये. पूर्ण कालावधी: 12 महिने. ऑफरची वैधता : 60 दिवस. वेबसाइटवर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ : 09/06/2025 दुपारी 3:00 वाजता. बोली सुरक्षा खर्च www.ireps.gov.in वेबसाइटवर ई-पेमेंटद्वारे भरला जाईल.

**सीनियर विभागीय विद्युत अभियंता (जी),**
**मध्य रेल्वे, सोलापूर**
DE/Sur-57
रेल्वे फाटक को बंध स्थिति में पार करना मना है

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-निविदा सूचना**

भारताच्या राष्ट्रपतींच्यावतीने मध्य रेल्वे, सोलापूर येथील विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम) यांनी खालील कामांसाठी नामांकित कंपन्या / कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवल्या आहेत. क्रमांक क्रमांक: 1. निविदा सूचना क्रमांक: 09-2025-SRDENS. कामाचे नाव: 1) एसएसई/पी. वे/केडब्ल्यूव्ही(एस) अंतर्गत एडीईएन/एसयूआर(टी) उपविभाग अंतर्गत दोन वर्षांच्या कालावधीसाठी विविध पी. वे काम. 2) पीएफ क्रमांक 3 चे सीएसएल वाढवण्यासाठी आणि एकाच वेळी हालचालींशी संबंधित इंटरलॉकिंग सोडण्यासाठी सोलापूर यार्ड रीमॉडेलिंगचे काम. कामाची अंदाजे किंमत: रु. 3,50,89,225.99. बकाया रक्कम: रु. 3,25,500/-, काम पूर्ण करण्याचा कालावधी: 24 महिने. देखभाल कालावधी: अनुक्रमांक: 2. निविदा सूचना क्रमांक: 10-2025-SRDENS. कामाचे नाव: एलसीऐवजी आरयूबीमधून साचलेले पाणी काढून टाकणे आणि एडीईएन/टी/एसयूआर विभागांतर्गत पावसाळ्यात घाण साफ करणे. (एलसी क्रमांक 43, 44, 47, 48, 49, 51, 53, 54, 456/1E, 59, 62, 63, 64, 65, 68, 72 च्या बदल्यात आरयूबीसाठी). कामाची अंदाजे किंमत: रु. 32,44,705.13. बयाणा रक्कम: रु. 64,900/-. काम पूर्ण करण्याचा कालावधी: 06 महिने. देखभाल कालावधी: www.ireps.gov.in वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची शेवटची तारीख आणि वेळ: 09/06/2025 दुपारी 3:00 वाजेपर्यंत. www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: 09/06/2025 दुपारी 3:30 वाजेपर्यंत. संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे जेणेकरून या निविदेत कोणतेही बदल/शुद्धीपत्रक जारी केले आहे ते लक्षात येईल. वेबसाइट: www.ireps.gov.in.

**विभागीय रेल्वे व्यवस्थापक (वर्क्स).**
**मध्य रेल्वे, सोलापूर**
DE/Sur-56
रेल्वे फाटक को बंध स्थिति में पार करना मना है

**जाहिर नोटीस**

तमाम लोकांना विशेषतः शहर सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर येथील तसेच आजूबाजूच्या परिसरातील आमचे अशिलानी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि।। व सब डि।। सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका **ग.व.सु.** हद्दीतील **पेठ तालुका ऑफिस झोपडपट्टी, सोलापूर** या नावांने ओळखले जाणाऱ्या नगरातील झोपडी घर नं. ४५८ A ही मिळकत झोपडी घरजागा आमचे अशिल **अरुण तुकाराम उबाळे** यांची मयत विधवा मुलगी **बु. सुनिता हेमंत मोरे,** हिचे नावांवर असून याची नोंद सोलापूर महानगरपालिकेच्या **ग.व.सु.** विभागात कर आकारणीस नोंद आहे. सदर ठिकाणी तिचे नांवे एक खोली आहे. सदरची खोली आमचे अशिलांनी त्यांची मुलगी सुनिता हेमंत मोरे, हि विधवा निराधार जीवन जगत असल्याने तिचे पतीचे मृत्युपश्चात तिची पालनपोषण देखभाल करुन आमचे अशिलाचे मालकीचे असलेल्या खोल्यापैकी वर नमूद घर नंबरची एक खोली तिला राहणेसाठी निवारा म्हणून तिला कब्जे पावती करारपत्रांने राहणेसाठी दिलेले होते. सदरची खोली तिचे मृत्युपश्चात आजमितीस आमचे अशिलाचे कब्जे वहिवाटीत आहे. तिचे मृत्युपश्चात आमचे अशिल तिथे जन्मदाता पालनकर्ता वडील या नात्याने तिचे वारस असून सदरहू घर नं. ४५८ A या मिळकतीवरील मयत मुलीचे नावाची नोंद कमी करुन आमचे अशिलांचे नावाची नोंद होऊन त्यांचे नांवे पुर्वीप्रमाणे एकत्रित कर पावती मिळावी याकरिता सोलापूर महानगरपालिकेच्या ग.व.सु. विभागाचे कर आकारणी विभागास वारस नोंद होणेकामी आमचे अशिल हे वारसा हक्काने वारस नोंद होऊन कर पावती मिळणेकरिता अर्ज दाखल करणार आहेत.

तरी सदरहू वर नमूद झोपडी घरजागेवर आमचे अशिलाव्यतिरिक्त इतर कोणाचाही कुठल्याही प्रकारचे हक्क व अधिकार असेल अथवा इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, लीज, करार, मदार, टाच, जप्ती, बोजा, पोटगी, बक्षिसपत्र, अगर इतर हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसाचे आत हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्यावर अथवा आमचे अशिलाचे वर नमूद पत्यावर लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचेही कसलेही हरकत व तक्रार न आल्यास ही झोपडी घरजागा निर्वेध, निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल त्यांचे नावाची वारस नोंद सो.म.पा. चे कर आकारणी व कर संकलन विभाग, ग.व.सु. विभागाचे दप्तरी त्याचे नावाची वारस नोंद करून घेतील व त्यानंतर कोणाचेही व कसल्याही प्रकारचे तक्रार व हरकतीचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

ही नोटीस दिली तारीख १७/०५/२०२५

**अशिलाची सही**

**सही/-**
**ढेकणे एस.एम.**
**ॲडव्होकेट**
**रा. १२६-अ वाणी गल्ली बाळे,**
**ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

**Classifieds**

**पाहिजेत**

**हॉस्पिटलसाठी सिस्टर, लेडी रिसेप्शनीस्ट व आया पाहिजे. सारडा हॉस्पिटल, सम्राट चौक, सोलापूर**
**फोन : 9503062999**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**

**जाहिर पब्लिकेशन**
बदल अर्ज क्र. ६३२/२०१५
किरकोळ अर्ज क्र. ६३३/२०२५

**सोलापूर येथील मे. धर्मादाय उप आयुक्त साहेब / सहाय्यक धर्मादाय आयुक्त साहेब यांच्या न्यायालयात**

**पंढरपूर पत्रकार संघ, घ.नं. ६३२, अनिल नगर, मसोबा मंदिर समोर, पंढरपूर, जि. सोलापूर रजि नं. एफ २६६०१ सोलापूर** या संस्थेचे नांवात, उद्देशात, घटना नियम नियमावली वाढ व बदल करण्या बाबत घटना दुरुस्ती अर्ज दाखल केला आहे. अर्जदार **श्री. हरी आप्पा प्रक्षाळे** यांनी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय येथे दाखल केलेले आहे. सदर संस्थेच्या नांवात, उद्देशात, घटना नियम नियमावली मध्ये बदल व वाढ करण्यात आले आहे. सदर प्रकरणामध्ये कुणालाही कुठल्याही विश्वस्तांना किंवा सभासदांना जर हरकत घ्यायचे असेल त्यांनी सदरची जाहिर पब्लिकेशन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसाच्या आत स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत सदर अर्जास उत्तर देणे कामी मे. कार्यालयात हजर व्हाचे अन्यथा सदरचे मे. कार्यालय हे वर नमुद संस्थेचे संस्थेच्या नांवात, उद्देशात, घटना नियम नियमावली मध्ये बदल व वाढ बाबतचे प्रकरण एकतर्फी चालवुन सदरचा अर्ज निकाली काढतील. त्यानंतर कोणतेही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

हे जाहिर पब्लिकेशन केले ता. १४/५/२०२५

टिपः सदरील नोटीस प्रसिध्द करण्याचा खर्च न्यासाच्या अर्जदार यांच्यावरती राहील.

**सही/-**
**(एस. एस. कुमठेकर)**
**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**सोलापूर विभाग, सोलापूर**

**शिक्षण सेवक पाहिजेत**
**श्री. छत्रपती शिवाजी तरुण मंडळ शेळगाव (आर) ता. बार्शी, जि. सोलापूर संचलित**
**श्री. जगदंबा विद्यालय, वाफळे, ता. मोहोळ, जि. सोलापूर**

या प्रशालेत अनुदानित माध्यमिक विभागावर खालील शिक्षण सेवकाचे पद भरायचे आहे.

| अ. क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक पात्रता | पूर्ण वेळ / अर्ध वेळ / पदसंख्या | अनुदानित / अंशतः अनुदानित | जात संवर्ग | पद मान्यता सेवानिवृत्त / राजीनामा | पदाचे मानधन / वेतन श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ लिपीक | १२वी / पदवीधर एम.एस.सी.आय.टी. (MS-CIT) | पूर्ण वेळ १ | अनुदानित | खुला (ओपन) | सेवानिवृत्त | शिक्षण सेवक रु. १०,००० |

१) वरील नियुक्तीस मा. शिक्षणाधिकारी (माध्य) जि.प. सोलापूर व शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांच्या मान्यतेच्या अधीन राहून नियुक्ती देण्यात येतील.
२) सेवाशर्ती शासन नियमानुसार राहील.
३) अनुभवी उमेदवारांना प्राधान्य
४) मराठी व इंग्रजी ४० टंकलेखन उमेदवारास प्राधान्य.
५) पात्र व इच्छुक उमेदवारांनी खालील पत्त्यावर सोमवार दि. १९/०५/२०२५ रोजी सकाळी ११ या वेळेत मूळ कागदपत्रासह व सत्यप्रतीसह २ पासपोर्ट साईज फोटो आणि अर्जासह स्वखर्चाने मुलाखतीस उपस्थित राहावे.
**मुलाखतीचे ठिकाण :** हेमूजी चांदेले महाविद्यालय शेळगाव (आर ) तालुका बार्शी, बार्शी सोलापूर रोड

सही/-
अध्यक्ष
श्री. छत्रपती शिवाजी तरुण मंडळ
शेळगाव (आर)

सही/-
मुख्याध्यापक
श्री. जगदंबा विद्यालय, वाफळे
ता. मोहोळ, जि. सोलापूर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



चला आयुष्य वाढवूया, फिटनेसकडे वळूया

भाग - १३

## पेस/स्पीड आणि पेसर

रनिंगमध्ये "pace" हा एक महत्त्वाचा मोजमाप आहे. पेस म्हणजे धावण्यासाठी लागणारा वेळ प्रती किलोमीटर (किंवा प्रति मैल). उदाहरणार्थ, जर एखादा धावपटू ५ मिनिटांत १ किलोमीटर पूर्ण करतो, तर त्याचा पेस ''५:00 मिनिटे/किमी'' असतो. रनिंगच्या विविध प्रकारांमध्ये योग्य पेस ठेवलं जातं. उदा. टेम्पो रनसाठी जलद पेस लागतो, तर लाँग रनसाठी आरामशीर पेस असतो. प्रशिक्षणात पेस चा नियोजनबद्ध वापर केल्यास धावपटूची सहनशक्ती, गती आणि शरिरशक्ती सुधारते. स्पर्धेमध्ये पेस टिकवणं अत्यंत महत्त्वाचं असतं, कारण सुरुवातीला जास्त वेगाने धावल्यानं शेवटी थकवा येतो आणि वेळ बिघडतो. योग्य पेसमुळे धावपटू आपली ताकद व्यवस्थित वापरतो आणि स्पर्धा प्रभावीपणे पूर्ण करतो.

स्पीड/km म्हणजे प्रत्येक किलोमीटरसाठी लागणारा वेळ (pace) किंवा एकूण स्पीड, दोन्ही अर्थाने वापरला जाऊ शकतो. सोप्या भाषेत: जर तुम्ही ५ मिनिटांत १ किमी धावत असाल, तर तुमचा पेस = ५:00 मिनिटे/किमी. त्याचवेळी, स्पीड = १२ किमी/तास (कारण ६0/ ५ = १२)

**सूत्रे :** स्पीड (किमी/तास) = ६0/ पेस (मिनिटे/किमी) पेस (मिनिटे/किमी) = ६0/स्पीड (किमी/तास.उदाहरण: जर तुम्ही ४:३0 मिनिटे/किमी वेगाने धावत असाल, तर तुमचा रनिंग स्पीड होईल १३.३ किमी/तास.आणि ६ मी./किमी धावत असाल तर १0 किमी / तास होईल.

**अन्य माहिती :** ऑलिंपिकसारख्या स्पर्धांमध्ये शॉर्ट रन (जसे की १00 मीटर, २00 मीटर, ४00 मीटर) साठी स्पीड सामान्यतः मीटर प्रति सेकंद (m/s) या मापात मोजला जातो. उदाहरण:उसेन बोल्टने १00 मीटर ९.५८ सेकंदांत पूर्ण केला, तर त्याचा स्पीड = १00/९.५८ (१0.४४ (m/s)हा स्पीड ३७.५८ किमी/तास इतका आहे.

मॅरेथॉनमध्ये "pacer" ही एक महत्त्वाची भूमिका असते. पेसर म्हणजे एक अनुभवी धावपटू जो ठराविक वेळेत मॅरेथॉन पूर्ण करण्यासाठी इतरांना मदत करतो. त्याच्याकडे सहसा एक फलक किंवा फुगा असतो, जसे ''४:00'' किंवा ''३:३0'', ज्यावर पूर्ण मॅरेथॉनची वेळ लिहिलेली असते. एकसंध आणि स्थिर ठेवतो, त्यामुळे मागे धावणाऱ्या स्पर्धकांना गतीची जाणीव राहत असते. पेसर धावपटूंना मानसिक आधार देतो, हायड्रेशन आणि ऊर्जा टिकवण्यासाठी वेळोवेळी स्मरण करून देतो. अनेक वेळा पहिल्यांदाच मॅरेथॉन करणाऱ्या धावपटूंना पेसरचं मार्गदर्शन अत्यंत उपयुक्त ठरतं. पेसरमुळे धावपटूंना लक्ष्य साध्य करायला मदत होते आणि गटात धावताना जास्त प्रेरणा मिळते. (क्रमशः)

-अतिश शहा
फिटनेस ट्रेनर आणि अल्ट्रा मॅराथॉनर
चॅलेंजर स्पोर्ट्स फौंडेशन, सोलापूर.
मो.९१७५८२८२०३

# पंजाब प्लेऑफमधील स्थानासाठी उत्सुक

## राजस्थान रॉयल्स आत्मसन्मानासाठी झुंजणार

◆ **जयपूर, १७ मे**

पंजाब किंग्ज रविवारी राजस्थान रॉयल्सविरुद्ध आणखी एका दमदार कामगिरीसह प्लेऑफमध्ये स्थान मिळवण्यासाठी आपला प्रयत्न पुन्हा सुरू करणार आहे. या हंगामात पंजाब किंग्जकडे संसाधने असूनही त्यांना आपली कामगिरी सामान्यतेपेक्षा वर उंचवण्यात अपयश आले आहे.



आठवडाभराच्या सक्तीच्या विश्रांतीनंतर सवाई मानसिंग स्टेडियमवर सामन्यात परतत असताना श्रेयस अय्यरच्या संघाला ८ मे रोजी झालेल्या दुःस्वप्नातून पुढे जाण्याची आशा असेल. त्यावेळी भारत-पाकिस्तान सीमा तणावामुळे निसर्गरम्य धर्मशाळेत दिल्ली कॅपिटल्सविरुद्धचा सामना रद्द करावा लागला होता व त्यामुळे खेळाडूंना त्यांच्या ड्रेसिंग रूममध्ये अंधारात परतावे लागले होते.

पंजाब किंग्ज रविवारी मैदानावर उतरत असताना ११ सामन्यांमधून १५ गुणांसह आरामात तिसऱ्या स्थानावर आहे, त्यामुळे सक्तीच्या विश्रांतीमुळे संघबांधणीत काही बदल होण्याची शक्यता आहे. ऑस्ट्रेलियन मार्कस स्टोइनिस व जोश इंग्लिसने संघात पुन्हा सामील होण्यास सहमती दर्शविली असली तरी, आयपीएल पुन्हा सुरू झाल्यानंतर ते पंजाब किंग्जच्या पहिल्या सामन्याला मुकणार आहे. त्यामुळे पंजाब संघाला त्यांच्या फलंदाजीच्या क्रमात बदल करावा लागू शकतो.

क्रिकेट दक्षिण आफ्रिकेने परत बोलावलेला उंच व वेगवान गोलंदाज मार्को जॅनसेनची अनुपस्थिती श्रेयसच्या संघाला सर्वात जास्त त्रासदायक ठरेल. जॅनसेनने या हंगामात ११ बळी घेत चांगली छाप सोडली होती.

तथापि, पंजाब किंग्जकडे कर्णधार श्रेयस, सलामीवीर फलंदाज प्रियांश आर्य, प्रभसिमरन सिंग व नेहल वढेरासह मजबूत भारतीय संघ असल्यामुळे परदेशी खेळाडूंच्या पलायनातून संघ तुलनेने सुरक्षित राहिला आहे.

### आजचे सामने

**राजस्थान रॉयल्स वि. पंजाब किंग्ज**
**स्थळ** : सवाई मानसिंग स्टेडियम, जयपूर
**वेळ** : दुपारी ३.३० वाजतापासून

**दिल्ली कॅपिटल्स वि. गुजरात टायटन्स**
**स्थळ** : अरुण जेटली स्टेडियम, नवी दिल्ली
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

गोलंदाजीच्या आघाडीवरही पंजाबकडे वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंग व फिरकी गोलंदाज युजवेंद्र चहल आहेत. त्यांनी आतापर्यंत ११ सामन्यांमध्ये १४ बळी घेतले आहेत. त्यांची सर्वोत्तम कामगिरी २८ धावांत ४ बळी आहे व इकॉनॉमी रेट १० पेक्षा कमी आहे.

जखमी लॉकी फर्ग्युसनच्या जागी न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज काइल जेमीसन येत असल्यामुळे स्टोइनिस व इंग्लिस पुढील सामन्यात सहभागी होण्यापूर्वी पंजाब किंग्ज राजस्थानविरुद्धच्या सामन्यासाठी एक संतुलित संघ तयार करू शकेल.

पंजाब पुन्हा एकदा त्यांच्या फलंदाजांवर अवलंबून असेल. धर्मशाला येथे ते दिल्ली कॅपिटल्सच्या गोलंदाजांना पराभूत करण्याच्या उंबरठ्यावर होते व सामना रद्द होण्यापूर्वी केवळ १०.१ षटकात एक बाद १२२ धावा काढत होते. या कामगिरीमुळे त्यांना निराशाजनक रॉयल्सविरुद्ध आवश्यक असलेला पुरेसा आत्मविश्वास मिळेल.

यजमान राजस्थान रॉयल्स आधीच प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर झाला आहे. सध्या १२ सामन्यांपैकी केवळ तीन विजयांसह गुणतालिकेत नवव्या स्थानावर आहे.

निराशाजनक राजस्थान रॉयल्स आपल्या घरच्या चाहत्यांसमोर कामगिरी उंचावण्याची आशा करेल, परंतु त्यासाठी त्यांना गत पाचपैकी चार सामन्यांत पराभव पत्करावा लागला आहे, त्यामुळे त्यांना घसरगुंडीतून स्वतःला बाहेर काढावे लागेल.



१४ वर्षीय वैभव सूर्यवंशीचे ३५ चेंडूंचे जबरदस्त शतक हा जादूचा एक दुर्मिळ क्षण होता, परंतु रॉयल्स प्रत्येक वेळी अशा वैयक्तिक प्रतिभेवर अवलंबून राहू शकत नाही.

दुखापतीमुळे हंगामातील बहुतेक सामन्यात नियमित कर्णधार संजू सॅमसन अनुपस्थित राहिल्यामुळे राजस्थान रॉयल्सच्या फलंदाजीमध्ये मोठी पोकळी निर्माण झाली आहे. संघाला सातत्यपूर्ण गती निर्माण करण्यात संघर्ष करावा लागला आहे.

फलंदाजीचा भार आता यशस्वी जयस्वाल व रियान पराग यांच्यावर आहे. जर राजस्थान रॉयल्सला आपल्या घरच्या मैदानावर शेवटच्या सामन्यात विजय नोंदवायचा असेल तर या दोघांना उत्तम कामगिरी करावी लागेल.

त्यांच्या गोलंदाजीच्या आक्रमणालाही फटका बसला आहे, वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चरने उर्वरित दोन सामन्यांसाठी परत न येण्याचा निर्णय घेतल्यामुळे आधीच संघर्ष करणाऱ्या संघाला आणखी कमकुवत केले आहे. (वृत्तसंस्था)


# भारताला आनंद अन् अभिमान : पंतप्रधान मोदी

## नीरजची भालाफेकमध्ये नव्वदी पार

◆ **नवी दिल्ली, १७ मे**

दोनवेळचा ऑलिम्पिकपदक विजेता भारतीय भालाफेकपटू नीरज चोप्राने दोहा डायमंड लीगमध्ये प्रथमच ९० मीटरपेक्षा जास्त अंतरावर भालाफेक केली. त्याच्या या कामगिरीबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी या यशाचे श्रेय त्याच्या अथक समर्पण, शिस्त आणि उत्कटतेला दिले. नीरज, तुझ्या या कामगिरीबद्दल भारताला आनंद आणि अभिमान आहे, असे त्यांनी म्हटले.

नीरज चोप्राने अखेर ९०.२३ मीटर अंतर पार करून ९० मीटर अंतर पार केले, परंतु शुक्रवारी येथे प्रतिष्ठित डायमंड लीग स्पर्धेच्या मालिकेच्या दोहा टप्प्यात झालेल्या नाट्यमय पुरुषांच्या भालाफेकी स्पर्धेत या अग्रणी भारतीयाला जर्मनीच्या ज्युलियन वेबरनंतर दुसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले.



शाब्बास नीरव

२७ वर्षीय नीरजने ९० मीटरपेक्षा जास्त अंतरावर भालाफेक करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत सहभागी होण्यासाठी तिसऱ्या प्रयत्नांत ९०.२३ मीटर अंतरावर भालाफेक केली. नीरजने त्याचे विद्यमान प्रशिक्षक झेक प्रजासत्ताकचे विद्यमान प्रशिक्षक जान झेलेझनी यांच्या नेतृत्वाखाली ९० मीटरपेक्षा जास्त अंतर नोंदवले आहे. हा पराक्रम करणारा तो तिसरा आशियाई आणि एकूण २५ वा खेळाडू ठरला.

'एक नेत्रदीपक कामगिरी! दोहा डायमंड लीग २०२५ मध्ये ९० मीटरचा टप्पा ओलांडल्याबद्दल व त्याचा वैयक्तिक सर्वोत्तम थ्रो साध्य केल्याबद्दल नीरज चोप्राचे अभिनंदन. हे त्याच्या अथक समर्पणाचे, शिस्तीचे आणि उत्कटतेचे परिणाम आहे. भारताला आनंद आणि अभिमान आहे, असे मोदी यांनी समाज माध्यमावर म्हटले. (वृत्तसंस्था)

# विदर्भ प्रो टी-२० लीग ५ जूनपासून

**नागपूर** : विदर्भ क्रिकेट संघटनेने (व्हीसीए) जाहीर केले की विदर्भ प्रो टी-२० लीगचा पहिला हंगाम ५ ते १५ जून दरम्यान होणार आहे. सर्व सामने नागपूरच्या जामठा येथील जागतिक दर्जाच्या व्हीसीए स्टेडियमवर आयोजित केले जातील. या लीगच्या माध्यमातून विदर्भाच्या क्रिकेट प्रवासात एक नवीन अध्याय सुरू होईल. या लीगमध्ये पुरुषांसाठी सहा आणि महिलांसाठी तीन फ्रॅन्चायझी संघ असतील. विदर्भ क्रिकेटसाठी हा एक ऐतिहासिक क्षण आहे. असे विदर्भ प्रो टी-२० लीगच्या गव्हर्निंग कौन्सिलचे अध्यक्ष प्रशांत वैद्य म्हणाले. गोलंदाज उमेश यादव या लीगचा सदिच्छा दूत आहे. ■

# कर्णधारपदासाठी गिल, पंत योग्य : रवी शास्त्री

## बुमराहवर नेतृत्वाची जबाबदारी सोपवू नका

◆ **दुबई, १७ मे**

शुभमन गिल व ऋषभ पंत हे कसोटी क्रिकेटमध्ये भारतीय संघाचे नेतृत्व करण्यासाठी आदर्श उमेदवार आहेत, कारण त्यांच्याकडे वय आहे व त्यांना आयपीएल संघाचे नेतृत्व करण्याचा अनुभव आहे. जसप्रीत बुमराह नेतृत्वाच्या भूमिकेसाठी एक स्पष्ट पर्याय आहे, परंतु त्याच्या तंदुरुस्तीच्या समस्यांमुळे वेगवान गोलंदाजावर अतिरिक्त जबाबदारी सोपवू नका, असे मत भारतीय क्रिकेट संघाचे माजी प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी व्यक्त केले.

मला वाटते की, ऑस्ट्रेलियानंतर जसप्रीत हा स्पष्ट पर्याय असता. पण त्याच्यावर कर्णधारपदाची जबाबदारी टाकू नये. जर केल्यास तुम्ही त्याला गोलंदाज म्हणून गमावाल, असे शास्त्री बुमराहची पत्नी संजना गणेशन यांच्यासोबत आयसीसी रिव्ह्यूच्या ताज्या भागात म्हणाले.

रोहित शर्माच्या अलिकडेच निवृत्तीनंतर निवडकर्त्यांना नवीन कसोटी कर्णधार निवडावा लागेल. भारताची पुढील जबाबदारी २० जूनपासून लीड्स येथे सुरू होणाऱ्या इंग्लंडविरुद्ध पाच सामन्यांची मालिका आहे.

३१ वर्षीय बुमराहला सिडनी येथे झालेल्या बॉर्डर-गावस्कर चषक सामन्यात पाठीच्या दुखापतीमुळे त्रास सहन करावा लागला. तो जवळजवळ तीन महिने- जानेवारीच्या सुरुवातीपासून ते एप्रिलपर्यंत - मैदानाबाहेर होता व भारताच्या चॅम्पियन्स चषक विजयी मोहिमेला मुकला. काही सुरुवातीच्या सामन्यांना मुकावे लागल्यानंतर बुमराह आयपीएलमध्ये परतला आणि त्यानंतर त्याने मुंबई इंडियन्ससाठी आठ सामन्यांमध्ये १३ बळी घेतले आहेत.

मला वाटते की बुमराहला एका वेळी एक सामना खेळावा लागेल. तो आता गंभीर दुखापतीनंतर परत येत आहे. त्याने आयपीएल क्रिकेट खेळले





असेल, जे चार षटकांचे क्रिकेट आहे. आता कसोटीत १० षटके, १५ षटके गोलंदाजी करण्याची परीक्षा असेल. शेवटची गोष्ट म्हणजे कर्णधार म्हणून त्याच्या मनावर काही दबाव असेल, असे ते म्हणाले.

बीसीसीआयने भावी भारताचा कर्णधार ठरवण्यासाठी वय आणि दीर्घायुष्यासारख्या प्रमुख घटकांकडे लक्ष दिले पाहिजे, असेही ते म्हणाले. गिल गुजरात टायटन्सचे नेतृत्व करत आहे, तर यष्टिरक्षक-फलंदाज पंत लखनौ सुपर जायण्ट्सचे नेतृत्व करत आहे. गिल व पंतपैकी एखाद्याला तयार करा. मी म्हणेन की शुभमन खूप चांगला दिसतो असे ते म्हणाले. (वृत्तसंस्था)

# संघर्षरत दिल्ली कॅपिटल्सचा सामना गुजरात टायटन्सशी

◆ **नवी दिल्ली, १७ मे**

भारत-पाकिस्तान सीमा तणावामुळे मागील सामना अचानक स्थगित करण्यात आल्याने हादरलेल्या दिल्ली कॅपिटल्सला रविवारी येथे होणाऱ्या रिव्हर्स लेग आयपीएल सामन्यात गुणतालिकेत अव्वल स्थानावर असलेल्या गुजरात टायटन्सशी सामना करावा लागणार आहे.

गत पाच सामन्यांमध्ये तीन पराभव व पावसामुळे निकाल न लागणे पुरेसे होते, तर शेजारच्या जम्मू व पठाणकोटमध्ये हवाई हल्ल्याच्या सूचनांमुळे दिल्ली कॅपिटल्सचा गत सामना मधातच रद्द करण्यात आला होता, ज्यामुळे आयपीएल एक आठवड्यासाठी स्थगित करण्यात आली होती. स्पर्धा पुन्हा सुरू झाली असली तरी, अनेक परदेशी खेळाडू आपली वचनबद्धता पूर्ण करण्यासाठी परतले नाहीत, त्यामुळे फ्रॅन्चायझींना आपल्या संघात मोठे बदल करावे लागले.

सध्या दिल्ली कॅपिटल्स १३ गुणांसह पाचव्या स्थानावर आहे. ११ सामन्यांत १३ गुणांसह अव्वल





चारच्या बाहेर असलेल्या दिल्लीला मोठा धक्का बसला, कारण प्रीमियर वेगवान गोलंदाज मिशेल स्टार्कने उर्वरित हंगामात परत न येण्याचा निर्णय घेतला. ऑस्ट्रेलियन डावखुरा गोलंदाज १४ बळींसह संघाचा आघाडीचा बळी घेणारा गोलंदाज आहे व त्याची अनुपस्थिती दिल्लीच्या आधीच कमी असलेल्या प्लेऑफच्या आशांना मोठा धक्का आहे. बांगलादेशचा वेगवान गोलंदाज मुस्तफिजूर रहमानची सेवा मिळवल्यामुळे दिल्लीला थोडा दिलासा मिळाला आहे. शुक्रवारी त्याच्या राष्ट्रीय क्रिकेट मंडळाकडून ना हरकत प्रमाणपत्र मिळाले.

अक्षर पटेलच्या नेतृत्वाखालील दिल्ली कॅपिटल्स संघाने घरच्या मैदानावर निराशाजनक कामगिरी केली आहे. या हंगामात अरुण जेटली स्टेडियमवर केवळ एक विजय मिळवला आहे, तोही सुपर ओव्हरद्वारे.

अलिकडच्या सामन्यांमध्ये दिल्ली कॅपिटल्सच्या समस्या आणखी वाढल्या आहेत. पावसामुळे झालेल्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादविरुद्ध त्यांचा मधला क्रम कोसळला, तर पंजाब किंग्जने त्यांच्या गोलंदाजांना चांगलेच अडचणीत आणले. धर्मशाळेतील सामना रद्द होण्यापूर्वी पंजाब किंग्जने केवळ १०.१ षटकांत एक बाद १२२ धावा केल्या. (वृत्तसंस्था)

# दिल्ली ग्रॅण्डमास्टर्स खुली बुद्धिबळ स्पर्धा ७ जूनपासून

◆ **नवी दिल्ली, १७ मे**

आगामी ७ ते १४ जून दरम्यान येथे २१ वी दिल्ली आंतरराष्ट्रीय ओपन ग्रॅण्डमास्टर्स बुद्धिबळ स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेत १५ हून अधिक देशांमधील २० ग्रॅण्डमास्टर्ससह २५०० हून अधिक खेळाडू तीन रेटिंग-आधारित श्रेणींमध्ये स्पर्धा करतील.




दिल्ली बुद्धिबळ संघटनेने अखिल भारतीय बुद्धिबळ महासंघाच्या वतीने आयोजित केलेल्या या स्पर्धेत १.२१ कोटी रुपयांचा विक्रमी बक्षिसे ठेवण्यात आली आहे. ही फिडे वर्ल्ड चॅम्पियनशिपच्या स्तरावरील एक उत्कृष्ट स्पर्धा आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावरील सर्व मानांकित खेळाडूंसाठी खुली असलेली श्रेणी अ मध्ये ५१ लाख रुपयांची बक्षिसे आहेत. १९०० आणि १७०० पेक्षा कमी मानांकित खेळाडूंसाठी श्रेणी ब आणि क मध्ये अनुक्रमे ३५ लाख रुपये देण्यात येतील. सर्व सामने स्विस साखळी पद्धती अंतर्गत फिडे नियमांनुसार खेळले जातील, प्रत्येक विभागात १० फेऱ्या असतील.

गत दोन दशकांमध्ये दिल्ली ग्रॅण्डमास्टर्स ओपनने केवळ देशातील बुद्धिबळाच्या वाढीसोबतच गती कायम राखली नाही, तर त्याला चालना देण्यास मदत केली आहे. प्रत्येक आवृत्तीसह, आम्ही देशात शाश्वत, उच्च-कार्यक्षम बुद्धिबळ संस्कृतीचा पाया मजबूत करत आहोत, असे दिल्ली बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष भरत सिंग चौहान यांनी म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

# मास्टर्स व साऊथ सोलापूरचे शानदार विजय

### मास्टर्स अकादमी आयोजित बंदपट्टे चषक १२ वर्षांखालील क्रिकेट

**सोलापूर, दि. १७ मे-**

बंदपट्टे करंडक १२ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत मास्टर्स अकादमी व साऊथ सोलापूरने शानदार विजय मिळविले.

दयानंद महाविद्यालयाच्या मैदानावर शनिवारी झालेल्या सामन्यात मास्टर्स संघाने एच.पी.सी.सी. संघावर ६ गडी राखून विजय मिळविला. निर्विक बनसोडे सामनावीर ठरला. दुसऱ्या सामन्यात साऊथ सोलापूरने उस्मानाबाला ३१ धावांनी हरविले. रिधम कचरे सामन्याचा मानकरी ठरला. हे पुरस्कार जयदीप भीमरथी, राजवर्धन जिल्हा, दत्ता बडगू, राजेश येमुल व अमोल अंगडी यांच्या उपस्थितीत देण्यात आले. पंच म्हणून सागर लोंढे व मोहित दिकोंडा व गुणलेखक म्हणून राजवर्धन जिल्हा यांनी काम पाहिले.





**संक्षिप्त धावफलक : एच.पी.सी.सी. :** १५.२ षटकात सर्व बाद ५५ (निर्विक बनसोडे २-१३) पराभूत विरुद्ध **मास्टर्स संघ :** १६.१ षटकात ४ बाद ५६ (धनराज बंदपट्टे १८)

**साऊथ सोलापूर :** ३० षटकात ३ बाद १८० (रिधम कचरे ६५, अर्णव भोसले ५१, धरवर्धन घायले २-१५) वि. वि. **उस्मानाबाद :** ३० षटकात ५ बाद १४९ (शरद २४ धावा, रणवीर भोसले २१, संदेश चव्हाण २-१५).

### आज होणारे सामने

मास्टर्स विरुद्ध मॉडेल
एन.एस.सी.ए. विरुद्ध उस्मानाबाद

# सोलापूरचा अकबर कुरेशी 'भगवंत श्री' किताबाचा मानकरी

## शिवराज्य सेनेची जिल्हा शरीरसौष्ठव स्पर्धा : टेंभूर्णीचा अक्षय जगताप बेस्ट पोझर, बार्शीचा योगेश गवारे मोस्ट इंम्प्रूव्हडचा मानकरी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि १७ मे-**

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमीत्त येथील शिवराज्य सेनेच्यावतीने आयोजित केलेल्या जिल्हा शरीरसौष्ठव स्पर्धेत सोलापूरच्या अकबर कुरेशी याने ''भगवंत श्री'' हा मानाचा किताब पटकावला. त्यास मान्यवरांच्या हस्ते रोख परितोषक रु. ११ हजार, ट्रॉफी, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देवून गौरविण्यात आले. बेस्ट पोजरचा मान अक्षय जगताप (टेंभुर्णी) तर मोस्ट इंम्प्रुव्हडचा मान योगेश गवारे (बार्शी) याने पटकाविला.

संत तुकाराम सभागृहात झालेल्या या स्पर्धेत ७५ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. पारितोषिके खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, रासपचे राष्ट्रीय अध्यक्ष महादेव जानकर यांच्या हस्ते देण्यात आली. विविध गटातील विजेत्यांना एकूण ७५ हजार रुपयांची पारितोषिक देण्यात आली. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या मान्यवरांचा शिवगौरव पुरस्कार देवून गौरव करण्यात आला. प्रारंभी छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, संघटनेचे कार्याध्यक्ष प्रीतम मोरे, उत्सव समिती प्रमुख सोमनाथ डमरे यांच्यासह शिवराज्य सेनेचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रमोद काटे, नजीर शेख, गोरख गडसिंग, रतिकांत पाटील यांनी काम पाहिले. शिवराज्य सेनेचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन मंगेश दहिहांडे यांनी केले.



### यांचा झाला शिवगौरव पुरस्काराने सन्मान

डॉ. राहुल मांजरे (वैदयकीय सेवा), सतीश देशपांडे (उदयोग क्षेत्र), त्रिमूर्ती प्रतिष्ठान (शिवकार्य), आनंद शेलार (क्रीडाक्षेत्र) यांना मान्यवरांच्या हस्ते शिवगौरव पुरस्कार देवून गौरविण्यात आले. शाल, श्रीफळ, सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरुप होते.

### विविध वजनी गटाचे अंतिम निकाल (प्रथम चार)

**५५ किलो आतील :** प्रतिक कुलकर्णी, विकी राठोड (दोघे सोलापूर), निखील सोनकांबळे (माढा), काशीनाथ देवकते (सोलापूर).

**६0 किलो:** अक्षय जगताप (टेंभुर्णी), आकाश वाघमारे (सोलापूर), राजेश प्रजापती (बार्शी), स्वप्नील राठोंड (सोलापूर).

**६५ किलो :** योगेश गवारे (बार्शी), गणेश जाधव (सोलापूर), अमन शेख (करमाळा), दिपक फरदाडे (बार्शी)

**७0 किलो:** निखील चव्हाण, शाबाद नदाफ, मैनोद्दीन रजभरे (तिघे सोलापूर), जयसिंह पवार (टेंभुर्णी)

**७५ किलो :** अकबर कुरेशी (सोलापूर), रोहित बोरंगे (बार्शी), आकाश सुरवसे, जावेद शेख (दोघे सोलापूर)

# मॉडेल अकादमीचा करियर अकादमीवर विजय

## किरण पवार करंडक १९ वर्षांखालील क्रिकेट

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ मे-**

जिल्हा क्रिकेट संघटनेचे तत्कालीन व्हाईस चेअरमन किरण पवार स्मृती करंडक क्रिकेट स्पर्धेत मॉडेल क्रिकेट अकादमीने करियर क्रिकेट अकादमीवर ९ गडी राखून दणदणीत विजय मिळविला.

सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशन आयोजित व डॅनिश केक पुरस्कृत ही स्पर्धा जुळे सोलापूर येथील भंडारी मैदानावर सुरू आहे. शनिवारी झालेल्या सामन्यात मॉडेल क्रिकेट ॲकॅडमीने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करताना करियर अकादमीचा डाव ७0 धावांत गुंडाळला. यात मयुरेश बांगरने २२ व अफन शेख याने १३ धावा केल्या. मॉडेलकडून ओंकार शेळके याने २९ धावात ६ बळी टिपले. टाकी शेख याने चार धावात दोन तर दर्शील फाळके याने नऊ धावात एक गडी बाद केला.

विजयी ७१ धावांचे लक्ष्य मॉडेलने १ गडी गमावित गाठले. मॉडेलकडून अनुज मुंदडा १७ धावा करून बाद झाला. साबीर सगुर याने नाबाद ३0, योगेश देवकतेने नाबाद २0 धावा करीत संघास सहज विजय मिळवून दिला. करियर अॅकॅडमीकडून सोहम याने २७ धावत १ गडी बाद केला.

### आजचा सामना

साऊथ सोलापूर आपटे ग्रुप विरुद्ध के.पी.सी.सी.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### वस्त्रोद्योग मंत्री सावकारे यांचा अन्नछत्रतर्फे सत्कार

**अक्कलकोट, दि.१७ मे-**

येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळातर्फे राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांचा सचिव शामराव मोरे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले, कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांच्या कुशल नेतृत्वाखाली अन्नछत्र मंडळाच्या यशामागे श्री स्वामी कृपा, टीम वर्क, शिस्तबद्धता ही त्रिसूत्री असल्याचे मनोगत मंत्री सावकारे यांनी व्यक्त केले. अन्नछत्र न्यास हे आम्हा खानदेशकरांचे भक्ती क्षेत्र असल्याचे मनोगत त्यांनी यावेळी व्यक्त केले. ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे सहपरिवार आले असता न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे यांच्या प्रमुख उपस्थितीत सत्करार झाला. यावेळी न्यासाचे बाळासाहेब घाटगे, संभाजीराव पवार, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, तानाजी पाटील, राजू पवार, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, एस के स्वामी, महांतेश स्वामी, शिव स्वामी, श्रीकांत स्वामी, शावरेप्पा माणकोजी, मल्लिनाथ कोगनुरे, विशाल घाडगे, रोहित कदम, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

### कोर्टीच्या छत्रपती शिवाजी प्रशालेत तनुजा खराडे प्रथम



**करमाळा, दि.१७ मे-**

कोर्टी (ता.करमाळा) येथील श्री.छत्रपती शिवाजी हायस्कूल मधील इयत्ता दहावी परीक्षेचा निकाल ९५.२३ टक्के लागला असुन तनुजा सुनिल खराडे ही ९१ टक्के गुण मिळवून प्रथम आली आहे. द्वितीय-वैष्णवी सचिन झाकणे -८९.६०, त्रुतीय -प्रज्ञा संदिप आदलिंगे ,८५.८० तर यश अनिल शिंदे यास ८५ टक्के व ऐश्वर्या सुनिल हुलगे हिस ८४ टक्के गुण मिळाले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांना वर्गशिक्षक आबासाहेब कारंडे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन डॉ. महेश अभंग, सचिव एँड.अनुप अभंग,मुख्याध्यापिका ज्योती चव्हाण -शिंदे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष बापू शिंदे यांनी अभिनंदन केले.

### अनुष्का घाडगेचे दहावी परीक्षेत यश



**बार्शी, दि.१७ मे-**

तालुक्यातील वांगरवाडी येथील सुभाष घाडगे यांची नात अनुष्का घाडगे हिने वाघोली, पुणे येथील प्रोडीजी पब्लिक स्कूलमधून दहावीच्या सीबीएससी बोर्ड परीक्षेत ९६.८० टक्के गुण मिळवत शाळेत तिसरा क्रमांक पटकावला. पुण्यात राहूनही ग्रामीण भागातील अनुष्काने नेत्रदीपक यश मिळविल्याबद्दल शाळेच्या व्यवस्थापन मंडळ आणि मुख्याध्यापकासह राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस शिरीष ताटे व वांगरवाडीतील ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

### यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा अध्यक्षपदी डॉ. निशिगंधा माळी



**मोडनिंब, दि.१७ मे-**

मुबई येथील यशवंतराव चव्हाण सेंटर अंतर्गत सोलापूर जिल्हा केंद्र अध्यक्षपदी माजी जिल्हा परिषद अध्यक्षा डॉ. निशिगंधा कोल्हे (माळी) यांची निवड झाली. यशवंतराव चव्हाण सेंटर ही संस्था सामाजिक आणि सांस्कृतिक तसेच साहित्य क्षेत्रात खासदार सुप्रिया सुळे यांच्या कार्याध्यक्षपदाच्या नेतृत्वातून कार्यरत आहे. प्राथमिक शिक्षण स्तरापासून महाविद्यालयीन स्तरापर्यंत विद्यार्थ्यांसाठी ही संस्था प्रेरणादायी आहे. डॉ. निशिगंधा कोल्हे यांचे जिल्ह्यासाठी चांगल्या पद्धतीने कार्य असल्याने त्यांची संस्थेच्या अध्यक्षपदी निवड झाली. त्या महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे शाखा मोडनिंब यांच्या सांस्कृतिक कार्याध्यक्ष तसेच रोटरी क्लब मोडनिंबच्या सांस्कृतिक पदी कार्यरत आहेत. जिल्हा केंद्रध्यक्षपदाच्या माध्यमातून पुनश्च त्यांना चांगले काम करण्याची संधी मिळाली आहे. त्यांच्या निवडीबद्दल मोडनिंब पंचक्रोशीतून विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय संस्थांनी आणि व्यक्तींनी अभिनंदन केले आहे.



### अंबाड येथे अकरावी प्रवेशाबाबत मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न

**कुर्डूवाडी, दि.१७ मे-**

यंदा प्रथमच अकरावी प्रवेश ऑनलाईन असल्याने त्याची माहिती ग्रामीण विद्यार्थी व पालकांना होण्यासाठी अंबाड (ता.माढा) येथील कै. विठ्ठलराव शिंदे कला व विज्ञान उच्च माध्यमिक विद्यालयात मार्गदर्शन कार्यशाळा घेण्यात आली. यंदा चालू शैक्षणिक वर्षापासून इयत्ता अकरावीची प्रवेश प्रक्रिया केंद्रीय पद्धतीने राबवली जाणार आहे. त्यादृष्टीने माढा तालुक्यातील लऊळ, उजनी (मा.), कुर्डू, अंबाड, शिराळ, पिंपळखुटे, ढवळस, पिंपळनेर, निमगाव (टें), पालवण येथील विद्यार्थी व पालकांना निमंत्रित करून अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेबद्दल सविस्तर मार्गदर्शन या कार्यशाळेत करण्यात आले. यामध्ये १९ मे ते २८ मे दरम्यान होणारी रजिस्ट्रेशन प्रक्रिया, त्यानंतर कॉलेज पसंत क्रमांक, पहिला राऊंड, दुसरा राउंड, तिसरा राउंड व विशेष फेरी याविषयी माहिती देण्यात आली. शाखा निवड, विज्ञान शाखेतील ग्रुप निवड व त्यातील विषय निवड तसे ॲडमिशन करण्यासाठी व रजिस्ट्रेशन करण्यासाठीच्या कागदपत्रांची माहीती दिली. ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया, ऑनलाइन रजिस्ट्रेशन करणे, शाळा पसंती क्रमांक देणे, विषय व शाखा निवडणे ही कार्यवाही कॉलेज स्तरावर सोमवारपासून करून दिली जाणार आहे. या कार्यशाळेसाठी विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शंकांचे समाधान करण्यात आले. तसेच अंबाड कॉलेजच्या शाखा त्यातील विषय, प्रोग्रॅम, सी ई टी क्लासेस याविषयी माहिती दिली. अध्यक्षस्थानी प्राचार्य जवानसिंग रजपूत होते. प्रास्ताविक प्रा. विष्णू घाडगे, ऑनलाइनचे प्रा. नागेश गायकवाड, तर सीईटीचे मार्गदर्शन प्रा. सागर देवकाते यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. देवीदास जगताप यांनी तर प्रा. सचिन यादव यांनी आभार मानले.

# विद्यार्थ्यांनी पाठ फिरविल्यामुळे ५४५ जागा रिक्त

## आरटीइ प्रवेशप्रक्रिया, तिसऱ्या फेरीत २९ मुलानीच घेतला प्रवेश

**तभा वृत्तसेवा ,**
**सोलापूर, दि. १७ मे..**

आरटीइ अंतर्गत तिसऱ्या फेरीत मोफत प्रवेशासाठी ४८ मुलांची निवड झाली असताना केवळ २९ मुलानीच प्रवेश घेतल्याने अध्याप ५४५ जागा रिक्त आहेत. त्यामुळे विध्यार्थ्यांसह पालकांनी मोफत प्रवेशाकडे पाठ फिरविल्याचे दिसून येते. बालकांचा मोफत व सक्तिचा शिक्षण हक्क अधिकार कायध्याअंतर्गत दुर्बल व वंचित घटकातील बालकांना स्वयं अर्थसहायित शाळा, विनाअनुदानित



शाळा, पोलीस कल्याणकारी शाळातील २५ टक्के राखीव जागांवर प्रवेशासाठी १४ फेब्रुवारी ते १० मार्च या कालावधीत ऑनलाइन प्रवेशप्रक्रिया राबविण्यात आली.

निवड झालेल्या १ हजार ८२२ विध्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. निवड होऊनही शाळांशी संपर्क न केलेल्या बालकांना वगळून शिल्लक जागांसाठी प्रतीक्षा यादीतील प्रवेशासाठी ४४२ बालकांची निवड

| | |
|---|---|
| एकूण शाळा | २८६ |
| एकूण जागा | २६६२ |
| एकूण अर्ज | ६१७७ |
| निवड बालक संख्या | २८८५ |
| मुदतीत प्रवेश | १७०७ |
| पहिल्या प्रतीक्षा यादीत प्रवेश | २२६ |
| दुसऱ्या प्रतीक्षा यादीत प्रवेश | १०९ |
| तिसऱ्या प्रतीक्षा यादीत प्रवेश | २९ |
| २६६२ जागांपैकी प्रवेश संख्या | २१७१ |
| शिल्लक जागा | ५४५ |

झाली होती. पहिल्या फेरीत २४ मार्चपर्यंत १३६ बालकांनी प्रवेश घेतला. दुसऱ्या फेरीच्या मुदतीत एक एप्रिलपर्यंत ८७ बालकांनी प्रवेश घेतला. तिसऱ्या प्रतीक्षा यादीतील प्रवेशासाठी सात मे पर्यंत मुदत होती. त्याला १४ मे पर्यंत मुदतवाढ देऊनही निवड झालेल्या ४८ बालकांपैकी फक्त २९ बालकांनी प्रवेश घेतल्याने जिल्ह्यात ५४५ जागा शिल्लक राहिले आहेत.

**जागा रिक्त राहण्याची कारणे..**

पालकांनी शाळांची पसंती नोंदवलेली असते. मात्र त्यांच्या पसंतीची शाळा न मिळाल्यास पालक आपल्या बालकाची निवड होऊनही शाळेत प्रवेश घेत नाहीत. त्यामुळे जागा रिक्त राहत आहेत. काहीवेळा कागदपत्रांमध्ये त्रुटी, वेळेत प्रवेश न घेणे आणि मोबाइल क्रमांक बदलल्यामुळेही प्रवेश निश्चित न झाल्याने जागा रिक्त राहतात.



## सचिन दोरकर ठरला वांगीच्या पीर महादेव केसरीचा मानकरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मे -**

वांगी येथील पीर महादेव यात्रेच्या निमित्ताने कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी वांगीच्या कुस्ती आखाडयात १०० रुपयांपासून ते ११ हजार रुपयांपर्यंत कुस्त्या लावण्यात आल्या.

या कुस्ती कार्यक्रमास उपस्थित असलेल्या मान्यवर मंडळींच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. शेवटची ११ हजार रूपयांची पीर महादेव केसरी कुस्ती महेश मांडवे आणि सचिन दोरकर यांच्यात झाली. यामध्ये सचिन दोरकर पीर महादेव केसरीचा मानकरी ठरला. प्रथमच महिलांच्याही कुस्त्या झाल्या. यात जालन्याची वैष्णवी सोळंकी आणि मोहोळची प्रमिला धोत्रे यांच्यात झालेली अटीतटीची कुस्ती बरोबरीत सुटली. कुस्ती यशस्वी होण्यासाठी यात्रा कमिटी व ग्रामस्थांचे सहकार्य लाभले.

## शंभूराजे जयंती उत्सव विविध कार्यक्रमांनी साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१७ मे-**

छत्रपती संभाजी राजे युवा मंचच्या वतीने गेल्या आठ वर्षांपासून छत्रपती संभाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात व विविध कार्यक्रमांनी साजरी करण्यात येते. येदाही १३ ते १५ मे दरम्यान सलग तीन दिवस चाललेल्या या उत्सवात हजारो शिवप्रेमींनी सहभाग नोंदवला.

१३ मे रोजी भव्य शिवकालीन शस्त्र प्रदर्शनाचे उद्घाटन विजयनाना राऊत यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रदर्शनाला लहान मुले, महिला, युवक व जेष्ठ नागरिकांनी भरभरुन प्रतिसाद दिला. १४ मे रोजी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराजांच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले व कार्यक्रमास सुरुवात



झाली. महाप्रसादासाठी परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. १५ मे रोजी सलग आठव्या वर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. . या शिबिराचे उद्घाटन चेअरमन रणवीर राऊत यांच्या हस्ते झाले. प्रखर उन्हाचा विचार न करता अनेक रक्तदात्यांनी पुढाकार घेत आपली सामाजिक जबाबदारी पार पाडली. कार्यक्रमासाठी विजयनाना राऊत, राजेंद्र राऊत (माजी आमदार), रणवीर राऊत (माजी चेअरमन) तसेच सर्व आजी-माजी नगरसेवक, प्रतिष्ठित नागरिक व विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. या यशस्वी आयोजनामध्ये अध्यक्ष ऋषीकेश कदम आणि छत्रपती संभाजी राजे युवा मंचच्या सर्व कार्यकर्त्यांनी अतिशय मेहनतीने सहभाग घेतला. या माध्यमातून शंभू जयंतीचा ऐतिहासिक व प्रेरणादायी संदेश समाजात पोहोचवण्यात यश मिळाले.



## मानेगावच्या जि.प.शाळेतील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१७ मे-**

जि.प.प्रा शाळा, मानेगाव, ता.सांगोला येथील सन १९९४-९५ या शैक्षणिक वर्षांमधील इ.७ वीच्या विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी शिक्षक मोहन केदार तर सरपंच तानाजी बाबर, तानाजी बाबर गुरुजी, माळी गुरुजी, माजी सरपंच बाबुराव भजनावळे, विश्वनाथ पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मोहन केदार यांनी मनोगतात मुलांना कणखर व कौशल्यपूर्ण तसेच संकट वेळी सामना करण्यासाठी त्यांच्यामध्ये जिद्द निर्माण केली. ३० वर्षानंतर असा कार्यक्रम आपण आयोजित केला व ते भाग्य मला मिळाल्यामुळे मी पूर्ण भारावून गेलो आहे असे मत व्यक्त केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी, सर्व विद्यार्थ्यांनी शाळेविषयी असणारे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रकाश माने, सूत्रसंचालन शिक्षक विजयकुमार शिंदे यांनी केले. आभार सुभेदार धनाजी पाटील यांनी मानले. यावेळी चेअरमन धनाजी बाबर, अनिल बाबर, शहाजी पाटील, हरी घुले, किरण शिंदे, अर्जुन कोडग, गोरख कोडग, अण्णा पाटील उपस्थित होते.

## पिलीव येथे विविध क्षेत्रातील गुणवंतांचा सन्मान

### संग्रामराजे प्रतिष्ठातर्फे आयोजन

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. १७ मे -**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील संग्रामराजे प्रतिष्ठानच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पुरस्कार प्राप्त गुणवंतांचा सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी कृषी व पशुसंवर्धन सभापती संग्रामसिंह जहागिरदार यांच्या हस्ते व प्रतिष्ठानचे मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मान करण्यात आला.



यामध्ये माळशिरस पंचायत समितीचे विस्तार अधिकारी अनिल सावळजकर यांनी पिलीव ग्रामपंचायतीचे प्रशासक म्हणून उत्कृष्ट कार्य केले याबद्दल तसेच जिल्हा स्तरावर धावण्याच्या स्पर्धेत चंद्रकांत धसाडे यांनी उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल, तसेच आदर्श पुरस्कार प्राप्त शिक्षक योगेश हावळे, वैशाली भागवत, खटावकर, बगाडे, यांचा यावेळी सन्मान करणयात आला. तसेच हाज यात्रेसाठी निघालेले अफजल भाई पठाण यांचा सत्कार यावेळी करण्यात आला.

तसेच शिक्षक कॉलनी याठिकाणचा अनेक वर्षापासून प्रलंबित असणारा सिंगल फेजचा प्रश्न विधानपरिषदेचे आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांच्या सहकार्याने माजी सभापती संग्रामसिंह जहागिरदार यांनी मार्गी लावल्याबद्दल त्यांचा यावेळी सन्मान करणयात आला. या सत्कार समारंभ कार्यक्रमास माजी केंद्र प्रमुख कल्याण नष्टे, प्रकाश फलके, जे के गुरुजी, महादेव शेटे, राजेंद्र करांडे, रणधिरसिंग जामदार, अडव्होकेट वैभव मेथवडे, मोहसीन शेख, समशेरसिंग रजपुत, नानासाहेब मदने, तानाजी लोखंडे, किशोर लोखंडे यांच्या सह अनेक मान्यवर यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सांगोल्यात तीन दिवस रक्तदान शिबिराचे आयोजन

**सांगोला, दि.१७ मे-**

सांगोलेचे माजी नगराध्यक्ष, सां. ता.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांच्या ७१ व्या वाढदिवसानिमित्त विद्यामंदिर परिवार व लायन्स क्लब ऑफ, सांगोला यांच्यावतीने २० मे पासून तीन दिवस रक्तदान शिबीर घेण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.



सलग २२ वर्षे वाढदिवसानिमित्तच्या रक्तदान शिबिरात १ हजारपेक्षा जास्त रक्तदाते रक्तदान करतात. मंगळवार दि.२० मे रोजी लोणविरे हायस्कूल, गुरूवारी दि.२२ मे रोजी नाझरा विद्यामंदिर, शुक्रवार दि.२३ मे रोजी जि.प.प्रा.मुलींची शाळा नं.१, जुने कोर्ट जवळ सांगोला, पांडुरंग कॉम्प्लेक्स आदर्श पतसंस्था शेजारी कोळा (ता. सांगोला) येथे सकाळी ८ ते सायं.६ या वेळेत संपन्न होत आहे. शिबिरात सर्व शैक्षणिक, साहित्यिक, राजकीय, सामाजिक, औद्योगिक, कला, क्रीडा व सेवाभावी संस्था आदींसह नागरिकांनी उपस्थित राहून रक्तदान करावे असे आवाहन विद्यामंदिर परिवार व सागोला लायन्स क्लबच्या वतीने करण्यात आले.

## ॲड. गिड्डे यांचा आत्मदहनाचा इशारा

**मोडनिंब** : मोडनिंब (ता. माढा) येथील यूनियन बँकेतील अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारा विरोधात ॲड. विजयसिंह गिड्डे यांनी सोमवार (दि.१९) रोजी बँकेसमोर आत्मदहनाचा इशारा दिला आहे. बँकेकडून सामान्य उद्योजकांना कर्ज प्रक्रियेत मनसिक त्रास दिला जात आहे. काही प्रकरणांमध्ये पुढाऱ्यांच्या शिफारशीशिवाय कर्ज प्रकरण पुढे सरकत नाही. चांगला सिबिल स्कोअर असलेल्या नागरिकांनाही अडथळे निर्माण करण्यात येत आहेत. काही प्रकरणांमध्ये बनावट कर्जवाटप व कमिशन घेऊन प्रकरणे मार्गी लावल्याचे गंभीर आरोपही गिड्डे यांनी केले आहेत.

# मोडनिंबच्या वेताळ देवस्थान यात्रेत सोंगांनी वेधले लक्ष

## डिजिटल आणि पौराणिक सोंगांना उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब,दि.१७ मे-**

मोडनिंब (ता. माढा) येथील ग्रामदैवत श्री वेताळ साहेब देवस्थान यात्रेत यंदा विविध मनोरंजनात्मक कार्यक्रम झाले. यामध्ये पौराणिक, आधुनिक व डिजिटल सोंगांच्या गाड्यांचे विशेष आकर्षण होते. त्यांनी सर्वांचे विशेष लक्ष वेधून घेतले होते.

या देखाव्यांसाठी गावातील विविध व्यवसायांत कार्यरत तरुणांनी सुमारे दीड महिना मेहनत घेत विविध सोंगे सजवली. सौदागर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हे सोंग साकारण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज, डायनोसॉर, श्री विठ्ठल, कोंबडे, नरसिंह महाराज, भगवान शंकर अशा विविध पौराणिक व आधुनिक सोंगांनी सजवलेले सुमारे ३० ट्रॅक्टर, बैल गाड्यांनी संपूर्ण गावाची प्रदक्षिणा घातली. यामध्ये नरसिंह महाराजांचा देखावा, कोंबडा आणि डायनोसॉर हे विशेष आकर्षण ठरले. या भव्य देखाव्यांना पाहण्यासाठी मोडनिंबसह परीते, तुळशी, अरण, करकंब, घोटी, भेंड, बावी, शेटफळ, आष्टी आदी गावांतील तसेच परराज्यातीलही लाखो भाविकांनी गर्दी केली होती. रस्त्याच्या



### सोंग तयार करण्यासाठी तरुणांची मेहनत

गावातील विविध व्यवसायात कार्यरत असलेल्या युवकांनी व्यवसाय बाजूला ठेवून सुमारे दीड महिना रात्रंदिवस मेहनत घेत सोंगांची निर्मिती केली. सौदागर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती शिवाजी महाराज, भगवान शंकर, नरसिंह, डायनोसॉर, १५ फुटी कोंबडा आदी विषयांवर साकारण्यात आलेले सोंग अत्यंत आकर्षक ठरले. सोंग म्हणजे केवळ मनोरंजन नव्हे, तर त्यामागे गावातील युवकांची निष्ठा आणि एकत्रित कामाची चोख प्रतिमा उमटली. ट्रॅक्टरवर उभारलेले मंच, लाईटिंग, रंगसंगती पाहून अनेकांनी मोबाईलमध्ये क्षण टिपले.

दुतर्फा गर्दी उसळली होती. सोंगांसोबतच हलगी, झांजपथक, लेझीम आणि संबळ यांसारख्या पारंपरिक वाद्यांसह लोककला देखील यात्रेत होत्या. यामुळे जुनी परंपरा आणि नविन डिजिटल सादरीकरण यांचा सुंदर संगम पहायला मिळाला. यात्रेदरम्यान विविध अन्नपदार्थांचे स्टॉल्स, खेळणी, वाजंत्री, धार्मिक साहित्य विक्रेते, फुलांचे हार, फुगे, पाळणे यामुळे गावात मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल झाली.

### सोंगाच्या ३० गाड्यांची प्रदक्षिणा, नरसिंह व डायनोसॉर ठरले आकर्षण

'नरसिंह महाराजांचा देखावा' आणि 'डायनोसॉर' सोंग यात्रेत विशेष चर्चेत राहिले. लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वांचीच नजर या गाड्यांवर खिळून राहिली होती. छत्रपती शिवाजी महाराज, भगवान शंकर,श्री विठ्ठल, नरसिंह महाराज, डायनोसॉर, कोंबडा आदी सोंगांनी सजलेल्या सुमारे ३० ट्रॅक्टर, बैल गाड्यांनी गावाची प्रदक्षिणा केली. विशेषतः नरसिंह महाराज, कोंबडा आणि डायनोसॉर या सोंगांना भाविकांची मोठी पसंती मिळाली.

### शिस्तबद्ध आयोजन आणि पोलीस बंदोबस्त

यात्रा शांततेत पार पाडण्यासाठी श्री वेताळ देवस्थान पंच कमिटीसह ग्रामस्थांनी मोलाचे सहकार्य केले. पोलीस निरीक्षक नारायण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार आसिफ आतार, सहदेव देवकर व हर्षवर्धन वाघमोडे यांनी उत्कृष्ट बंदोबस्त ठेवला.

स्थानिक व्यापाऱ्यांसह बाहेरून आलेल्या विक्रेत्यांनाही चांगला प्रतिसाद मिळाला. यामुळे गावच्या अर्थचक्रालाही चालना मिळाली.

गावात वाहनांची वाढती गर्दी लक्षात घेता पोलीस व वेताळ देवस्थान ट्रस्ट सहकार्याने वाहतुकीसाठी मार्गदर्शक फलक, पार्किंग क्षेत्र निश्चित केली गेली. त्यामुळे कुठलाही अनुचित प्रकार झाला नाही. गुरुवारी यात्रेची सांगता झाली. श्री वेताळ देवस्थान ट्रस्ट आणि संपूर्ण पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त राखला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



सोलापूर : एमपीएससी परीक्षेत महाराष्ट्रात दुसरा आल्याबद्दल परीस गायकवाडचा मुंबई येथे 'मातोश्री'वर माजी मुख्यमंत्री पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व रश्मी ठाकरे यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी परीसची आई अस्मिता गायकवाड व वडील अॅड. सुरेश गायकवाड उपस्थित होते.

## दहावीतील गुणवंत विद्यार्थी



जान्हवी कस्तुरे
९३.४० टक्के
शांती इंग्लिश स्कूल



सूर्या सावंत
९०.६० टक्के
दमाणी स्कूल



ऋषीकेश शिंदे
८६.२० टक्के
एसव्हीसीएस स्कूल

## महत्वाचे...



### सकुरा जपान एक्सचेंज प्रोग्रॅमसाठी ह. दे. प्रशालेच्या रेवती गुजरेची निवड

**सोलापूर, दि. १७ मे-**

जपान येथे १४ ते २१ जून दरम्यान होणा-या सकुरा जपान एक्सचेंज प्रोग्रॅमसाठी हरिभाई देवकरण प्रशालेमधील इयत्ता दहावीतील रेवती गुजरे हिची निवड भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाच्या अंतर्गत नॅशनल इनोवेशन फाउंडेशनद्वारे झाली आहे. त्यासाठी रेवतीने गौतम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली कपडे वाळविण्याचे आधुनिक तंत्र हे उपकरण तयार केले होते. या उपकरणाची निवड महाराष्ट्र राज्यातून दिल्ली येथे झालेल्या दहाव्या राष्ट्रीय इन्स्पायर अवॉर्ड विज्ञान प्रदर्शनासाठी झाली होती. देशातील पहिल्या वीस सर्वोत्कृष्ट उपकरणांमध्ये तिच्या उपकरणाची निवड झाली व विज्ञान भवन, नवी दिल्ली येथे केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांच्या हस्ते तिचा गौरव केला. प्रशालेचे शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन व मुख्याध्यापिका दीपा फाटक, ज्येष्ठ पर्यवेक्षक हनमंत मोतीबने हनमंत, कमळे लकेश, सर्वगोड औंदुबर, शहाणे मारूती व नेवरे गणेश यांनी गुजरे हिला जपान दौ-यासाठी शुभेच्छा दिल्या.

**मोबाईलव्दारेही हे उपकरण ऑपरेट करण्यात येईल**

यावेळी रेवती म्हणाली या उपकरणाचा उपयोग पुणे, मुंबई सारख्या शहरामंध्ये असणा-या अपार्टमेंटमधील ज्या घरांना कपडे वाळविण्यासाठी बाल्कनी नाही, अशा घरांच्या खिडक्यांमध्ये हे उपकरण लावता येईल. त्यामुळे घरामध्ये दुर्गंधी किंवा रोगराई पसरणार नाही. या उपकरणांमध्ये अशी सोय आहे की पाऊस आला तर वाळलेली कपडे खिडकी जवळ येतील त्यामुळे कपडे भिजणार नाहीत. कपडे वाळून आपण बाहेर गेलो तर मोबाईल व्दारे सुध्दा हे उपकरण ऑपरेट करण्यात येईल.

# अक्कलकोट महामार्गावर जीवघेणी कसरत सुरुच

## महामार्ग ओलांडण्यासाठी नागरिक होत आहेत जीवावर उदार

## प्रतिबंधात्मक जाळी तोडून महिला गाठत आहेत रस्ता





सोलापूर : अक्कलकोट रोडवरील डिव्हाडरवरून नागरिक रस्ता ओंलाडण्याचा प्रयत्न करतात. यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ मे-**

सोलापूर शहरातील अक्कलकोट महामार्गावर गेल्या काही दिवसांपूर्वी नागरिकांच्या मृत्यूचे प्रमाण वाढत होते. महामार्ग ओलांडण्यासाठी कामगार, महिलांनी तसेच इतर नागरिकांनी शॉर्टकट वापरत महामार्गावरून जाणे पसंत केले. मात्र या शॉर्टकटच्या नादात अनेकांना आपला जीव गमवावा लागला. याचे खापर प्रशासनावर फुटले. प्रशासनाने तात्काळ प्रतिबंधात्मक उपाय म्हणून अक्कलकोट रोडवरील दुभाजक येथे प्रतिबंधात्मक जाळी बांधली. एवढे करून देखील नागरिक सदरची जाळी तोडून त्याच दुभाजकावरून उड्या मारून रस्ता ओलांडण्यात धन्यता मानत आहेत. मात्र पुन्हा एकदा नागरिक जीवावर होत असल्याचे चित्र शहरात दिसत आहे.

दरम्यान, काही महिन्यांपूर्वी शहरातून जाणाऱ्या अक्कलकोट महामार्गावर अपघाताचे प्रमाण वाढले होते. दुचाकी तसेच पादचारी नागरिकांना आपला जीव गमवावा लागला होता. विशेष करून पायी जाणाऱ्या महिला तसेच नागरिकांचा यात समावेश आहे. रस्ता ओलांडण्यासाठी नागरिकांनी शॉर्टकट वापरला. उड्डाणपूल खालून जाण्यासाठी रस्ता असताना देखील, एवढ्या लांबून जाण्यापेक्षा दुभाजक ओलांडून जाणे नागरिकांनी पसंत केले. मात्र त्यांना हे माहीत नव्हते की, दुभाजक ओलांडताना मृत्यू समोर उभा आहे. त्याचा परिणाम दुर्दैवी झाला. अशा दुर्दैवी घटना घडल्यानंतर देखील नागरिकांनी समज घेणे गरजेचे होते. परंतु अशा घटनांना बगल देत नागरिकांनी पुन्हा एकदा त्याच दुभाजकावरून उड्या मारून रस्ता ओलांडण्यात धन्यता मानत आहेत. विशेष करून प्रशासनाने येथे प्रतिबंधात्मक जाळी उभारली आहे. तरीदेखील सदरची जाळी तोडून महिला आणि नागरिक जीवावर उदार होऊन महामार्ग ओलांडताना दिसत आहेत. अशा परिस्थितीत पुन्हा एकदा अपघात झाल्यास या घटनेस जबाबदार कोण ? असा प्रश्न उपस्थित होत आहे. शनिवारी सकाळी देखील अक्कलकोट महामार्गावर काही महिला दुभाजकावरून महामार्ग ओलांडताना दिसून आल्या. त्यामुळेच हा महामार्ग मृत्यूचा सापळा बनत चाललेला आहे. गेल्या काही दिवसांपासून सोलापूर शहरात अपघाताचा धोका वाढत आहे. त्यामध्ये अशा घटना वारंवार घडत असल्याने, अपघाताच्या प्रमाणात दिवसागणिक वाढ होत आहे. भरधाव येणारी चारकीचाकी वाहने, जड वाहने, तसेच इतर वाहनांसमोर नागरिक आल्याने वाहनावरील चालकाचा ताबा सुटून दुर्दैवी घटना घडत आहेत. अशा परिस्थितीत नागरिकांनी देखील आपल्या जीवावर उदाहरण होता सुरक्षित आणि वाहतुकीचे नियम पाळूनच रस्ता क्रॉस करावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

**नियम तोडणाऱ्या नागरिकांवर कारवाई ?**

जीवावर उदार होऊन अनेक नागरिक महामार्गावरून ये जा करतात. अशा अवस्थेत भरधाव येणारी वाहने अपघाताची कारणे ठरतात. जाणून बुजून काही नागरिक महामार्ग ओलांडण्यासाठी शॉर्टकट घेतात. दुभाजकावरून सर्रासपणे उड्या मारतात. अशा नागरिकांवर कारवाई करण्याची मागणी आता केली जात आहे. महामार्ग पोलिसांनी अशांवर कडकी. कारवाई करावी, जेणेकरून अशा अप्रिय घटना घडणार नाहीत.

**नागरिकांनी सामंजस्य दाखवणे आवश्यक**

शहरातून जाणारा अक्कलकोट महामार्ग हा प्रमुख रहदारीचा मार्ग आहे. या रस्त्यांवरून मोठ्या प्रमाणात जड वाहने ये जा करतात. अशा परिस्थितीत नागरिकांनी महामार्गावरून जाताना सावधानता बाळगणे गरजेचे आहे. परंतु याला बगल दिली जाते. उड्डाणपूलाखालून रस्ता क्रॉस करण्यासाठी रस्ता बनवण्यात आला आहे. याचा वापर न करता सर्रासपणे शॉर्टकट घेतला जाणारा शॉर्टकट नागरिकांच्या जीवनाची ''शॉर्ट'' लाईफ बनत आहे. त्यामुळे नागरिकांनी देखील सामंजस्यपणा दाखवत उशीर का होईना, परंतु सुरक्षितच जाईन, हा विश्वास बाळगला पाहिजे.

# सौभाग्यलंकार चोरणाऱ्या टोळीतील तिघांना अटक

## फौजदार चावडी पोलिसांची कारवाई

## ५ गुन्हे उघडकीस

## सहा लाख रुपयांचे सोन्याचे दागिने जप्त



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ मे -**

शहरात महिलांच्या गळ्यातील सौभाग्यलंकार जबरदस्तीने चोरून दुचाकीवरून पळ काढणाऱ्या टोळीतील तिघांना फौजदार चावडी पोलिसांनी अटक करून त्यांच्याकडून ५ गुन्हे उघडकीस आणले. अटक करण्यात आलेल्या गुन्हेगारांकडून पोलिसांनी दुचाकी व सोन्याचे दागिने असा ५ लाख ९६ हजार ५०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

राहुल राजाराम गायकवाड (वय २०), प्रकाश गंगाधर धोत्रे (वय २४), अंबादास उर्फ अमोल अंकुश गायकवाड (वय २१, सर्व रा. दगडी शहाजानपूर, पांगरी रोड, बीड) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. तर सागर नवनाथ जाधव (वय २१) आणि विकास रमेश जाधव (वय २२, रा. दगडी शहाजानपूर, पांगरी रोड, बीड) हे दोघे अद्याप फरार आहेत. अटक करण्यात आलेल्या तिघांना न्यायालयाने रविवारपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला आहे.

रूपाली संतोष अहिरसंग (रा. डांगे नगर, बाळे) या ६ मे २०२५ रोजी रात्री सव्वा आठच्या सुमारा त्यांच्या दुचाकीवरून मुलीसह जुना पूना नाका येथून घराकडे जात होत्या. त्यावेळी मडकी वस्तीजवळ पाठीमागून दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र जबरदस्तीने हिसकावून चोरून नेले होते. याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या गुन्ह्याचा तपास करताना फौजदार चावडी पोलिसांनी तांत्रिक तपास व सीसीटीव्ही चित्रीकरण तपासून बीड जिल्ह्यातील गुन्हेगारांच्या टोळीतील तिघांना सापळा लावून पकडले. त्यांच्याकडे केलेल्या चौकशीमध्ये या टोळीतील गुन्हेगारांनी मिळून चालू वर्षात फौजदार चावडी पोलिस ठाण्याच्या हद्दत दोन, विजापूर नाका, सदर बझार आणि जेलरोड पोलिस ठाण्याच्या हद्दीत अशाचप्रकारचे गुन्हे केले असल्याचे निष्पन्न झाले. या गुन्हेगारांकडून पोलिसांनी साडेसात तोळ्याचे सोन्याचे दागिने व एक दुचाकी, मोबाईल असा मुद्देमाल हस्तगत केला.

ही कारवाई पोलिस आयुक्त एम राजकुमार, उपायुक्त विजय कबाडे, सहायक आयुक्त प्रताप पोमण, पोलिस निरीक्षक अरविंद माने, तानाजी दराडे यांच्या म ार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक शंकर धायगुडे, हवालदार प्रविण चुंगे, बसवराज परीट, पोलिस कर्मचारी शिवानंद भिम दे, आयाज बागलकोटे, विनोद व्हटकर, कृष्णा बडुरे, विनोद पुजारी, अमोल खरटमल, ज्ञानेश्वर गायकवाड, शशिकांत दरोडे, अर्जुन गायकवाड, तौसिफ शेख, अतिश पाटील, अजय चव्हाण, सचिन लवटे, सुधाकर माने, सुरज सोलवनगर यांनी केली.

# सासरी जाण्याकरीता एसटीत बसलेली विवाहिता लहानग्या मुलीसह बेपत्ता





**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ मे -**

सासरी जाण्यासाठी लहान मुलीसह एस.टी. बसमध्ये बसलेली २० वर्षीय विवाहिता इच्छित स्थळी उतरलेली नाही. हा प्रकार ०७ मे रोजी दुपारी घडलीय.

लक्ष्मी उर्फ ज्योती आकाश शिंदे (वय २०) आणि मुद्रा आकाश शिंदे (वय ३, दोघी रा. मसवड सिध्दनाथ मंदीराजवळ, सोलापूर) अशी बेपत्ता झालेल्या माय-लेकींची नावे आहेत. या प्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात बेपत्ता रजिस्टरला नोंद झाली असल्याचे सांगण्यात आलंय. दक्षिण सोलापूर तालुक्यातील तोगराळी येथील सातव्वा शंकर कोळी (वय ३५) यांनी तिची विवाहित मुलगी सौ. ज्योति हिला तिच्या मुद्रा या लहान मुलीसह सासरी म्हसवडला जाण्याकरीता बस स्थानकातून सोलापूर-सातारा एस.टी. त बसवून पाठविले, मात्र ते दोघे ही सासरी न जाता बेपत्ता झाल्याचा अर्ज फौजदार चावडी पोलीस ठाण्यात दाखल झालाय. हवालदार एम जी कटारे पुढील तपास करीत आहेत.

# भांडण सोडवताना सहा जणांची एकास मारहाण

**सोलापूर, दि. १७ मे**

भांडण सोडवण्यास गेल्याने सहाजणांनी लाकडाने, कोयत्याने व दगडाने एकास मारहाण केली.त्यात तो जखमी झाला. शुक्रवारी (ता. १६) दुपारी साडेचारच्या सुमारास जुळे सोलापुरातील ताकमोगे वस्तीत ही घटना घडली. विकास विजय डोलारे (वय ३०, रा. ताकमोगे वस्ती) असे त्याचे नाव आहे. राहत्या घराजवळ सुरू असलेले भांडण सोडवण्यास गेल्याने आनंद ताकमोगे, अभि ताकमोगे यांच्यासह सहाजणांनी त्याला मारहाण केली. त्यात जखमी झाल्याने उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे. याची सिव्हिल पोलिस चौकीत नोंद झाली आहे.

# सोलापूर बसस्थानकच अस्वच्छता अन् दुर्गंधीचे आगार

## अवकाळी पाऊस, लघुशंकेने घाणीचे साम्राज्य

## एसटी महामंडळाचे दुर्लक्ष



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मे-**

सोलापूर मध्यवर्ती बसस्थानक परिसर अस्वच्छतेच्या आणि दुर्गंधीच्या विळख्यात अडकलेले आहे. सोलापूर मध्यवर्ती बसस्थानक परिसरात येणाऱ्या प्रवाशांना अस्वच्छतेचा आणि दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे. सर्वत्र अस्वच्छता, दुर्गंध आणि घाणीचे साम्राज्य पसरल्याने सोलापूर बसस्थानक विविध समस्यांचे आगार बनलेले दिसत आहे.

सोलापूर मध्यवर्ती बसस्थानक परिसरात दररोज असंख्य प्रवाशांचा राबता आहे. सध्या उन्हाळ्याचा हंगाम सुरू असल्याने बसस्थानक परिसरात आबालवृद्ध आणि महिलांचा प्रवास मोठ्या प्रमाणात होत आहे. ही बाब लक्षात घेता सोलापुरातून विविध मार्गावर जादा एसटी बसेस सोडण्याचे नियोजन एसटी महामंडळाच्या सोलापूर विभाग आणि आगार यांच्यावतीने करण्यात आले आहे. मात्र प्रवासी संख्या वाढल्याने त्या प्रमाणात स्वच्छता होत नसल्याचे विदारक चित्र दिसून येत आहे. प्रवासी संख्या जास्त आणि स्वच्छतागृह कमी असल्याने बसस्थानक परिसरात नव्याने स्वच्छतागृह उभारण्यात येत आहे. सदरच्या स्वच्छतागृहाचे काम अंतिम टप्प्यात आले असताना, प्रवासी उघड्यावरच लघुशंका करत असल्याने सर्वत्र दुर्गंधीचे आणि घाणीचे साम्राज्य पसरले आहे. अशा स्थितीत एसटी महामंडळाकडून नियमित स्वच्छता करणे गरजेचे असताना देखील तसे होताना दिसत नाही. आज सकाळी सोलापूर मध्यवर्ती बसस्थानक परिसरात अस्वच्छता दुर्गंध पसरल्याने प्रवाशांना तोंडावर हात रुमाल लावून जावे लागले.

दरम्यान, बसस्थानक परिसरातील अस्वच्छतेचा विषय नेहमीच प्राधान्य क्रमाने सोडवणे गरजेचा आहे. मात्र याकडे दुर्लक्ष होताना दिसत आहे. बसस्थानक परिसर स्वच्छ ठेवण्याचे कंत्राट काही खाजगी कंपन्यांना देण्यात आले आहे. या खाजगी कंपन्यांमार्फत कामगार स्वच्छता करण्याचे काम करतात. परंतु नियमित स्वच्छता होते की नाही? याबाबत मात्र प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. वस्तुस्थिती पाहिली असता काही ठिकाणी स्वच्छता केली जाते.

जेव्हा मंत्री महोदय दौऱ्यावर येणार असतात, विशेष करून तेव्हाच स्वच्छता मोठ्या प्रमाणात केली जाते. मात्र इतर वेळी त्याकडे ढुंकूनही पाहिले जात नाही. असे विदारक चित्र बसस्थानक परिसरात दिसून येत आहे. अशा अस्वच्छ आणि दुर्गंध पूर्ण वातावरणात प्रवाशांना प्रवास करणे त्रासदायक ठरते. याकडे सोलापूर एसटी विभाग आणि आगाराने जाणीवपूर्वक लक्ष देणे गरजेचे बनले आहे.

**एसटीची भाडेवाढ; मात्र स्वच्छता, सुविधा नाहीत**

एसटी महामंडळाच्या वतीने उन्हाळी व दिवाळी हंगामात भाडेवाढ केली जाते. हंगामात प्रवासी संख्या वाढल्याने उत्पन्न प्राप्त करण्याचे उद्देशाने भाडे वाढ होते. परंतु त्या बदल्यात स्वच्छता आणि सुविधा दिल्या जात नाहीत. स्थानक परिसरात अपुरे पाणी तसेच अस्वच्छता दिसून येते. वास्तविक पाहता प्रवाशांना सोयीसुविधा तसेच स्वच्छता प्राधान्याने पुरवणे गरजेचे आहे. मात्र तसे होताना दिसत नाही. महामंडळाने तसेच परिवहन मंत्रालयाने याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

# बिल देण्यावरुन तरुणावर चाकुहल्ला

**सोलापूर, दि. १७ मे -**

जेवणाचे बिल देण्यावरुन झालेल्या वादातून एकाने चाकुने तरुणावर हल्ला केला. त्यात तो जखमी झाला. शुक्रवारी (ता. १६) रात्री साडेआठच्या सुमारास भुलाबाई चौकानजीक महाराष्ट्र चिकन शॉपसमोर ही घटना घडली.

जनार्दन दगडू पवार (वय ३२, रा. केरबा काका चौक, विजापूर नाका झोपडपट्टी क्रमांक दोन, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. जनार्दन व त्याचे मित्र जेवण्यासाठी गेले होते. बलि देण्याच्या कारणावरुन झालेल्या वादातून विनायक नारबंडी याने चाकुने त्याच्यावर हल्ला केला. त्यात जखमी झाल्याने त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे. याची सिव्हिल पोलिस चौकीत नोंद झाली आहे.









**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





## दै. तरुण भारत माजी कर्मचाऱ्यांतर्फे रोहिणी तडवळकर यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ मे-**

सोलापूर भारतीय जनता पार्टीच्या नूतन अध्यक्ष रोहिणी तडवळकर यांचा तरुण भारत माजी कर्मचारी समितीच्यावतीने अध्यक्ष ज्ञानेश्वर म्याकल यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी सर्वश्री अभय दिवाणजी, दशरथ वडतीले, रमेश बसाटे, राजेंद्र खमितकर, रामचंद्र तडवळकर, शरणप्पा शाबादे, दशरथ चव्हाण तसेच अ‍ॅड. मल्लिनाथ शाबादे, अ‍ॅड. अमोल कळके, नितीन शेजुळ, सतीश जिरांकलगिकर व प्रमोद तम्मनवार हे उपस्थित होते.

# उजनीच्या पाण्यामुळे सोलापूरकरांच्या आरोग्याला धोका

- जागतिक जलतज्ञ, जलपुरूष डॉ. राजेंद्रसिंह यांचा दावा
- पुणे जिल्ह्यातील सांडपाण्यामुळे उजनीतील ११७ टीएमसी पाणी झाले प्रदूषित



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मे-**

सोलापूर जिल्ह्यातील लोकांचे आरोग्य उजनी धरणातील पाण्यावर अवलंबून आहे. पुणे जिल्ह्यातील येणाऱ्या सांडपाण्यामुळे उजनी धरणातील ११७ टीएमसी पाणी प्रदूषित होत आहे. प्रदूषित पाण्यामुळे सोलापूरच्या लोकांचे आरोग्य बिघडत आहे. लोकांच्या कामाची क्षमता कमी होत आहे. याकडे लोकप्रतिनिधीचे दुर्लक्ष आहे, असा आरोप जागतिक जलतज्ञ, जलपुरूष डॉ. राजेंद्रसिंह यांनी केला आहे.

जागतिक जलतज्ञ, जलपुरूष डॉ. राजेंद्रसिंह हे सोलापूर जिल्हा दौऱ्यावर आहेत त्यांनी उजनी धरणाची पाहणी केल्यानंतर आज सोलापुरात श्रमिक पत्रकार संघात आयोजित पत्रकार परिषदेमध्ये आपली भूमिका स्पष्ट केली. यावेळी त्यांनी उजनी धरणातील पाण्याचे प्रदूषण, सिद्धेश्वर मंदिर तलावातील पाण्याची स्थिती, देशभरातील नदी स्वच्छता मोहीम या विषयावर भाष्य केले.

ते पुढे म्हणाले, उजनी धरणातील पाण्यासंदर्भात विविध सहा समित्या गठीत करण्यात येत आहेत. या माध्यमातून या धरणातील जलप्रदूषणासंदर्भात जनजागृती उपाययोजना आणि पुढील दिशा ठरविण्यात येणार आहे. जल साक्षरता मोहीम राबविण्यात येणार आहे. उजनी धरणातील पाणी प्रदूषण होते या संदर्भात लोकप्रतिनिधींना प्रश्न विचारला पाहिजे. येथील पाण्याच्या शुद्धते संदर्भात दुर्लक्ष होत असल्याचा आरोप त्यांनी केला. पाणी हे तीर्थ आहे, ते शुद्ध असायला हवे. याची जबाबदारी सर्व पदाधिकारी आणि लोकांचीही आहे. उजनी जलाशियातील प्रदूषित पाण्यामुळे होणारे गंभिर आजार यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहेत. आपल्या उजनी तलावातील पाणी पुणे आणि पिंपरी चिंचवड येथील येणारे गटाराचे पाणी मुळा मुठा नदीमार्फत भीमा नदीपासून संपूर्ण जलाशयाला प्रदूषित करीत आहे.पुणे, पिंपरी चिंचवड महानगरपालिकांनी सर्व पाणी ट्रीटमेंट करून परत रिसायकल केले पाहिजे, परंतु पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका पाणी शुद्धीकरणापेक्षा नोटिफिकेशनला प्राथमिकता देत आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत कोणत्याही प्रकारचे सांडपाणी नदीत पात्रात सोडले नाही पाहिजे. या संदर्भात सोलापूर भागातील लोकांनी मोठ्या प्रमाणात लढा उभारणे गरजेचे आहे. दरम्यान, पेपर मिलच्या माध्यमातून खूप प्रदूषण होत आहे. बारामती ग्रो इंडस्ट्रीजने कंपनीकडून घाण पाणी सोडण्यात येत नसल्याचे स्पष्ट केले आहे, असे ते म्हणाले.

दरम्यान, जागतिक जलतज्ञ, जलपुरूष डॉ. राजेंद्रसिंह यांनी सोलापुरातील श्री सिद्धेश्वर मंदिर तलावाचीही पाहणी केली. या संदर्भात बोलताना ते म्हणाले. या तलावात घाण पाणी कुठून येते ? मासे का मरतात? याचा शोध घेतला पाहिजे. तलावात कोण घाण करते? हे पाहायला हवे. मंदिर समिती आणि महापालिकेने आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे. तलावातील पाण्यातील ऑक्सिडेशन कमी होत आहे. ते वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यासाठी नैनिताल मध्ये जाऊन मंदिर समितीने अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. या पत्रकार परिषदेस जल बिरादरी महाराष्ट्र राज्य अध्यक्ष नरेंद्र चुघ, सत्यनारायण बोलीसेटी, अंकुश नारायणकर, रिठा रॉडरिक्स, सुनिल रहाणे, रमाकांत कुलकर्णी आदी उपस्थित होते.

### नद्या स्वच्छतेच्या नावावर घोटाळे होत आहेत

देशात नद्या स्वच्छता करण्याच्या नावावर घोटाळे होत आहेत. नदीचे प्रदूषण रोखणे आवश्यक असताना केवळ सुशोभीकरणावर भर दिला जात आहे. त्याचाच भाग म्हणून घाट वगैरे बांधले जात आहेत. त्यासाठी कोट्यावधीचा खर्च केला जात आहे. यामुळे नदीपात्र कमी होत आहे. ते चुकीचे आहे. यामुळे नद्यांची अवस्था बिकट झाली आहे. स्वच्छतेच्या नावावर सरकार नदीचे आरोग्य बिघडवत असल्याचा आरोप यावेळी डॉ. राजेंद्रसिंह यांनी केला आहे.

### आंतरराष्ट्रीय नदीपाणी कराराचे ३० वर्षांनी नूतनीकरण आवश्यक

भारताने पाकिस्तानचे पाणी रोखले आहे या संदर्भात विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरात ते म्हणाले, या पाणी कराराला ६० वर्षे झाली आहेत. वास्तविक पाहता दर ३० वर्षांनी अशा करारांचे नूतनीकरण होणे आवश्यक आहे. ते झाले नाही. साठ वर्षात भारताने वॉटर बँक बनवली पाहिजे होती, असे जलपुरूष डॉ. राजेंद्रसिंह यांनी स्पष्ट केले.

## महत्वाचे...

### मुलगी झाल्याच्या कारणावरून विवाहितेचा छळ

**सोलापूर, दि. १७ मे -**

मुलगी झाल्याच्या कारणावरून विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह तिघांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मधुमती प्रसेनजीत घोलप (वय २९, रा. भारतरत्न इंदिरा नगर, गेंट्याल टॉकीजजवळ, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती प्रसेनजित, सासू उमा, नणंद मृणाली (सर्व रा. भादोले, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १० ऑगस्अ २०१७ ते २२ एप्रिल २०२५ या कालावधीत मधुमती या सासरी नांदण्यास होत्या. या कालावधीत मधुमती यांनी माहेरून १० लाख रुपये आणावेत तसेच तुला मुलगी कशी झाली या कारणावरून पती व त्याच्या घरातील लोकांनी मधुमती हिचा शारीरीक व मानसिक छळ करून मारहाण केली. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार ईनामदार पुढील तपास करीत आहेत.



### तरूणास विनाकारण मारहाण करणाऱ्यांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १७ मे -**

विनाकारण तरूणास मारहाण करणाऱ्यां ६ जणांवर जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत तन्वीर ईलाही शेख (वय ३३, रा. कुमारस्वामी सोसायटी, मित्र नगर, शेळगी, सोलापूर) याने दिलेल्या फिर्यादीवरुन अनोळखी ५ ते ६ जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १६ मे रोजी दुपारी भवानी पेठ येथील चाटला चौक येथे तन्वीर शेख हे लोकांची गर्दी पाहून नवदुर्गा माता मंदीर येथे त्यांच्या ओळखीच्या योगीराज हुबळीमठ यांना कसली गर्दी जमा झाली आहे असे विचारून दुकानाकडे जात होते. त्यावेळी अनोळखी ५ ते ६ जणांनी तन्वीर यास विनाकारण शिवीगाळ करून डोक्यात मारून जखमी केले. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक बामणे पुढील तपास करीत आहेत.

### वकिलाकडे गेलेला एकजण बेपत्ता

**सोलापूर, दि. १७ मे -**

पत्नीला वकिलाकडे जाऊन येतो म्हणून घरातून बाहेर पडलेला एकजण बेपत्ता झाला आहे. शुक्रवारी (ता. १६) दुपारी दोन ते तीन या कालावधीत ही घटना घडली. याची एमआयडीसी पोलिस ठाण्यात नोंद झाली आहे. नरेश लक्ष्मीनारायण चिलका (वय ४१, रा. एमआयडीसी, अक्कलकोट रोड, सोलापूर) असे त्यांचे नाव आहे. याप्रकरणी त्यांची पत्नी रुपाली नरेश चिलका (वय ४०) यांनी फिर्याद दिली आहे. पत्नीची विमा कंपनीची परीक्षा होती. त्यानंतर त्यांनी दुचाकीवरुन त्यांना घरी सोडले. त्यानंतर वकिलाकडे जाऊन येतो, असे सांगून ते दुचाकीवर (क्र. एम एच १३ ९००३) निघून गेले. त्यानंतर त्यांचा फोन बंद आहे. ते घरी परतले नाहीत. त्यांची दुचाकीही सापडली नाही.

### कारच्या धडकेने एकाचा मृत्यू; गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १७ मे -**

कारने धडक दिल्याने घडलेल्या अपघातात पादचाऱ्याचा मृत्यू झाला. शनिवारी (ता. १७) सकाळी पावणेदहाच्या सुमारास सोलापूर - पुणे महामार्गावर शिवाजी नगरनजीक हा अपघात घडला. धानप्पा देवराया सराटे (वय ७७, रा. आजादी गल्ली, अक्कलकोट) असे मृताचे नाव आहे. याप्रकरणी एम एच १३ ई के २०४७ या क्रमांकाच्या कारच्या चालकाविरुद्ध फौजदार चावडी पोलिसांत गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी मृताचा मुलगा दऱ्याप्पा धानप्पा सराटे (वय ५६, रा. गुलमोहर सोसायटी, बाळे, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. त्यांचे वडील धानप्पा हे बाळेकडे जाण्यासाठी रस्ता ओलांडताना कारने धडक दिल्याने हा अपघात घडला. त्यात ते गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र, त्यांचा मृत्यू झाला होता.



### सिद्धेश्वर तलावातील पाण्याचे व्हेरिफिकेशन, फर्टिलायझेशन करा

**सोलापूर :** सिद्धेश्वर तलावात आंतरराष्ट्रीय जलतज्ञ डॉक्टर राजेंद्र सिंह यांनी कासव आणि मासे मृत्यूमुखी पडल्याप्रकरणी पाहणी केली. कासव, मासे मृत्युमुखी पडत असतील तर तलावाचे पाणी धोकादायक असल्याचे त्यांनी सांगितले. तलावाच्या आजूबाजूच्या परिसरातील त्यांनी माहिती घेतली. यावेळी त्यांनी सोलापूर महानगरपालिकेचे उपायुक्त कारंजे व सिद्धेश्वर देवस्थानचे धर्मराज काडादी यांच्याशी संवाद साधला. पुन्हा अशा घटना घडू नये यासाठी त्यांनी पर्याय सुचवले. वॉटर व्हेरिफिकेशन, वॉटर फर्टिलायझेशन केल्यास याचे प्रमाण कमी होणार असल्याचे त्यांनी सांगितले. **(छायाचित्र : केवल तिवारी)**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी

## निवड, वरिष्ठ वेतनश्रेणी व पहिलीच्या शिक्षकांसाठी २ ते १५ जूनपर्यत प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मे-**

शिक्षक म्हणून नोकरीला लागून १२ व २४ वर्षे पूर्ण झालेल्या शिक्षकांचे आता २ ते ११ जूनपर्यंत वरिष्ठ व निवडश्रेणीचे प्रशिक्षण होणार आहे. तर पहिलीच्या शिक्षकांना बदलेल्या अभ्यासक्रमांबद्दल २ ते १५ जूनपर्यंत प्रशिक्षण दिले जाणार आहे.

राज्यात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करताना खासगी व शासकीय अनुदानित शाळांमधील इयत्ता पहिलीच्या वर्गाचा अभ्यासक्रम बदलणार आहे. त्या अनुषंगाने त्या वर्गावरील शिक्षकांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. तीन दिवस हे प्रशिक्षण असणार आहे.

राज्य, जिल्हा व तालुकास्तरावर हे प्रशिक्षण होणार आहे. या प्रशिक्षणासाठी एकूण सात विषय असुन त्यात अभ्यासक्रमाचा कृती आराखडा, मूल्यमापन व एचपीसी पार्श्वभूमीवर व नमुना, भाषा शिक्षण, गणित शिक्षण, कला, आरोग्य आणि शारीरिक शिक्षण व कार्यशिक्षण असे विषय आहेत. मराठी, इंग्रजी व उर्दू माध्यमांच्या शाळांमधील इयत्ता पहिलीच्या वर्गाला



शिकवणाऱ्या शिक्षकांचे प्रशिक्षण स्वतंत्र होणार आहे. जिल्हास्तरीय प्रशिक्षण २८ ते ३० मेपर्यंत होईल.

२ ते १५ जूनपर्यंत जिल्हास्तरावर उर्दू व इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधील शिक्षकांचे तर मराठी माध्यमाच्या शाळांमधील शिक्षकांचे २ ते १५ जूनपर्यंत प्रशिक्षण चालणार आहे. जे शिक्षक निवड व वरिष्ठ वेतनश्रेणीस पात्र आहेत, त्यांचे प्रशिक्षण सुरू असताना इयत्ता पहिलीच्या बदललेल्या अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण घेता येणार नाही. त्यामुळे अशा शिक्षकांना पहिलीच्या अभ्यासक्रम बदलाचे प्रशिक्षण १३ ते १५ जून या तीन दिवसांत दिले जाणार आहे. प्रशिक्षण पूर्ण होताच नवे शैक्षणिक वर्ष १६ जूनपासून सुरू होणार आहे.

# स्टँडवरून अपहरण झालेली बालिका पालकांकडे सुखरूप

- 'त्या' चिमुकलीसाठी धावला खाकी वर्दीतील 'बाप' माणूस
- फौजदार चावडी पोलिसांच्या संवेदनशील आणि तत्परतेने केलेल्या तपासामुळेच ईश्वरी पित्याच्या कुशीत



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ मे-**

शुक्रवारी सकाळी साडेआकराच्या वेळ... सोलापूर एस टी स्टॅन्डमधून एका तीन वर्षीय बालिकेचे अपहरण...आई-वडीलांची फौजदार चावडी पोलिसांकडे धाव...पोलिसांनी सीसीटीव्ही चित्रीकरण तपासून सोशल मिडीयावर बालिकेच्या फोटोसह संदेश व्हायरल केला...पोलिसांचा तपास व बालिकेच्या शोधासाठी पथके रवाना...अन् काही तासातच मुलगी मोंर्डनिंब बस स्थानकाजवळ असल्याची माहिती मिळाली...आई-वडील व पोलिसांनी मोंडनिंब गाठून बालिकेला घेतले ताब्यात. अशाप्रकारे शुक्रवारी सोलापूरातील बस स्थानकातून अपहरण झालेल्या बालिकेचा शोध लागला.

त्याचे झाले असे की, लक्ष्मण साहेब शिंदे (वय ३४, रा. रानमसले, ता. उत्तर सोलापूर, सध्या रा. शिवशक्ती हॉटेलच्या पाठीमागे, विजयकुमार दिघे यांच्या घरात भाड्याने, सोलापूर) हे त्यांची पत्नी व मुलगी ईश्वरी (वय ३) या दोघींना बार्शी येथे सोडण्यासाठी शुक्रवारी सकाळी साडेआकराच्या सुमारास सोलापूर एस टी स्टॅन्ड येथे आले होते. लक्ष्मण शिंदे हे विना थांबा एस टी बसचे तिकिट काढण्यासाठी रांगेत थांबले होते तर ईश्वरी ही तिच्या आईबरोबर रांगेपासून काही अंतरावर थांबली होती. त्यावेळी लक्ष्मण यांनी सुट्टे पैसे मागण्यासाठी त्यांच्या पत्नीला बोलावून घेतले. त्यावेळी त्यांच्या पत्नीने मुलगी ईश्वरी हिस ती जिथे थांबली आहे, तेथेच सोडून शिंदे यांना सुट्टे पैसे देण्यासाठी गेल्या व लगेच परत ईश्वरी थांबलेल्या ठिकाणी आल्या. त्यावेळी त्यांना मुलगी ईश्वरी दिसून आली नाही. त्यामुळे शिंदे दाम्पंत्याने मुलीचा सर्वत्र शोध घेतला, परंतु मुलगी काही मिळून आली नाही.

त्यामुळे त्यांनी तात्काळ फौजदार चावडी पोलिस ठाणे गाठले व पोलिसांना घडलेल्या घटनेबाबत सांगितले. त्यावेळी पोलिस निरीक्षक अरविंद माने यांनी पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांसह एस टी स्टॅन्ड गाठून सीसीटीव्ही चित्रीकरणाची तपासणी केली. त्यावेळी एक महिला ही ईश्वरीला घेऊन जात असल्याचे दिसून आले. त्यामुळे पोलिसांनी तात्काळ ईश्वरीचा फोटो व तिची माहिती सोशल मिडीयावर व्हायरल करून तिची माहिती सांगण्याचे आवाहन केले. आणि पोलिस ठाण्यांची काही पथके हे रवाना केली. सोशल मीडियावर एक चिमुकली सोलापुरातील बस स्टॅन्ड वरून हरवल्याचा मेसेज सर्वत्र वाऱ्यासारखा पसरला. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे त्या महिलेचा आणि मुलीचा शोध घेण्यास सुरुवात केली. पोलिसांचे एक पथक मोहोळ येथील बस स्थानकावर पोहोचले.

येथील फुटेज तपासल्यानंतर पोलिसांना असे लक्षात आले की ईश्वरीला घेऊन जाणारी महिला ही पुणे रोडवर लहान मुलीला घेऊन गेली आहे. त्यानंतर पोलिस पथक हे मोडनिंब येथे पोहोचल्यानंतर येथील एका मंगल कार्यालयासमोर या चिमुकलीला सोडून ती महिला पळून गेली. तिच्या मागावर असलेल्या पोलिसांनी या प्रकरणाचा माग काढत तात्काळ मोडनिंब येथे धाव घेऊन मुलीला ताब्यात घेतले आणि पोलिस ठाण्यात आणले. शुक्रवारी रात्री फौजदार चावडी येथे लक्ष्मण शिंदे यांच्याकडे ईश्वरीला सुपूर्द करण्यात आले. यावेळी शिंदे यांचे डोळे पाणावलेले होते. संपूर्ण जिल्ह्यातून सोलापुरातील फौजदार चावडी येथील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे कौतुक केले जात आहे. संवेदनशील आणि तत्परतेने केलेल्या तपासामुळेच पित्याच्या कुशीत लेक विसावल्याची चर्चा नागरीकांमधून होत आहे.

दरम्यान, याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात अज्ञात महिलेविरुध्द अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास सहायक पोलिस निरीक्षक खंडागळे करीत आहेत. सदरची कामगिरी सोलापूरचे पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने, दुय्यम पोलीस निरीक्षक तानाजी दराडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक शंकर धायगुडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक रोहन खंडागळे, पोलीस शिपाई सुधाकर माने, अजय चव्हाण, अमोल खरटमल, सुरज सोनवलकर, सिध्देश्वर बाबर, विक्रम दराडे यांनी केली.

### राजीव गांधी नगरात एकाची आत्महत्या

**सोलापूर, दि. १७ मे -**

अज्ञात कारणावरुन एकाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. शनिवारी (ता. १७) सकाळी १०.२५ च्या सुमारास ही घटना उघडकीस आली. संतोष बसप्पा वाघे (वय ४६, रा. राजीव गांधी नगर, सोलापूर) असे त्याचे नाव आहे. संतोष याने राहत्या घरी वाशाला ओढणीने गळफास घेतला. कुटुंबियांनी फास सोडवून त्यांना उतरवले. ते बेशुद्ध पडले होते. जोडभावी पेठ पोलिसांनी त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र, त्यांचा मृत्यू झाला होता.

### अल्पवयीन मुलीला पळवून नेले

**सोलापूर, दि. १७ मे -**

अल्पवयीन मुलीला (वय १६ वर्षे) फुस लावून पळवून नेल्याप्रकरणी अनोळखी व्यक्तीविरुद्ध सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. मुलीच्या आईने फिर्याद दिली आहे. ती १३ मे रोजी दुपारी १.२० च्या सुमारास नैसर्गिक विधीसाठी सार्वजनिक शौचालयाकडे गेली होती. त्यानंतर ती परत न आल्याने कुटुंबियांनी राहत्या परिसरासह नातेवाईकांकडे शोध घेतला. मात्र, ती सापडली नाही.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १११९

**हे अभिमानमदें भुलले । जरी पां संग्रामा आले ।**
**तऱ्ही आम्ही हित आपुलें । जाणावें लागे ।।**

आपला एखादयाशी वाद-विवाद झाला, भांडणतंटा झाला तर आपण ईतरांना उत्तर देतांना आपली बाजू सावरत सांगतो की, माझी ईच्छा त्यांच्याशी वाद-विवाद किंवा भांडणतंटा करण्याची नव्हती. तेच आमच्यावर धावून आले किंवा त्यांनीच भांडायला सुरुवात केली म्हणून आम्ही उत्तरादाखल भांडण केले. आपण सुरुवात करो की समोरचा सुरुवात करो, वाद हे वादच असतात. तसेच भांडण, वैर हे भांडण, वैरच असते. भांडण, तंटे, वाद, वैर यांतून कोणालाही सुख मिळत नसते. याची जाणीव अर्जुनाला असल्याने तो श्रीकृष्णाला म्हणाला, कौरव अभिमानाच्या मदाने उन्मत होऊन युध्दाला सज्ज झाले आहेत. त्यांना वाटते की आम्ही त्यांच्या सोबत युध्द करावे. त्यांनी जरी युध्दासाठी पुढाकार घेतला असला तरी आपण युध्द करण्याचे कारण नाही. त्यांना त्यांचे हित कळो की न कळो आपण मात्र आपले हित विचारात घेऊन युध्द न केलेलेच बरे. अर्जुनाच्या, हे अभिमानमदें भुलले । जरी पां संग्रामा आले ।तऱ्ही आम्ही हित आपुलें । जाणावें लागे ।।, या वाक्यातून आपण बरेच काही घेऊ शकतो. समोरच्या माणसाने भांडण-तंटयासाठी पुढाकार घेतला तरी परिस्थितीनुरुप आपण माघार घेणे योग्य असते. माघार घेणे म्हणजे हार नसते. जास्तीत जास्त शांती प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणे योग्य असते. शब्दाने शब्द वाढत जातो, वादाने वाद वाढत जातो. माघार घेतली किंवा समोरच्याला तुम्हीच मोठे आहात म्हटले तर बऱ्याचवेळा दोघांच्याही फायद्याचे होत असते.



समोरच्याला जरी आपले हित समजत नसले तरी आपण आपले हित जपलेच पाहिजे. म्हणूनच जगद्गुरु तुकाराम महाराजांनी म्हटले आहे की, आपुलिया हिता जो होय जागता । धन्य माता पिता तयाचिया ।। आपले हित आपणाला समजलेच पाहिजे. ईर्षा, द्वेष, वाद, मत्सर हे सुख देणारे नाहीत याची जाणीव आपणाला झाली पाहिजे. समोरचा वादाला तोंड फोडतो आहे म्हणून आपण वाद केलाच पाहिजे असे नाही. विष आहे हे समजल्यावर विषाची परिक्षा घ्यायचीच कशाला? जंगलातील रस्त्याने जात असतांना समोरुन अचानक वाघ, सिंह आला तर त्याच्याशी दोन हात करण्यासाठी पुढाकार घेण्यापेक्षा आपणच वाट चुकविणे किंवा त्याला चुकवून बाजूला जाणे योग्य असते. अर्जुन मोहग्रस्त होऊन जरी असे काही बोलत असला तरीही अर्जुनाचे माऊलींनी मांडलेले विचार आपणाला लागू पडणारे आहेत. आपण समोरच्याशी वादच करायचे नाही असे ठरविले तर समोरचा वाद करण्यासाठी प्रयत्न करुन कुठे तरी थांबेलच. कदाचित आपली वृत्ती पाहून तोही केंव्हातरी माघार घेऊन वादापासून परावृत्त होईल. माऊलींच्या या ओव्या मानवी जीवनाचा आधारस्तंभ आहेत असे म्हटले तर चुकीचे होणार नाही. आपल्या जीवनात निर्माण होणारे नको ते प्रसंग टाळण्यासाठीच माऊलींनी अशा ओव्या निर्माण केल्या आहेत. अर्थात, माऊलींच्या दूरदृष्टीचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| **वार : रविवार** | **दिनविशेष - शुभ दिवस** |
| **दि. १८ मे २०२५** | **श्री रामसिध्द महाराज** |
| **विक्रम संवत् २०८१** | **यात्रा** |
| **शके - १९४७** | **....राहू काल....** |
| **संवत्सर - विश्वावसू** | **रविवार : दु.४.३० ते ६.००** |
| **मास - वैशाख** | **सोमवार : स. ७.३० ते ९.००** |
| **कृ. षष्ठी (अहोरात्र)** | **मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०** |
| **ऋतु - वसंत** | **बुधवार : दु. १२ ते १.३०** |
| **नक्षत्र - उत्तरषाढा (१८.५१)** | **गुरुवार : दु. १.३० ते ३.००** |
| **योग - शुभ (०६.४१)** | **शुक्रवार : स.१०.३० ते १२** |
| **करण - गर (१८.०८)** | **शनिवार : स. ९ ते १०.३०** |

### राशीभविष्य

**मेष :** बिकट परिस्थितीतही आपण सावरू शकतो. समाजाकडून मान : सन्मान मिळेल, प्रतिष्ठा वाढेल, धन : संपत्ती मार्ग सुचतील.

**वृषभ :** विचारविनियम करण्यास वेळ मिळेल. कार्य, धंद्याात गती चांगली राहील. कामे झाल्यामुळे प्रसन्नता वाटेल. विनाकारण दुसऱ्या भानगडीत पडण्यापासून मुक्त रहा.

**मिथुन :** काही विशिष्ट कामात व स्थिती आपल्या बदल घडवून येईल. आर्थिक लाभ होण्याची शक्यता.

**कर्क :** स्पर्धा करण्यासाठी आपली अनुकलता नसणार. सामाजिक कार्य चांगले राहील. कौटुंबिक चिंता करण्याची काळजी नाही.

**सिंह :** लाभ व मान-सन्मान आपल्या भाग्यात उपयोगी पडेल. भावांकडून लाभ होण्याची शक्यता, समन्वय असणे आवश्यक आहे. खाण्यापिण्यावर लक्ष द्या.

**कन्या :** चांगली बातमी आपल्याला उत्साही बनवेल. कामात येणारे अडथळे दूर होण्याची शक्यता. कर्जापासून अंतराने राहावे. केलेल्या कामावर खुशी राहील.

**तुळ :** मोठी हानी होण्याची शक्यता. शारिरीक स्वास्थ्यावर लक्ष दया. सांभाळून व गोड बोला. हलगर्जीपणा व स्वार्थीपणा परिणामकारक आहे.

**वृश्चिक :** राजकीय क्षेत्रात बदल होण्याची शक्यता. त्याचा फायदा घेण्याचा प्रयत्न करा. जीवनात स्थिती सामान्य राहील किंचित वाढेल. दुसऱ्याची प्रशंशा करू नका.

**धनु :** आळस करू नका, नवीन ओळखीचा फायदा होईल. उद्योग:धंद्यात आपला विजय निश्चित मानला जातो. आर्थिक व्यवहार काटेकोरपणे करावा.

**मकर :**जवळच्याकडून सावधानता बाळगून कामे करा. प्रगतीच्या होईल.धनलाभ संभवतो. उद्योगधंदा चांगला होईल. जिवनात दुसऱ्याला सुख दिल्याने आनंदी व्हाल.

**कुंभ :** आपल्या कामात भरभराट होईल. अर्धांगीणीबरोबर भावनात्मक समस्या निर्माण होतील. प्रवास योग असल्याने सुखाचा होईल.

**मीन:** दिवस मागे केलेल्या कामांमुळे चांगला, प्रगतीकारक बनवेल. जमीन वाहन, मशीन आदी ठिकाणी लाभ शक्यता. जमिनीचे वाद मिटतील.

# बनावट लिंक पाठवून व्यापाऱ्याची ७२ लाखांची फसवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मे-**

शहरातील गुरुनानक चौकात राहणाऱ्या व्यापाऱ्याच्या मोबाईलवर लिंकद्वारे ॲप्लीकेशन पाठवून त्याद्वारे ७२ लाख ६४ हजार रुपयांची फसवणुक करणाऱ्या महिलेविरुध्द सोलापूर शहर सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत दिनेश प्रकाश आहुजा (वय ४२, रा. अर्जुन निवास, पहिला मजला, गुरुनानक नगर, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन अनोळखी महिला ओळख लवपून आरोही अडवानी हिच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिनेश आहुजा हे १२ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी घरी होते. त्यावेळी आरोही अडवानी या महिलेने तिची ओळख लपवून आहुजा यांच्या मोबाईल क्रमांकावर तसेच फेसबुक प्रोफाईल वर http://m.bitop-vip2.com ही लिंक पाठविली. आहुजा यांनी या लिंकद्वारे ॲप्लीकेशन डाऊनलोड केले. त्यानंतर ॲप्लीकेशन वापरणाऱ्याने आहुजा यांच्या वापरत्या बँक खात्यामध्ये १ डिसेंबर २०२४ रोजी रेफरंन्स नं. NARRATION द्वारे प्राप्त झालेले ९८०० रुपये अदा केले.

त्यानंतर आहुजा यांनी त्या महिलेच्या सांगण्यावरून ज्या बँक खात्यात रक्कम अदा केली ते सादर केलेले ऋणको खातेधारक यांनी आहुजा यांस त्यांना मिळालेली रक्कम ही शेअर मार्केटद्वारे आर्थिक फायदा असल्याचे भासवले. त्यानंतर त्या महिलेने प्रथमतः काही प्रमाणात नफा देऊन आहुजा यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर आर्थिक फायदा हा फक्त पोर्टल तसेच ॲप्लीकेशन येथे असल्याचे भासविले. ज्यावेळी आहुजा यांनी त्यांची रक्कम काढण्याचा प्रयत्न केला तेंव्हा या ना त्या कारणावरून रक्कम देण्याचे टाळले. आहुजा यांची ७२ लाख ६४ हजार रुपये किंमतीची ऑनलाईन फसवणुक केली.

तसेच डेटा चोरी, वॉटसॲप हॅकींग, बँकींग फसवणुक केली म्हणून सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक श्रीशैल गजा पुढील तपास करीत आहेत.

# गोशाळा अनुदान अर्जासाठी मुदतवाढ

**१५ जूनपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मे-**

गोशाळेला अनुदान मिळविण्यासाठी अर्ज करण्यास शासनाने एका महिन्याची मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे गोशाळा चालकांनी ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा पशूसंवर्धन उनायुक्त डॉ. विशाल येवले यांनी केले आहे. गोशाळांमध्ये असणाऱ्या देशी गायींच्या पालन पोषणासाठी प्रतीदिन , प्रती गायीस ५० रूपयांचे अनुदान शासनाकडून दिला जातो . त्यासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे नोंदणीकृत शासन निर्णयामधील नमूद निकषानुसार पात्र गोशाळा , गोसदन आणि गोरक्षण संस्थांनी १५ जूनपर्यंत ऑनलाइन अर्ज करावा पशूसंवर्धन विभागाच्या आठ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयातील नमूद पात्रतेच्या अटीनुसार पात्र गोशाळा चालकांनी १५ जूनपर्यंत ऑनलाइन अर्ज करावा.

> जिल्ह्यातील अधिकाधिक गोशाळा , गोरक्षण संस्थांना देशी गायी पालनपोषण अनुदान योजनेचा लाभ मिळण्यासाठी अर्ज करण्यास एका महिन्याची मुदतवाढ देण्यात आली आहे. पात्र गोशाळा चालकांनी अनुदानासाठी १५ जुनपर्यंत करावे.
>
> **- डॉ. विशाल येवले,**
> उपायुक्त, जिल्हा पशूसंवर्धन विभाग.

## श्रीमती नरसम्मा बसप्पा बंडा प्रशालेचा दहावीचा निकाल ९६ टक्के

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मे -**

श्री कुरूहिनशेटटी ज्ञाती संस्था संचलित श्रीमतीआं नरसम्मा बसप्पा बंडा प्रशालेचा दहावीचा निकाल ९६.२४ टक्के लागला आहे. १३३ विध्यार्थ्यांपैकी १२८ विध्यार्थी उत्तीर्ण झाले.

प्रशालेतून प्रथम क्रमांक देविका कोलार ९२.२० टकके, द्वितीय क्रमांक लक्ष्मी आलदी ९०.६० टक्के, तृतीय क्रमांक रूचिरा कराळे ८७.४० टक्के यांचा सत्कार शालेय समितीचे अध्यक्ष प्रभाकर गोरंटी, श्रिनिवास गडगी, राजू काकी व मुख्याध्यापक एम.डी. बिराजदार यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सरस्वती तिमप्पा मराठी शाळेचे मुख्याध्यापक बड्डूरे, के.बी. बंडा इंग्लिश मिडीयम स्कूलच्या मुख्याध्यापिका शेख, सरस्वती तिमप्पा बालक मंदिर शाळेच्या मुख्याध्यापिका तट्टे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेत्तर उपस्थित होते. यावेळी यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार शाळेच्या वतीने करण्यात आला. यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आदींनी केले.

## भारताच्या संयमाचे पाऊल, उद्याच्या यशस्वितेची चाहूल : टोळ्ये

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मे-**




भारताच्या संयमाचे एक पाऊल, उद्याच्या यशस्वितेची चाहूल ठरणार असल्याचे मत येथील रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थच्या वतीने आयोजित केलेल्या व्याख्यानामध्ये जेष्ठ पत्रकार राकेश टोळ्ये यांनी सांगितले.

सध्या आतंकवादी करत असलेल्या कारवाया आणि भारताने परिपूर्णतेने त्याला दिलेले चोख उत्तर आज जगासमोर ज्वलंत उदाहरण आहे. युद्धभूमीवरील यश आणि संयम यामुळे येणाऱ्या काळात भारत यशस्वितेकडे जाणार हे निश्चित असेही ते या प्रसंगी म्हणाले. त्याच बरोबर आपल्या पत्रकारितेच्या वाटचालीत आलेले अनुभव त्यांनी अतिशय खुमासदार पद्धतीने सांगून श्रोत्यांची मने जिंकली. प्रारंभी रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थ चे सचिव स्वप्नील कोंडगुळे यांनी प्रमुख पाहुणे आणि उपस्थितांचे स्वागत केले आणि प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. रोटरी नॉर्थ च्या अध्यक्षा डॉ जानवी माखिजा यांनी प्रमुख पाहुण्यांचा पुष्प गुच्छ देऊन सत्कार केला सुनील दावडा यांनी पत्रकार टोळ्ये यांचा स्मृतीचिन्ह देऊन सन्मान करून सर्व उपस्थितांचे आभार मानले.

या कार्यक्रमास अविनाश महागावकर, सुनील दावडा, राजगोपाल झंवर, प्रशांत अपराध, हिरालाल डागा, संपत बलदवा, धनश्री केळकर, दौलत सीताफळे, बळीराम पावडे, संजय चौगुले, डॉ. दिलीप बुरटे, डॉ. निहार बुरटे, संतोष सपकाळ, युगंधर जिंदे, मुकेश मेहता, सीताराम महांकाळ, दीपक आर्वे, डॉ. सुनील वैद्य , आसावरी सराफ, वंदना कोपकर, आरती गांधी, क्षितिजा गाताडे,आरती गांधी, कीर्ती दावडा, डॉ. मधुरा बुरटे आदी उपस्थित होते.

# मातंग समाजाचा २० मे रोजी जन आक्रोश मोर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मे-**

अनुसूचित जातीच्या आरक्षण उपवर्गीकरणाच्या मागणीकडे लक्ष वेधण्यासाठी सकल मातंग समाज महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने मंगळवार दि. २० मे रोजी मुंबई येथील आजाद मैदानावर जन आक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे, अशी माहिती माजी मंत्री उत्तमप्रकाश खंदारे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सर्वोच्च न्यायालयाने दि. १ ऑगस्ट २०२४ रोजी देशातील अनुसूचित जाती आणि जमातींच्या आरक्षणाबाबत ऐतिहासिक निर्णय दिला आहे. अनुसूचित जाती जमातींच्या आरक्षणाच्या अंतर्गत राज्य सरकारला उपवर्गीकरण करता येऊ शकते असं न्यायालयाने या निर्णयात म्हटले आहे. गेल्या ७५ वर्षात महाराष्ट्रात मातंग आणि इतर तत्सम दलित जातींना आरक्षणाचा लाभ मिळाला नाही. आरक्षण वर्गीकरण संदर्भात महायुती सरकारने न्यायमूर्ती अनंत मनोहर बदर यांच्या अध्यक्षतेखाली न्यायिक आयोग १५ ऑक्टोबर २०२४ रोजी नेमला आहे. अद्याप या आयोगाने आपला अहवाल सादर केला नाही. अनुसूचित जातीच्या आरक्षणात अ, ब, क, ड किंवा अ, ब, क किंवा समितीच्या मताप्रमाणे निश्चित प्रारुप तयार करून अहवाल सादर करणे बंधनकारक आहे. न्यायिक समितीच्या शिफारशीची अंमलबजावणी करून वर्गीकरणाची प्रक्रिया त्वरित राबविण्यासाठी या आक्रोश मोर्चाचे आयोजन केले आहे. तेलंगणा राज्याने अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण करून दुर्बल घटकांना शिक्षण आणि नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे महाराष्ट्र शासनाला जागे करण्यासाठी मंगळवार दि. २० मे रोजी आझाद मैदानावर मोर्चाच्या माध्यमातून विविध मागण्यांकडे लक्ष वेधण्यात येणार आहे.

बदर समितीने दोन महिन्याचा अहवाल सादर करावा. आरक्षण उपवर्गीकरण होईपर्यंत जून मध्ये होणारी नोकर भरती सरकारने करू नये किंवा स्थगित करावे. अनुसूचित जातीतील ५९ जातींची आजची लोकसंख्या गृहीत धरून वर्गीकरण करावे. क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाच्या शिफारशींच्या अंमलबजावणी करावी. बजेटमध्ये तरतूद करावी आदी मागण्यासाठी आंदोलन करण्यात येणार आहे. या पत्रकार परिषदेस सुरेश पाटोळे, महादेव भोसले, रोहित खिलारे, टी. एस. क्षीरसागर, सुहास शिंदे, गोविंद कांबळे आदी उपस्थित होते.



## जिल्हा मराठी पत्रकार संघातर्फे दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मे-**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेतर्फे १७ मे रोजी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर स्मारक पत्रकार भवन सिंधुदुर्ग नगरी (ओरोस) तालुका कुडाळ जिल्हा सिंधुदुर्ग येथे येथे पुण्यतिथी निमित्त दर्पणकार बाळ शास्त्रींना अभिवादन सभा आणि राज्य कार्यकारिणीच्या बैठक झाली.

या कार्यक्रमाला परिषदेचे विश्वस्त, अध्यक्षांसह, उपाध्यक्ष, जिल्हापरिषद प्रतिनिधी विभागीय सचिव, अधिस्वीकृती सदस्य, राज्य प्रसिद्धप्रमुख आणि डिजिटल मिडियाचे पदाधिकारी यांची उपस्थित होती या सभेला पालकमंत्री नामदार नितेश राणे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

परिषदेचे विश्वस्त किरण नाईक व राज्यातील पत्रकार संघाचे पदाधिकारी यांच्या उपस्थिति अभिवादनाचा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमास सोलापूर जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष अशोक मठपती, सचिव प्रा.पी.पी.कुलकर्णी, सहसचिव अबुबकर नल्लामंदू, ज्येष्ठ प्रेस फोटोग्राफर नाग्रेश दंतकाळे, विश्वनाथ व्हनकोरे उपस्थित राहून मराठी वृतपत्राचे जनक बाळ शास्त्री जांभेकर यांना अभिवादन केले. यावेळी सिंधुदुर्ग जिल्हा मराठी पत्रकार संघचे अध्यक्ष उमेश तोस्कर यांनी राज्यतील सर्व पत्रकारांचे स्वागत केले.

# विद्यावाचस्पती अमोल गांगजी यांचे जीवनचरित्र

**ज्ञान प्रबोधिनीच्या ज्ञान सागरात एक हिरा सापडला. त्याला कै. आ. डॉ. आण्णा ताम्हणकर व कै. मा. डॉ. लताताई भिशीकर यांनी सुसंस्काराचे पैलू पाडले. तो अष्टपैलू चमकणारा हिरा प्रबोधिनीच्या सुवर्णकोंदणात फिट बसवला तो हिरा म्हणजे अमोल गांगजी. अमोलचे इ. पहिली ते चौथीपर्यंतचे शिक्षण नूतन मराठी विद्यालय येथे तर इ. पाचवी ते सातवीचे हरीभाई देवकरण प्रशाला येथे आणि इ. आठवी ते दहावीचे शिक्षण ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, सोलापूर येथे झाले. इ. ११ वी, १२ वी वाणिज्य शाखा हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स येथे व बी.कॉम. संगमेश्वर महाविद्यालय येथे सन १९९७ मध्ये व एम.कॉम. दयानंद महाविद्यालय येथे सन २००१ मध्ये पूर्ण केले. नंतर त्यांनी दयानंद शिक्षण शास्त्र महाविद्यालयात २००८ साली बी.एड व पु. अ. ह. सोलापूर विद्यापीठातून २०१४ साली एम.एड केले. पुढे २०१५ साली शिक्षणशास्त्रातून सेट व नेट केले. त्यांनी पी.एचडी. पु. अ. ह. सोलापूर विद्यापीठ विश्व विद्यालयातून डॉ. शिवकुमार गणापूर यांच्या मार्गदर्शनाखाली** Study Of Educational Culture in the Upanishads and its Relevance to present secondary Education **या विषयावर केले. अशा उच्च विद्याविभूषित अमोलचे वडील कापड व्यावसायिक, सध्या निवृत्त. अमोलची बहीण ज्ञान प्रबोधिनीमध्ये दूरभाषिका म्हणून कार्यरत आहे. अमोलची पत्नी, जन्म दि. २१/६/१९८२. ती बी. कॉम, एम.एड असून पु. अ. ह. सोलापूर विद्यापीठात** 'CONTRIBUTION OF SDHU VSWNI TOWRDS EDUCTION FIELD STUDY' **या विषयात पी.एचडी. डॉ. आयेशा रंगरेज यांच्या मार्गदर्शनाखाली करत आहेत.**

श्री. अमोलचे लग्न २०१२ साली झाले असून पत्नी सर्वबाबतीत त्याला पूरक आहे. त्यांना २३/७/२०१८ रोजी आषाढी एकादशीला झाला असून त्याचे नाव स्वानंद उर्फ 'माऊली' असे समर्पक ठेवले आहे. तो सध्या दुसरीमध्ये ज्ञान प्रबोधिनीमध्ये शिकत आहे. तो अमोल सारखाच चपळ व चलाख आणि अत्यंत उत्साही आहे. तो वडिलांचे नाव निश्वत उज्ज्वल करणार. अमोलने शाळेच्या आवारातच मल्लखांब बसविला आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच शरीरही तंदरुस्त राहावे म्हणून मुलांकडून विविध व्यायाम व मैदानी खेळ अमोल करून घेतात. सध्या अमोल ज्ञान प्रबोधिनी - सोलापूरचे सहकार्यवाह या जबाबदारीच्या पदावर कार्यरत आहेत. किशोरवयीन सुमारे १५० उपेक्षित विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी वर्षभर विविध उपक्रमांच्या योजना कार्यान्वित करत आहेत. मणिपूरसारख्या दूरच्या राज्यात एकात्मतेसाठीच्या उपक्रमांचे आयोजन, संयोजन व कार्यवाही करत आहे व झारखंड, काश्मीर यांसारख्या ठिकाणी विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिमत्त्व विकास शिबिरे घेतली आहेत. तसेच मणिपूरच्या वनवासी भागातील संधी न मिळणाऱ्या मुलांसाठी सहनिवास चालवून त्यांच्या चौफेर विकासासाठीच्या योजना करत आहेत.

सांगली, कोल्हापूर येथील पूरग्रस्तांसाठी तसेच करोना महामारीतील मदतकार्याचे बहुमोल नियोजन करून उचित कार्यवाही केली. बिडी कामगार महिलांना आरोग्यदायी व सन्मानजनक पर्यायी रोजगार प्रकल्प, त्यांचे प्राणायाम वर्गाद्वारे आरोग्याचे व संघटनेचे कार्य, तसेच तंबाखूमुक्ती अभियान बात मार्गदर्शन करतात. प्रबोधिनीच्या सत्संगामध्ये वर्षभर त्यांनी दर रविवारी उपनिषदावर प्रवचन केले. ते



ज्ञान प्रबोधिनी येथे १० वर्षे युवक सचिव तसेच बालकामगार प्रकल्प शाळेचे प्रमुख म्हणून कार्यरत होते. याचबरोबर युवकांसाठी व विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिमत्त्व व नेतृत्व विकासासाठी विविध उपक्रम योजतात. युवकांसाठी अभ्यास दौरे व साहस सहलीचे उत्तम आयोजन करतात व विद्यार्थ्यांसाठी नियमित प्रशिक्षणाची योजना यांनी केली आहे.

वीरव्रत सहल, दि. २२/४/२०२५ ते १/५/२०२५ या कालावधीत १० वीची परीक्षा दिलेले १४ जण, १२ वीची परीक्षा दिलेले ६ जण असे १९ युवक व अन्य ६ असे २६ जणांची सहल आयोजित केली. या सहलीत दिल्ली, अयोध्या, नैनिताल व आग्रा भेट संपन्न झाली. दि. २५, २६ व २७ एप्रिल या कालावधीत नैनितालच्या बारापत्थर येथे पर्वतारोहणाचे प्रशिक्षण आयोजित केले होते. पर्वतावरील खाचा शोधत केवळ हातांच्या बोटांद्वारे आणि पंजाच्या साहाय्याने शिळा चढून जाण्याचा व रॅपलिंगचा रोमांचकारी अनुभव युवकांनी घेतला. यात युवकांचे कौशल्य, ताकद व साहस पणाला लागले. शिळा चढताना खाली खोल दरी व वर जाताना निसटता आधार अशी कसरत करत पर्वतावर पोहोचणे हे प्रशिक्षण युवकांचे धाडस वाढवणारे होते. खडा चढ चढणे व गिरीभ्रमण करणे शारीरिक क्षमता वाढवणारे होते. अमोलने दि. २४ एप्रिल रोजी सर्वांना अयोध्या येथे प्रभू श्रीराम यांचे मंगलमय व चित्त प्रसन्न करणारे दर्शन घडविले, तसेच डॉ. अमोल गांगजी यांनी श्रीराम व श्रीहनुमंत यांच्या कथांमधून जीवनमूल्ये व बीरत्वाची प्रेरणा देणारी सत्रे सहलीमध्ये घेतली. या सहलीतील अत्यंत महत्त्वाचे दि. २३ एप्रिलला दिल्लीतील मोराच्या थीमवर असलेले भव्य लोकसभागृह, कमळाच्या थीमवर असलेले राज्यसभागृह व भारतीय संस्कृतीची ओळख करून देणारे दालन यांचे दर्शन सहलीत विद्यार्थ्यांना घडविले. हे अत्यंत अवघड काम अत्यंत बरिष्ठ व्यक्तींची ओळख काढून संपन्न केले. श्री. अमोलच्या प्रबोधिनीच्या सहकार्यवाहच्या कारकीर्दीत प्रबोधिनीमध्ये उपयुक्त व संततच्या कार्यामुळे प्रबोधिनीची उत्तरोत्तर भरभराट होईल व डॉ. गिरीशराव बापट यांच्या कार्यास हातभार लागून डॉ. गिरीशराबांना मोलाचे सहकार्य मिळेल याची खात्री आहे. डॉ. अमोल गांगजीच्या कार्यास माझ्या हार्दिक शुभेच्छा.

**- सु. स. देशमुख**
मो. ९८२२०४३९४९

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...




### लोकमंगल कृषी महाविद्यालयात जागतिक कृषी पर्यटन दिवस साजरा

**सोलापूर, दि. १७ मे-**

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित लोकमंगल कृषी महाविद्यालय वडाळा येथे राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत जागतिक कृषी पर्यटन दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शिंदे हे लाभले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. अजित कुरे यांनी प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांना जागतिक कृषी पर्यटन दिनाची संकल्पना, कृषी पदवीधरांचे कृषी पर्यटनातील योगदान, कृषी पूरक व्यवसाय अर्थार्जन, भविष्यातील कृषी पर्यटनातील संधी आणि कृषी पर्यटनासाठी असलेल्या शासकीय योजना इत्यादी विषयावर मार्गदर्शन केले. शेती आणि ग्रामीण आर्थिक विकासाला हातभार लावण्यासाठी कृषी पर्यटन हा एक चांगला पूरक व्यवसाय आहे, म्हणून कृषी पदवीधरांनी या सर्व बाबी विचारात घेऊन हे व्यावसायिक क्षेत्र भविष्यात नक्कीच विचाराधीन ठेवावे असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. अध्यक्षीय मनोगत डॉ. अमोल शिंदे यांनी केले. प्रा. अजित कुरे यांनी आभार मानले. कार्यक्रमास प्रा. अजिंक्य ढोरे आणि प्रथम वर्षातील विद्यार्थी विद्यार्थिनींची उल्लेखनीय उपस्थिती होती.



### न्यू इंग्लिश स्कूलचा निकाल १०० टक्के

**करकंब, दि. १७ मे-**

चेतना विकास मंडळ संचालित न्यू. इंग्लिश करकंब या प्रशालेने दरवर्षीप्रमाणे दहावीच्या अव्वल निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. सेमी इंग्लिशचा निकाल१०० टक्के लागला असून प्रशालेतील प्रणिती चव्हाण ९५ टक्के प्रथम, प्राची माने ९०.८० टक्के द्वितीय, पायल धायगुडे ८८.४० टक्के तृतीय क्रमांक असे गुण मिळवून या विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले.तर कादंबरी शेटे ८७.८० टक्के, सिद्धी कापसे ८६.२० टक्के, आयेशा पठाण ८३.८० टक्के, श्रावणी गायकवाड ८३.८० टक्के, पृथ्वी भिसे ८५.६० टक्के, आर्यन वेळापूरकर ८३ टक्के, साक्षी लोकरे ८२ टक्के, वैष्णवी खारे ८१.३० टक्के, छोटूककुंवर सवाईसिंग राजपुरोहित ८१.४० टक्के, श्रेया टेके ८०.४० टक्के, ऋतुराज माने ८०.४० टक्के या विद्यार्थ्यांनी ८० टक्क्यांवर गुण मिळवून यश प्राप्त केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष संजीवकुमार म्हेत्रे, सचिव अविनाश देवकते, स्कूल कमिटी अध्यक्ष प्रशांत वेळापूरकर, मुख्याध्यापिका संगीता करमाळकर, पर्यवेक्षिका लक्ष्मी शिंदे यांनी अभिनंदन केले.



### चिखलठाणच्या सुराणा विद्यालयात भरला माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**करमाळा दि.१७ मे**

चिखलठाण तालुका करमाळा येथील रामबाई बाबूलाल सुराणा विद्यालयातील विद्यार्थी ३२ वर्षांनी एकत्र येऊन जागवल्या आपल्या मैत्रीच्या आठवणी १९९३च्या दहावी बॅचच्या विद्यार्थ्यांनी स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने एकत्र येऊन भावनिक होत शाळेच्या आवारात साजरा केला आठवणीचा उत्सव. यावेळी शाळेच्या आवारात आठवण म्हणून सर्वांनी वृक्षारोपण केले. या कार्यक्रमाला तात्कालीन शिक्षक चंद्रकांत बारकुंड माळी, सुरवसे व विद्यमान मुख्याध्यापक दिलीप वायदंडे उपस्थित होते. प्रास्ताविक सलीम इनामदार यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन नियोजन सुनील ठोंबरे यांनी केले होते यावेळी बोलताना माजी विद्यार्थिनी मनीषा सरडे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन रामभाऊ भगत यांनी केले तर आभार सुनील ठोंबरे यांनी मानले.



### ओंकार साखर कारखान्याच्या ऊस तोडणी वाहतूक कराराचा शुभारंभ

**पिलीव, दि. १७ मे-**

माळशिरस तालुक्यातील चांदापुरी येथील ओंकार साखर कारखान्याचे संचालक प्रशांतराव बोत्रे-पाटील यांच्या हस्ते तोडणी वाहतुक कराराचा शुभारंभ करून वाहन मालक यांना कराराच्या प्रती सन्मान पूर्वक देण्यात आल्या. यावेळी बोलताना बोत्रे-पाटील म्हणाले की ओंकार साखर कारखाना परिवाराने ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हिता बरोबर वाहन मालकांचे हित जोपासून वेळेत वाहतुकीची तोडणीचे बीले दिली वाहतूकदारांना कारखान्याकडुन जे जे देणे शक्य ते देण्याचा प्रयत्न परिवार करेल, अशी ग्वाही यावेळी त्यांनी बोलताना दिली. तरी वाहन मालकांनी व मुकादम यांनी कारखान्यांच्या शेतकी ऑफीसशी संपर्क साधावा, असे आवाहन केन मॅनेजर शरद देवकर यांनी केले. यावेळी जनरल मॅनेजर भिम राव वाघमोडे, डिलसरी मॅनेजर पी.डी. पाटील, धन्यकुमार जामदाडे चीफ इंजीनियर तानाजी देवकते, मेजर मोहन घोडके, सावता शिंदे, धनाजीराव पवार, सर्जेराव कचरे, श्रीमंत कारंडे, भगवान सुळ, सर्जेराव पवार अभिजित माने देशमुख, आबासाहेब ठवरे प्रकाश मगर उपस्थित होते. रमेश आवताडे यांनी आभार मानले.

# निष्ठावंतालाच भाजपाच्या जिल्हाध्यक्षपदाची दुसऱ्यांदा संधी

**पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे प्रतिपादन**

**निवडीबद्दल सावंत यांचा सांगोल्यात सत्कार**



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१७ मे-**

सर्वसामान्य कार्यकर्त्यांची कदर करणारा, पक्षाने दिलेला अजेंडा लोकांपर्यंत पोहोचवणारा, निष्ठावान सच्चा कार्यकर्ता अशी ओळख असलेल्या चेतनसिंह केदार सावंत यांच्यावर दुसऱ्यांदा भाजपच्या जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली आहे असे प्रतिपादन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी व्यक्त केले.

भाजपच्या सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्हाध्यक्षपदी निवड झालेल्या चेतनसिंह केदार सावंत यांच्या येथील सत्कार सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा आमदार चित्राताई वाघ, आमदार देवेंद्र कोठे, माजी खासदार रणजीतसिंह निंबाळकर, माजी आमदार रामभाऊ सातपुते, माजी आमदार राजाभाऊ राऊत, ग्रामीण पूर्व जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, सुजाताताई केदार सावंत, दुर्योधन हिप्परकर, माऊली हळणवर, संभाजी आलदर, बाळासाहेब एरंडे, मारुती बनकर, सचिन देशमुख, बाळासाहेब काटकर, विजय येलपले, गुंडादादा खटकाळे, संतोष देवकते उपस्थित होते. विकासकामे हे भांडवल असल्याने रुसवे फुगवे बाजूला ठेवून काम करावे. पदासाठी निवडणूक न लढवता पक्षासाठी काम करावे असे मनोगत माजी खासदार निंबाळकर यांनी व्यक्त केले. आमदार चित्राताई वाघ यांनी पश्चिम जिल्ह्याचे पालकत्व घ्यावे असे आवाहन माजी आमदार सातपुते यांनी यावेळी केले. भाजप सभासद नोंदणी कार्यक्रमात जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी बार्शी तालुक्यात आठवड्यात दोनवेळा बैठका घेऊन ७० हजार सभासदांची नोंदणी केली. प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्याला भाजपने जिल्हाध्यक्ष पदाची पुन्हा एकदा संधी दिल्याचे माजी आमदार राऊत यांनी सांगितले.

पाकिस्तानने भारतावर हल्ला करून निरपराध लोकांचा जीव घेतला, देशातील भगिनींचे कुंकू पुसले. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मातृशक्तीला ऑपरेशन सिंदूर समर्पित केलं आणि या देशातील प्रत्येक महिलांचं मनोबल वाढवण्याचे काम केलं. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत कार्यकर्त्यांना संधी दिली जाणार असल्याने प्रत्येकाने पक्ष वाढीसाठी कामाला लागावे असे आवाहन आमदार वाघ यांनी केले.

कार्यकर्त्यांच्या पाठिंब्यावरच भाजप संघटन मजबूत करण्यावर भर दिला. अंत्योदय संकल्पना डोळ्यासमोर ठेवून काम केले. माजी खासदार निंबाळकर यांनी पाच वर्षांच्या काळात मतदारसंघाचा पाण्याचा प्रश्न सोडविला. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महानगरपालिका, जिल्हा परिषद आणि नगरपालिकांवर भाजपचा झेंडा फडकणार असल्याचे भाजपचे नूतन जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी सांगितल.

### प्रधानमंत्री आवास योजनेच्या सर्व्हेसाठी ३१ मे पर्यंत मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १७ मे-**

प्रधानमंत्री आवास ग्रामीण अंतर्गत घरकुलाच्या लाभासाठी ग्रामीण भागात बेघर,कच्च्या घरात वास्तव्य करणाऱ्या कुटुंबाचे आवास प्लस २०२५ सर्व्हेक्षण जिल्हयात सुरु आहे. या सर्व्हे साठी शासनाने पुन्हा ३१ मे पर्यत मुदतवाढ दिली आहे. जिल्हयातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये ग्रामपंचायत अधिकाऱ्या मार्फत आवास प्लस २०२४ सरव्हेक्षण या अप द्वारे सर्व्हे क्षण करणयात येत आहे. या सर्व्हे क्षणासाठी ३१ मे पर्यत मुदतवाढ देणयात आली आहे. जि कुटुंबे अदयापही सर्व्हेक्षणापासुन वंचीत आहेत त्यांनी सरव्हेक्षण करुन घेणयात यावे असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केली आहे.

# माळशिरस तालुक्यात येळीव येथे एमआयडीसी होणार

**माजी आमदार राम सातपुते यांच्या प्रयत्नांना यश**





**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. १७ मे-**

माळशिरस तालुक्यातील येळीव येथे शेती महामंडळ जागेवर एमआयडीसी मंजुरी बाबत नुकतेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वतीने एमआयडीसी स्थापन करणे संदर्भात जाहिरात प्रसिद्ध झाली आहे तालुक्यातील तरुणांच्या उज्वल भविष्यासाठी व विकासासाठी महाराष्ट्र राज्य औद्योगिक वसाहत मंजूर व्हावी म्हणून माजी आमदार राम सातपुते यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सातत्याने मागणी केली होती. त्यांच्या या मागणीस यश आले असून माळशिरस तालुक्यातील जनतेतून समाधान व्यक्त केले जात आहे

सातपुते यांनी सन २०२३ पासून तत्कालीन उपमुख्यमंत्री व सध्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे एम आयडीसीचा विषय लावून धरला होता नुकतेच त्यांनी फेब्रुवारी २०२५ मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या पत्रामध्ये माळशिरस मतदारसंघ प्रगतशील असून तालुक्यातील बहुसंख्य तरुण सुशिक्षित आहेत तरुणांच्या हाताला काम नाही त्यामुळे बेरोजगारीचे प्रमाण वाढले आहे माळशिरस मतदारसंघातून पाच राष्ट्रीय महामार्ग गेले असून शेती महामंडळाचे खंडकरी शेतकऱ्यांचे वाटप करून हजारो एकर क्षेत्र शिल्लक आहे यावर औद्योगिक वसाहत मंजूर व्हावे यासाठी पत्र दिले होते. या अनुषंगाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्याकडून प्रसिद्धीकरण करण्यात आले असून महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ मधील भूसंपादन विषयक तरतुदी प्रक्रिया द्वारे मौजे माळशिरस येथील २९.१८ हेक्टर तर मौजे येळीव ता माळशिरस येथील ३०.२९ हेक्टर क्षेत्र पास थ्रो पद्धतीने औद्योगिक क्षेत्र स्थापन करणे करिता जमीन घेण्यासाठी इच्छुक उद्योजकांकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत यामुळे गेल्या कित्येक वर्षापासून प्रलंबित असणारा माळशिरस तालुक्यातील एमआयडीसीचा प्रश्न सुटला आहे

सन २०२० पासून तालुक्यात अद्यावत एम आयडीसी व्हावी याकरिता प्रयत्न सुरू होते यानंतर तत्कालीन उपमुख्यमंत्री व सध्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार व उद्योग मंत्री उदय सामंत यांनी प्रकर्षाने माळशिरस तालुक्यातील एमआयडीसीच्या विषयासंदर्भात विशेष बैठक आयोजित करून एमआयडीसीचा तालुक्यातील विषय मार्गी लावला यामुळे तालुक्यातील तरुणांच्या हाताला रोजगार उपलब्ध होणार आहे माळशिरस तालुक्यातील जनतेला दिलेला शब्द पूर्णत्वास येत असल्याने मनस्वी आनंद होत आहे

**- राम सातपुते, माजी आमदार**

# अरण तीर्थक्षेत्राला ‘अ’ वर्ग दर्जा मिळाला

**सावता परिषदेकडून निर्णयाचे स्वागत**

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.१७ मे-**

श्री संत शिरोमणी सावता महाराज यांची जन्मभूमी, आणि संजीवन समाधी असलेल्या सोलापूर जिल्ह्यातील तीर्थक्षेत्र अरण (ता. माढा) ला राज्य सरकारने 'अ' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्याचा निर्णय मंगळवार, दि. १३ मे रोजी जारी केला. यामुळे सावता परिषदेच्या लढ्याला यश मिळाले असून या निर्णयाचे सावता परिषदेच्या वतीने संस्थापक अध्यक्ष कल्याणराव आखाडे यांनी स्वागत केले.

या निर्णयाबाबत माहिती देताना सावता परिषदेचे प्रदेश महासचिव मृदुल माळी यांनी सांगितले की, वारकरी संप्रदायाचे मानबिंदू, अरणला तीर्थक्षेत्राचा अ वर्ग दर्जा देऊन भाविकांच्या सुख सुविधेसाठी तेथील विविध विकास कामांना भरीव निधी देण्यात यावा. यासाठी सर्वात पहिल्यांदा सावता परिषदेने हा प्रश्न ऐरणीवर आणला होता. राज्याच्या महायुती सरकारच्या ग्रामविकास विभागाच्या वतीने विशेष बाव म्हणून अरणला 'अ' वर्ग दर्जा देण्याचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. या निर्णयामुळे अरणचा सर्वांगीण विकास होईल. अरण हे तीर्थक्षेत्र प्रभावित होईल. तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे ऑगस्ट २०२४ मध्ये अरण येथे आल्यानंतर त्यांनी अ वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा देण्याचे आश्वासन दिले होते. जे आता प्रत्यक्षात उतरले आहे.

# टाळ मृदंगाच्या गजरात संभाजी महाराजांची जयंती



**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १७ मे-**

कर्णकर्कश आवाजातील डी.जे.व बॅन्ड यांना फाटा देत चिखलठाण तालुका करमाळा येथील जगदंब ग्रुपच्या वतीने छत्रपती संभाजी महाराजांची जयंती पारंपारिक टाळ मृदंगाच्या गजरात मिरवणूक काढून उत्साहात साजरी करण्यात आली. विविध प्रकारचे सामाजिक उपक्रम राबवणाऱ्या चिखलठाण तालुका करमाळा येथील जगदंब ग्रुपच्या वतीने यावर्षी नाकर्णकर्कश्य आवाजातील डी.जे ,बँडबाजा, बँजो चित्रविचित्र पद्धतीने हावभाव करत केली जाणारी हीडीस पद्धतीची नृत्ये आशा सर्व पद्धतीला फाटा देत पारंपारिक पद्धतीने टाळ मृदंगाच्या गजरात हरी नामाचा जयघोष करत गावातील तुळजाभवानी मंदिरापासून भव्य अशी छत्रपती संभाजी महाराजांच्या मूर्तीची मिरवणूक काढण्यात आली येथील जगदंब चौकात मिरवणूक विसर्जन होऊन मुर्तीचे पुजन करण्यात आले. यानंतर छत्रपती संभाजी महाराज की जय च्या घोषणा देण्यात आल्या जगदंब ग्रुपच्या वतीने वर्षभर अनेक उपक्रम राबवण्यात येतात यावर्षीपासून छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना चिखलठाण भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असल्याचे घोषणा आयोजकांच्या वतीने करण्यात आली यावेळी गावातील जगदंब ग्रुपच्या कार्यकर्त्यांबरोबरच ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.



# ओन्ली संस्थतर्फे एक लाखाचा चारा वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १७ मे-**

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्था बार्शी यांच्यावतीने बार्शी शहरातील जाणीव फाउंडेशन गोशाळेस दि. १६ मे रोजी मुक्या जनावरांना चारा वाटप करण्यात आला. प्रथम या कार्यक्रमाचे अध्यक्ष माऊली समुहाचे अध्यक्ष अमृत नाना राऊत यांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करण्यात आले. सूत्रसंचालन वसंत हवालदार यांनी केले. ओन्ली समाजसेवा संस्थेचा कार्याचा प्रास्ताविक आढावा प्रा. चंद्रकांत उलभगत यांनी केला. यावेळी संतोष पवार यांनी ओन्ली समाजसेवा कार्याची कवितारुपी माहिती दिली. संस्थेचा महिला अध्यक्षा सायरा मुल्ला यांचेही गोशाळेस चारा दिल्याबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राहुल वाणी यांनी आजपर्यंत झालेला कार्य मागील दोन महिन्यापूर्वी वसंत मामा हवालदार यांना भेटून आपल्या गोशाळेत काय मदत करता येईल का याबाबत चर्चा करण्यात आली होती. त्यानंतर हा चारा वाटपाचा मोठा उपक्रम हाती घेण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष अमृत राऊत यांनी ओन्ली समाजसेवा व जाणीव फाउंडेशन या संस्थेचा मी सक्रिय सभासद असून या संस्थेचे सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक कार्य महान आहे असे त्यांनी आपल्या भाषणात सांगितले.

यावेळी राहुल वाणी, संतोष शेळगावकर, नागनाथ सोनवणे, माणको ताकभाते, प्रा. चंद्रकांत उलभगत, प्रा. रतिकांत हमने, प्रा. सचिन मस्के, गणेश कदम, अतुल वाणी, सुरेंद्र स्वामी, वृक्षमित्र केदार वळेकर, संपतराव देशमुख, विजय येवारे, सायरा मुल्ला, रेखा विधाते, रागिनी झेंडे, सुजाता अंधारे, अनुसया आगलावे, त्रिशाला मिसाळ, सुनिता गायकवाड, जाणीव फाउंडेशनचे तुळशीदास मस्के, वसंत हवालदार, राजाभाऊ लोहार, संतोष पवार, किशोर अकोसकर, दीपक शिंदे, पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दफनभूमी अनधिकृत गेट विरोधात उपोषण

**प्रशासनाच्या आश्वासनानंतर उपोषण स्थगित**




संरक्षक भिंत तोडून बेकायदेशीर सुरू केली वहिवाट ता १६ मे २०२५ पासून बंद करण्यात येईल व दफनभूमीची देखभाल दुरुस्ती यापुढे नगरपंचायत प्रशासन करेल या लेखी आश्वासनानंतर उपोषण मागे घेण्यात आले.

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. १७ मे-**

मुस्लिम दफनभूमीच्या पश्चिम दिशेला असलेली संरक्षक भिंत पाडून काढण्यात आलेले अनधिकृत गेट बंद करून दफनभूमी अंतर्गत केलेले अनधिकृत रस्ते व बांधकामे निष्कासित करण्यासंदर्भात वारंवार मागणी करूनही नगरपंचायत प्रशासनाच्या वतीने कारवाई न केल्याने मुस्लिम समाजातील एका गटाने आक्रमक भूमिका घेत नगरपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले.

माढा नगरपंचायतीच्या मिळकत नं.१५५९ येथे मुस्लिम दफनभूमी असून याला माढा - शेटफळ रस्त्यावर मुख्य रस्ता आहे. सदर मिळकतीस शासकीय फंडातून संरक्षक भिंत बांधण्यात आली असून या ठिकाणी मृत्यू पश्चात नमाज पठण करण्याकरिता निवारा शेड बांधण्यात आला आहे.शेडकडे जाण्याकरिता एकच अधिकृत रस्ता आहे. परंतू काही समाज बांधवांनी सदर जागेमध्ये प्रशासनाची दिशाभूल करून व खोट्या कागदपत्रांच्या आधारे निवारा शेड ची गुलशन ए इमान या नावाने नोंदणी केली आहे .तसेच स्थानिक प्रशासनाची कोणतीही परवानगी न घेता मुख्य प्रवेशद्वार असताना पश्चिम दिशेला संरक्षक भिंत पाडून तेथे अनधिकृत गेट निर्माण करून दफनभूमी अंतर्गत अनधिकृत रस्त्यांची निर्मिती व इतर बांधकामे केली आहेत.त्यामुळे संरक्षक भिंत पाडणाऱ्या संबंधीत व्यक्तींवर गुन्हा दाखल करून ती पुन्हा बांधावी तसेच अंतर्गत झालेली अनधिकृत बांधकामे व रस्ते काढून टाकण्यात यावेत या मागणीसाठी मुस्लिम समाज बांधवांनी नगरपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. दिवसभरात नगरपंचायतीच्या वतीने उपोषण मागे घेण्यासंदर्भात प्रयत्न केले रात्री उशीरा उपोषण मागे घेण्यात आले. उपोषणास जहिर मणेर, आयुबखान शेख, हारूण मुलाणी, अजीज शेख, सोहेल मुलाणी यांनी सहभाग घेतला.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पिलीव येथील शिबीरात ६० जणांनी केले रक्तदान

### संत निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशनचे आयोजन



**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि १७ मे-**

पिलीव (ता. माळशिरस) येथे संत निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशन अंतर्गत संत निरंकारी मंडळाच्यावतीने ग्रामपंचायत सभागृहात झालेल्या शिबीरात ६० जणांनी रक्तदान केले.

शिबीराचे उदघाटन झोनचे इंद्रपालसिह नागपाल, क्षेत्रीय संचालक बाळासाहेब पवार यांच्या हस्ते झाले. यावेळी पोपट टकले, अनिल देशमुख, संजय कदम, माजी जिल्हा परिषद सदस्य गणेश पाटील, माजी सरपंच नितीन मोहीते, माजी उपसरपंच आरिफखान पठाण, माजी उपसरपंच सोनाली करमाळकर, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष कुमार भैस, दिलीप कांबळे, अनिल पवार, विजय सपाटे, जोशी सर, पत्रकार प्रमोद भैस, संजय पाटील उपस्थित होते. माजी जिल्हा परिषद सदस्य श्री. पाटील, श्री. पठाण, श्री. जोशी तसेच नागपालजी यांनी स्वच्छता मोहिम, रक्तदान शिबिर असे सामाजिक उपक्रम राबवित निरंकारी मंडळाने सामाजिक बांधीलकी जपली असल्याचे सांगितले. पंढरपूर येथील बजाज रक्तपेढीच्यावतीने रक्तसंकलन करण्यात आले.



**महत्वाचे...**



## जेऊर येथे संयुक्तरित्या छत्रपती संभाजी व बुध्दजयंती उत्सव

**करमाळा दि.१७ मे-**

संभाजी ब्रिगेडच्या जेऊर येथील संपर्क कार्यालयामध्ये गौतम बुद्ध व छत्रपती संभाजी महाराज यांची संयुक्त जयंती मोठ्या उत्साहामध्ये साजरी करण्यात आली. यावेळी अध्यक्षस्थानी तालुकाध्यक्ष सुहास पोळ होते. संभाजी महाराजांच्या जीवन चरित्रावर सागर कोठावळे म्हणाले वयाच्या १४ व्या वर्षी बुधभूषण, नायिकाभेद, सातसतक, नखशीख असे ग्रंथ लिहिणारे महान साहित्यिक, संस्कृतपंडित विचारवंत, शाक्तवीर, देशाचे दुसरे छत्रपती, स्वराज्यासाठी बलिदान देणारे स्वराज्यवीर संभाजी महाराजशास्त्र, धर्म, संस्कृती आणि राज्यकारभार यांचा सखोल अभ्यास करून तेजस्वी बुद्धिमत्ता, अपराजित रणनिती, अटळ ध्येयनिष्ठा आणि अतुलनीय पराक्रम यांच्या जोरावर केवळ योद्धा नव्हे, तर एक विचारवंत, कवी आणि कुशल प्रशासक म्हणून ख्याती प्राप्त करणारे स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज हे शौर्य, धैर्य,त्याग,पराक्रम आणि स्वराज्याच्या स्वाभिमानी अस्मितेचे महान प्रतीक आहेत. औरंगजेबासारख्या क्रूर आणि बलाढ्य मुघल सत्तेच्या विरोधात शेवटच्या श्वासापर्यंत लढणाऱ्या छत्रपती संभाजी महाराजांनी स्वराज्याच्या रक्षणार्थ आपले बलिदान दिले. यावेळी पश्चिम महाराष्ट्राचे कार्याध्यक्ष नितीन खटके, तालुकाध्यक्ष सुहास पोळ, निलेश पाटील, पांडुरंग घाडगे, अतुल निर्मळ, धन्यकुमार गारुडी, मोहन पिसे, सागर साखरे, आदिनाथ माने, सागर बनकर, उमेश मोहिते, सोमनाथ जाधव, सागर कोठावळे, किशोर कदम, अजित उपाध्ये, आरोव म्हमाने, आराध्या म्हमाने उपस्थित होते.

## माशाळच्या चौडेश्वरी देवीच्या यात्रेस प्रारंभ



**सोलापूर, दि. १७ मे-**

अफजलपूर तालुक्यातील माशाळ येथील श्री चौडेश्वरी देवीच्या यात्रेस आज दि. १७ मे पासून महाअभिषेकाने सुरवात झाली. या यात्रेनिमित्त देवीची २६ मे २ जूनपर्यंत रोज सायंकाळी गावातून सवाद्य मिरवणूक निघणार आहे. दि. २५ मे रोजी पूजा-अर्चा व नैवेद्य होणार आहे. दि. १ जून रोजी ट्रस्ट व समस्त सद्भक्त मंडळातर्फे विविध मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दररोज होणार्या मिरवणुकीचा सांगता समारंभ दि. २ जून रोजी होणार आहे. यात्रा यशस्वी करण्यासाठी विश्वनाथ रेऊर, गुंडप्पा पुजारी, चंद्रमप्पा पुजारी, मल्लिनाथ गडेद, बसवराज हडपद, नागप्पा बारामणी यांनी परिश्रम घेतले. या यात्रेत जास्तीत जास्त भाविकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन ट्रस्टच्या वतीने करण्यात आले.

# कॉरिडॉर अन नमामी योजना नंतर बघा; अगोदर वाळवंटासह पुरातन मंदिरांची दुरूस्ती तरी करा



पंढरपूर - येथील चंद्रभागा नदीच्या पात्रात असणाऱ्या विविध पुरातन घाटां बरोबरच चंद्रभागेच्या पात्रात असलेल्या पुरातन चौफाळ्याच्या दगडी कट्ट्यांची देखील मोठी दूरवस्था झालेली दिसत आहे.

### पंढरपूरकरांसह वारकरी करताहेत शासनाकडे मागणी

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.१७ मे-**

येथील चंद्रभागा वाळवंटातील अनेक पुरातन घाटांची सध्या दूरवस्था झालेली आहे. शासनाकडून पंढरपूरचा विकास करण्यासाठी पंढरपूर कॉरिडॉर तसेच चंद्रभागा नदी आणि वाळवंट परिसर विकसीत करण्यासाठी नमामी चंद्रभागा योजनांची घोषणा केली गेली. नमामी चंद्रभागा योजने अंतर्गत भीमा नदीच्या उगमा पासून ती भीमा नदीच्या शेवटपर्यंतच्या नदीचा विकास करण्यात येणार होता. मात्र ही योजना केवळ कागदावरच दिसली. त्यामुळे उगमापासून ते शेवटा पर्यंत जावूद्यात निदान शासनाने येथील वाळवंटात असलेल्या प्राचीन घाटांचे तसेच पुरातन मंदिराचे तरी संवर्धन करावे अशी मागणी वारकरी सांप्रदायातून केली जात आहे.

> पंढरपूर कॉरिडॉर व्दारे मंदिर परिसराचा तसेच चंद्रभागा नदीचे तसेच वाळवंटाचा विकास करण्याचे शासनाचे नियोजन आहे. चंद्रभागेचा विकास राहूद्यात निदान तिचे पावित्र्य सर्वांनी जपले पाहिजे. नमामी योजना कागदावरच आहे. त्यामुळे शासनाने वाळवंटातील प्राचिन घाट, पुरातन मंदिरांकडे देखील लक्ष दिले पाहिजे. मध्यंतरी चंद्रभागा घाट तसेच या घाटावरील माता चंद्रभागेच्या मंदिराच्या जिर्णोध्दाराचे काम महाराज मंडळींनी हाती घेतलेले आहे.
> **- देवव्रत उर्फ राणा महाराज वासकर** (राष्ट्रीय अध्यक्ष वारकरी सांप्रदाय पाईक संघ

येथील चंद्रभागा नदीच्या पात्रात जुन्या दगडी पुलापासून ते विष्णूपदा पर्यंत एकुण दहा ते बारा घाट तयार करण्यात आले आहेत. नागरिकांना शहरातून नदीपात्रात जाण्यासाठी पूर्वी हे घाट तयार करण्यात आलेले होते. या मध्ये सर्वात प्रथम १७७५ मध्ये कुंभार घाटाचे बांधकाम करण्यात आले होते. या घाटाची आजमितीला कमालीची दूरवस्था झाली आहे. या घाटावर पालिकेकडून सुलभ शौचालय, ड्रेनेजचे पाणी साठविण्यासाठी सिमेंटच्या चेंबरचे बांधकाम करण्यात आले आहे. भिकाऱ्यांनी देखील या घाटावर कमालीचे अतिक्रमण केलेले आहे.

या बरोबरच नदी पात्रात असणारा विप्रदत्त घाट जो १८२० ते २२ मध्ये तयार करण्यात आला आहे. या घाटांची देखील बऱ्याच वर्षापासून दूरवस्था झाली आहे. या घाटाच्या खालच्या बाजूस म्हणजेच वाळवंटालगत असणाऱ्या पायऱ्याच घाटापासून वेगळ्या झाल्याच्या दिसत आहे. त्यामुळे या घाटावरुन येजा करताना विशेषत: वृध्द माणसे, महिला तसेच लहान मुलांचे कमालीचे हाल होत आहेत. या प्रमाणेच नगरपालिकेच्या जुन्या इमारती जवळ असणाऱ्या खिस्ते घाटाची देखील काहीशी पडझड झालेली आहे. त्यामुळे शासनाकडून किंवा प्रशासनाकडून चंद्रभागा वाळवंटाच्या सौंदर्यात भर टाकणे दूरच निदान वाळवंटातील प्राचिन मंदिरांचे तसेच घाटांचे तरी संवर्धन होणे गरजेचे आहे.

> **वाळवंटातील घाटांचा प्राचिन इतिहास**
> पंढरपूरात सध्या अस्तित्वात असलेले प्राचिन घाट व त्या घाटांची निर्मिती करणाऱ्यांची नावे कंसात दिलेली आहेत. कुंभारघाट (१७७५ सरदार लिमये), महाव्दार घाट (चिंतु नागेश बडवे), दत्तघाट ( जनाई आप्पा हरिसाद), कासारघाट ( जांभेकर नाईक ), चंद्रभागा घाट (१८१८ गोविंद महाराज चोपडकर), विप्रदत्त घाट ( चिंतामणराव पटवर्धन), खिस्ते घाट (खिस्तेबुवा महाराज) अशा प्रकारे प्राचिन अकरा ते बारा घाट सध्या चंद्रभागा नदीच्या तिरावर अस्तित्वात आहेत अशी माहिती येथील प्राचिन गोष्टींचे अभ्यासक आणि अधिवक्ता असलेले धनंजय रानडे यांनी दिली.

## पिलीव येथे सुसज्ज बसस्थानक मंजूर व्हावे

**माजी जिल्हा परिषद सदस्य गणेशदादा पाटील यांची पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे मागणी**

**तभा वृत्तसेवा**
**पिलीव दि १७ मे-**

पिलीव हे सातारा-सोलापूर महामार्गावरील मोठे गाव आहे. येथून पंढरपूर, तुळजापूर, गाणगापूर, गोंदावले, शिंगणापूर, कोल्हापूर या तिर्थक्षेत्राकडे भाविक भक्तांची सतत वर्दळ असते. येथून अकलूज, पंढरपूर, पुणे, सातारा, म्हसवड येथे प्रवाशी, विदयार्थी यांची सतत ये-जा असते. महीला व पुरुष प्रवाशांची मोठी संख्या याच बसस्थानकावरुन ये जा करीत असते. पंढरपूरला आषाढी, कार्तीकी सह एकादशीला भाविकांची मोठी गर्दी असते. पिलीव दहा- बारा खेडेगावासाठी



मुख्य बाजारपेठ आहे .नागरिक, विद्यार्थी, प्रवासी इतरत्र जाण्यासाठी पिलीव स्थानकावर येतात.परंतु महामार्ग झाल्यापासुन येथे बसस्थानकच नाही. त्यामुळे ऊन, वारा, पावसात प्रवाशांना थांबण्यासाठी अडचण आहे. याठिकाणाहुन रात्र - दिवस बसेस ये जा करतात पण बसस्थानक नसल्याने एसटी बसेस याठिकाणी थांबतच नाहीत. सर्व बसेसेना येथे थांबा द्यावा अशी मागणी आहे. येथे सगळयात जास्त अडचण महीला प्रवाशांची याठिकाणी होत आहे. येथे महामार्गालगत महिलांना मुख्यत्वे स्वच्छतागृह नसल्याने अधिक अडचण आहे. याठिकाणी सुसज्ज अशा सर्व सोयी सुविधांनी युक्त नवीन बसस्थानकाची गरज आहे. यासाठी शासनाने पशुवैद्यकीय दवाखान्याजवळ उपलब्ध असलेली जागा नवीन बसस्थानकासाठी उपलब्ध करुन देण्याची तसेच याठिकाणी ताबडतोब सुसज्ज असे नवीन बसस्थानक मंजूर करण्याची मागणी पिलीव गटाचे माजी जिल्हा परिषद सदस्य गणेशदादा पाटील यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## पाथरी कॅनॉल दुरुस्तीसाठी शेतकरी संघटनेचे आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१७ मे-**

शेतकरी संघटनेच्यावतीने बार्शी तालुक्यातील पाथरी प्रकल्पातील कॅनॉलची दुरुस्ती करुन तत्काळ शेतकऱ्यांना पाणी मिळावे या मागणीसाठी आंदोलन करण्यात आले.

या प्रकल्पातून पिंपळगाव (दे), झानपुर ममदापूर , खामगाव परिसरात गेली १५ वर्षांपासून कॅनॉल नादुरुस्त असून तत्काळ कॅनॉल दुरुस्त करुन शेती पिकांना पाणी मिळावे, आमदार सोपल यांनी कॅनॉल दुरुस्तीला मंजुरी द्यावी, हक्काचे पाणी पूर्वीप्रमाणे सोडावे, कॅनॉलचा सर्वे, मोजमाप करून अतिक्रमण हटवावे, पाट पाणी मिळावे निवेदनाद्वारे या मागण्या करण्यात आल्या. पाटबंधारे विभागाचे पटेल यांनी निवेदन स्वीकारले. पोलिस निरीक्षक हेमंत काटकर यांनी बंदोबस्त दिला. संघटनेचे प्रवक्ते रामराव काटे पाटील, आंदोलक समाधान भालेकर (खाम गाव), महेश गलांडे, पोपटराव गलांडे, येळंब, दादा कुरळे, सचिन आगलावे उपस्थित होते.

## अन्नछत्र मंडळामुळे तीर्थक्षेत्र अक्कलकोटच्या सौंदर्य व वैभवात मोठी भर





**तभा वृत्तसेवा । नंदकुमार जगदाळे**
**अक्कलकोट, दि.१७ मे-**

अक्कलकोट येथे अक्कलकोट नरेश श्रीमंत विजयसिंह राजे भोसले महाप्रवेशद्वाराच्या भव्य स्वागत कमानीमुळे तीर्थक्षेत्र अक्कलकोटच्या सौंदर्यात आणि वैभवात मोठी भर पडली आहे. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या दुरदृष्टीमुळे तीर्थक्षेत्र अक्कलकोटने आज जगाच्या नकाशावर ठळकपणे आपली नव्याने ओळख निर्माण केली आहे. स्वर्गीय गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या प्रेरणेने श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांनी महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा, भव्य गड किल्ले, शिवस्मारक, अजरामर धातुशिल्प, शिव चरित्र दालन उभे केले. सोलापूर जिल्हयात एकमेव असलेले आकर्षक बालोद्यान उभे केले. अन्नछत्र मंडळ प्रांगणात आई तुळजा भवानी मातेचे आकर्षक मंदिर उभे केले आहे. आज रोज लाखो भाविक श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात महाप्रसाद भोजन घेऊन तृप्त होत आहेत. लाखो भाविक पर्यटनार्थ मोठया प्रमाणात अक्कलकोटी भेट देत आहेत. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांनी संपुर्ण महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात एक आदर्शवत धर्मादाय न्यास कसा असावा याचा मापदंडच उभा केला आहे.




संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले हे तीर्थक्षेत्र अक्कलकोटच्या वैभवात व सौंदर्यात भर घालण्यासाठी नेहमीच झटतात यासाठी त्यांची तळमळ मोठी आहे. राजे फत्तेसिंह क्रिडांगण शुभोभित करणेसह याच्या सर्व संरक्षक भिंती अक्षरक्षः बोलक्या केल्या आहेत. राजे फत्तेसिंह क्रिंडागणावर संरक्षक भिंतीवर स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, पाणी, पर्यावरण, वसुधंरा बचाव, मुली वाचवा मुली शिकवा, योगा असे अनेक जनजागृती संदेश देऊन भिंती अक्षरक्षा बोलक्या केल्या आहेत. क्रिडांगणावर बसण्यासाठी आसन व्यवस्था व मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण केले आहे. वृक्षलागवड संदर्भात संस्थापक अध्यक्ष जन्मेजपराजे भोसले हे फारच जागृत आहेत अक्कलकोट सोलापुर रस्त्यावर रस्ता चौपदरीकरणावेळी झालेती वृक्षतोड



भरून काढण्यासाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूला मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड, संवर्धन, जतन, संरक्षक जाळी बसवुन केले आहे. तीर्थक्षेत्र अक्कलकोटचे वैभव व सौंदर्य वाढीसाठी संस्थापक जन्मेजयराजे भोसले नेहमीच अग्रेसर आहेत. तीर्थक्षेत्र अक्कलकोट शहरातील अनेक चौकामध्ये नामफलक रस्ता नामफलक शुशोभीकरण केले आहे. शहराच्या सोंदर्यवाढी साठी झटणारे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले शहराच्या आरोग्यासाठीही दक्ष आहेत. शहरामध्ये एखाद्या रुग्णास शहरवासीयास तातडीने उपचार घेण्यासाठी रुग्णालयात नेण्याचा प्रसंग उद्धवल्यास श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाची रुग्णवाहिका सेवेत नेहमी तप्तर असते. शहरात तालुक्यात ही रुग्णवाहिका अनेकांना मोठा आधार बनली आहे. तालुक्यात कुठेही अचानक आग लागली तर अग्निशमनासाठी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाची अग्निशमन गाडी तात्काळ सेवेसाठी हजर होते. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ हे अन्नदानासाठी प्रसिद्ध आहेच शिवाय आता मंडळाचे मुख्य कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांनी शहरातील निराधार पिडीत गरीबासाठी घरपोच जेवणाचा डबा स्वामी प्रसाद सेवा म्हणून अत्यंत आदर्शवत उपक्रम राबवुन संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्यापेक्षा एक पाऊल पुढे टाकुन अनेक वृद्ध माता पिता यांचे आशिर्वाद वाटुन घेतले आहेत. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या उपक्रमाचे फार मोठे कौतुक होत आहे.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे मुख्य कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले क्रीडाक्षेत्रात योगदान देणाऱ्या प्रत्येक खेळाडूसाठी मोठे प्रोत्साहान बळ देतात. आज तालुक्यातील अनेक गरजु कुस्तीगिरांना पैलवानी स्वामी प्रसाद रुपी खुराक प्रत्येक महिन्याला देण्याचे काम मंडळाने हाती घेतले आहे. मंडळाने प्रसादरूपी खुराक दिलेले पैलवान मोठे यश संपादन करून अक्कलकोटच्या नांवलौकीकात मोठी भर घालत आहेत. क्रीडा क्षेत्रात प्रोत्साहन बळ सर्वोतोपरी मदत करण्यात श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ नेहमीच अग्रेसर राहिले आहे. युवा पिढीला व्यायामाची ओढ लागावी. युवा पिढी बलवान झाली तर सक्षम राष्ट्र निर्मितीसाठी मदत होईल हा मोठा दूरदृष्टीकोन ठेवीत संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांनी मंडळाच्या प्रांगणात ओपन जीम व स्वतंत्र आद्ययावत सामुग्रीसह अधुनिक जिम तयार केली आहे. आज अनेक युवकांना व्यायामाची आवड निर्माण करण्यात श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांचे मोठे योगदान आहे असे म्हणल्यास वावगे होणार नाही. अक्कलकोटच्या जडण घडणीत श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे मोठे योगदन आहे .

